# द्वितीय वर्ष कला (मराठी)

## सत्र III

## अभ्यास पत्रिका

# मार्गदर्शन आणि समुपदेशन

## विषय कोड : DSC - EDU - IIB

© UNIVERSITY OF MUMBAI

**डॉ. सुहास पेडणेकर**
कुलगुरू
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**प्राध्यापक रविन्द्र कुलकर्णी**
प्रभारी कुलगुरू
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**प्राध्यापक प्रकाश महानवर**
संचालक
दूर व मुक्त अध्ययन संस्था
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**प्रकल्प समन्वयक** : **प्रा. संतोष राठोड**
प्राध्यापक
इंग्रजी विभाग एवं अंतरशाखीय प्रमुख,
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई

**अभ्यास समन्वयक एवं संपादक** : **प्रा. राजेश सिंह**
सहायक प्राध्यापक
शिक्षण शास्त्र विभाग, दूर व मुक्त अध्ययन संस्था,
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**लेखक** : प्रा. ज्योती शेरखाने
B.Sc. B.Ed.
M. A. (Education) SET
वसई, जिला-पालघर

**प्रा. संध्या महाजन**
हिन्दी विभाग प्रमुख
सेवा सदन कॉलेज ऑफ एज्युकेशन
उल्हासनगर

**डिसेम्बर २०२१, मुद्रण - १**

**प्रकाशक**
**संचालक, दूर आणि मुक्त अध्ययन संस्था.**
मुंबई विद्यापीठ, विद्यानगरी, मुंबई- ४०० ०९८.

**अक्षर जुळणी आणि मुद्रण**
मुंबई विद्यापीठ मुद्रणालय
विद्यानगरी, मुंबई

# अनुक्रमणिका


| इकाई क्र. | नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|

**Module 1: मार्गदर्शनाचे मूलभूत सिद्धांत**

१. मार्गदर्शनाची संकल्पना ........ १

२. मार्गदर्शनाचे प्रकार ........ ३०

**Module 2: समुपदेशनाचे मूलभूत सिद्धांत**

३. समूपदेशन (अर्थ व प्रकार) ........ ४८

४. समूपदेशन प्रक्रिया ........ ४८

**प्रात्यक्षिके**

• कार्यविश्लेषण करुन अहवाल सादर करणे

• समूपदेयशनासंबंधित व्याख्यान व भाषणे ऐकून समूपदेशनासंबंधी भविष्यातल्या आह्वानासंबंधी अहवाल सादर करणे

**UNIVERSITY OF MUMBAI**
**Syllabus for S.Y.B.A. (Education) Course under Choice Based Credit System**

**Third Semester**
**Core Course Title: Guidance and Counseling- Part I**
**Course Code: DSC-EDU-II B**

Theory Paper: 3 credits

**Semester III: Course Code: DSC-EDU-II B (November to April)**

**Objectives:**

i. To develop understanding of the basic concepts of guidance and counseling.
ii. To develop understanding of types and approaches of guidance and counseling.
iii. To acquaint students with the process and skills of counseling.

**Module 1: Fundamentals of Guidance**

**Unit 1: Concept of Guidance**

a. Meaning, Nature, Principles of Guidance
b. Need and significance of Guidance
c. Agencies for Guidance - Home, School.

**Unit 2: Types of Guidance: (Concept, Need, Importance and Role of teachers)**

a. Educational Guidance
b. Vocational Guidance
c. Personal Guidance

**Module 2: Fundamentals of Counseling**

**Unit 3: Counseling: Meaning and Types**

a. Counseling: Meaning, Purpose, Scope
b. Approaches of counseling: Directive, Non-directive, Eclectic.
c. Types of Counseling: Individual and Group Counseling.

**Unit 4: Counseling Process**

a. Stages of the counseling process (Initial disclosure, In-depth exploration, Commitment to action)
b. Skills of counseling: (Rapport building, Listening, questioning, Responding)
c. Role of Counselor, Role of teacher as a counselor.

Practicals

- To do a Job Analysis, and to submit a complete report
- To attend a talk by a Counselor on her/his contribution to society, challenges faced as a Counselor, and the future prospects in counseling, an submit a complete report

**References:**


- Bhatnagar, A. and Gupta, N.: Guidance and Counselling Vol. I – A Theoret Perspective. New Delhi: Vikas Publishing House, 1999.
- Crow, L. and Crow, A.: Introduction to Guidance. New Delhi: Eurasia, 1962.
- Geldard, K. and Geldard, D.: Counselling Children: A Practical Introduction, N Delhi: Sage Publications, 1997.
- Gibson, R.L. and Mitchell, M.H.: Introduction to Counselling and Guidance, N Jersey: Merill Prentice Hall, 1995.
- Gupta, Manju: Effective Guidance and Counselling Modern Methods Techniques. Jaipur: Mangal Deep Publication, 2003
- Jaiswal, S.R.: Guidance and Counselling. Lucknow : Lucknow Prakashan,1985
- Kochhar, S.K.: Guidance in Indian Education. New Delhi: Sterling Publishers,198
- Koshy, Johns: Guidance and Counselling. New Delhi: Dominant Publisher,2004.
- Mittal, M.L.: Kariyar Nirdeshan Avem Rojgar Suchana. Meerut:Internatio Publication House, 2004.
- Myers, G.E.: Principles and Techniques of Vocational Guidance. London:McG Hill Book Company, 1941.
- Pal, H.R. & Sharma, M.: Education of Gifted. New Delhi: Kshipra Publication, 2007.
- Pal, H.R. and Pal,A.: Education of Learning Disabled. New Delhi: Kship Publication, 2007.
- Rao, S. Narayana: Counselling and Guidance and Elementary School. New De Anmol Prakashn, 2002.
- Sharma, R.A.: Fundamentals of Guidance and Counselling. Meerut: R. Lall Boo Depot, 2001.
- Sharma, Tarachand: Modern Methods of Guidance and Counselling. New De Swarup & Sons., 2002.
- Shrivastava, K.K.: Principles of Guidance and Counselling. New Delhi: Kan Publication, 2003.
- Singh, Raj: Educational and Vocational Guidance. New Delhi: Common Wealth Publishers, 1994.
- Taneja, V.R.: First Course in Guidance and Counselling. Chandigarh:Mohin Capital, 1972.
- Vashist, S.R.: Vocational Guidance and Elementary School. New Delhi:

# १

# मार्गदर्शनाची संकल्पना

**घटक रचना**

१.० उद्दिष्टे
१.१ प्रस्तावना
१.२ मार्गदर्शन,संकल्पना,अर्थ
१.३ मार्गदर्शनाचे स्वरूप
१.४ मार्गदर्शनाची तत्त्वे
१.५ मार्गदर्शनाची गरज
१.६ मार्गदर्शनाचे महत्त्व
१.७ मार्गदर्शनाच्या संस्था (Agencies)
 १.७.१ घर
 १.७.२ शाळा
१.८ सारांश

## १.० उद्दिष्टे

हया घटकाच्या अभ्यासानंतर तुम्ही,

- मार्गदर्शनाची व्याख्या सांगू शकाल.
- मार्गदर्शनाचे स्वरूप स्पष्ट करू शकाल.
- मार्गदर्शनाची तत्त्वे सांगू शकाल.
- मार्गदर्शनाची गरज स्पष्ट करू शकाल.
- मार्गदर्शनाचे महत्त्व स्पष्ट करू शकाल.
- मार्गदर्शनाच्या विविध संस्थांचे (Agencies) वर्णन करू शकाल.

## १.१ प्रस्तावना

मानव हा सामाजिक प्राणी असून तो त्याच्या आयुष्यात इतरांची मदत आणि मार्गदर्शन घेत असतो. मानवाचे जीवन हे अनेक समस्यांनी भरलेले असते. आधुनिक जीवनातील विविधता मानवी उर्जा आणि मानवी संसाधनाचा एक मोठा भाग व्यापून घेते. मार्गदर्शन हे मानवी संसाधनाच्या वापरासाठी आणि रोजगारासाठी तसेच दिशा दर्शवन्यासाठी मदत करते. या संसाधनाच्या योग्य वापरासाठी जास्तीत जास्त उत्पादन आणि समाधान मिळवण्यासाठी याचा उपयोग कसा केला जाऊ शकतो याविषयी माहिती असणे आवश्यक असते. ज्यामुळे शैक्षणिक उपक्रम अधिक अर्थपूर्ण आणि उद्देशपूर्ण बनतात. व्यक्तिंना

वेगवेगळ्याप्रकारे स्विकारणे आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाची खात्री करण्यासाठी त्यांच्या क्षमता आणि योग्यता, त्यांची आवड आणि आकांक्षा त्यांची ताकद (strength) आणि कुमकुवतता (Weakness) जाणून घेणे आवश्यक आहे.

## १.२ मार्गदर्शन - संकल्पना व अर्थ

मार्गदर्शन ही एक संकल्पना त्याचबरोबर एक प्रक्रिया असून ती व्यक्तीला स्वतःच्या समस्या शोधण्यासाठी, त्याचा विस्तार करण्यासाठी त्याचबरोबर वैयक्तिक आनंद व सामाजिक उपयुक्तता जाणून घेण्यासाठी सहाय्यक प्रक्रिया आहे. मार्गदर्शन ही एक व्यापक संकल्पना असून यात समुपदेशन सेवा, मुल्यमापण सेवा, माहिती सेवा, संदर्भ सेवा, संशोधन आणि मुल्यमापण इत्यादीचा समावेश होतो. याचा वापर मनुष्य स्वतःच्या आयुष्यात येणाऱ्या समस्या सोडविण्यासाठी, स्वतःला समजण्यासाठी, स्वतःच्या विकासासाठी त्याचबरोबर योग्य निर्णय घेण्यासाठी करत असतो. शैक्षणिक प्रक्रियेत मार्गदर्शनाचा खूप उपयोग होतो. मार्गदर्शन हे फक्त समस्या सोडविण्यासाठीच नसून, व्यक्तिला स्वतःच्या समस्या सोडविण्यास लायक बनविते. सर्व मार्गदर्शन हे शिक्षण असते पण सर्व शिक्षण हे मार्गदर्शन नसते, मार्गदर्शन हे समस्याभिमुख नसून ते व्यक्तिभिमुख असते. कारण त्याचा मुख्य हेतू मनुष्यविकास हा आहे. मार्गदर्शनाचा उद्देश हा स्व विकासासाठीच नसून स्वत:च्या मुल्यमापणासाठी त्याचबरोबर स्वतःला दिशा देण्यासाठी देखिल केला जातो. मार्गदर्शनांतर्गत व्यक्तीला अशा प्रकारचे सहाय्य केले जाते की, व्यक्ती सर्वदृष्टीने आपल्यामधील क्षमतांचा विकास करण्यास योग्य होतो. मार्गदर्शनामुळे व्यक्तीला आपल्या वास्तविक स्वरूपाची ओळख होते. अध्यापन आणि मार्गदर्शन हे वेगळे केले जाऊ शकत नाही कारण विवेकपूर्ण मार्गदर्शनाशिवाय शिकविणे हे चांगले शिक्षण असू शकत नाही. चांगल्या अध्यापनाशिवाय मार्गदर्शन अपूर्ण आहे. मुलांच्या चांगल्या विकासासाठी आणि समायोजनासाठी मार्गदर्शन हे शिक्षणाचा अविभाज्य भाग बनते. मार्गदर्शन या शब्दाची व्याख्या वेगवेगळ्या अभ्यासकाद्वारे विविधप्रकारे केली गेली आहे. त्यावरून मार्गदशनाचा अर्थ निर्देशित करणे किंवा दिशा दाखविणे असा होतो. मार्गदर्शन हे कुशल व्यक्तीद्वारे कमी कुशल

असणाऱ्या व्यक्तीला देण्यात येणारी मदत आहे. जे विविध प्रकारच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी जसे की शैक्षणिक, व्यावसायीक, वैयक्तीक याचा उपयोग केला जाऊ शकतो.

**मार्गदर्शन – व्याख्या**

- **बिस्वैलो (Biswalo - १९९६)**

  "मार्गदर्शन म्हणजे एखादया व्यक्तीला स्वत:ची समज, स्वतःची दिशा आणि पर्यावरणाशी जास्तीत जास्त जुळवून घेण्यास सहाय्य करण्याची प्रक्रिया आहे. हे सहाय्य लोकांना कुठे जायचे आहे. त्यांना काय करायचे आहे त्यांच्या लक्षापर्यंत कसे

पोहचायचे आहे. आणि त्यांच्या जीवनात उद्भवणाऱ्या समस्यांचे निराकरण कसे करावे हे ठरविण्यात मदत करण्यासाठी त्याची रचना केली आहे. "

- **अर्बकल एट अल (Arbuckle et al. - १९६६)**
  "मार्गदर्शन ही एक संकल्पना तसेच एक प्रक्रिया आहे. संकल्पना म्हणून मार्गदर्शन व्यक्तीच्या चांगल्या विकासाशी संबंधित आहे. प्रक्रिया मार्गदर्शनामुळे व्यक्तीला स्वतःची समज (एखादयाचे सामर्थ्य आणि मर्यादा समजुन घेणे) आणि स्वतःच्या मार्गदर्शनामध्ये (समस्या सोडवण्याची निवड करण्याची आणि स्वतः निर्णय घेण्याची क्षमता) मदत होते."
- **बेव्हर (Brewer)**
  "मार्गदर्शन ही एक प्रक्रिया आहे. ज्यायोगे एखादी व्यक्ती त्याच्या समस्या सोडवू शकते आणि त्याच्या क्षमता आणि महत्वकांक्षा पूर्ण करण्यासाठी मार्ग शोधू शकते."
- **क्रो आणि क्रो (crow and crow)**
  "मार्गदर्शन म्हणजे एखादया सक्षम समुपदेशकांनी कोणत्याही वयोगटातील व्यक्तीला त्याच्या स्वतःच्या जीवनाला दिशा देण्यासाठी, स्वतःचा दृष्टीकोन विकसित करण्यासाठी, स्वत:चे निर्णय घेण्यास, स्वत:चे भार उचलण्यास मदत करण्यासाठी उपलब्ध केलेली मदत होय."

जर आपण वरील व्याख्यांचे सविस्तरपणे विश्लेषण केले तर आपल्याला मार्गदर्शनाची पुढील वैशिष्ट्ये सांगता येतील

- मार्गदर्शन ही संकल्पना तसेच एक प्रक्रिया आहे.
- मार्गदर्शन ही एक अखंड प्रक्रिया आहे.
- मार्गदर्शन हे समस्या आणि निवडीशी संबंधित आहे.
- मार्गदर्शन हे व्यक्तीस निर्णय प्रक्रियेत मदत करते.
- मार्गदर्शन हे कुशल समुपदेशकाकडून प्राप्त झालेली मदत आहे.
- ही एक सामान्यीकृत आणि विशेष सेवा दोन्ही आहे.
- ही सेवा सर्वांसाठी आहे.

म्हणून वरील वैशिष्ट्यांवरून आपण असे म्हणू शकतो की, मार्गदर्शन हे व्यक्तीला वेगवेगळ्या संधी आणि समस्यांमधून स्वतःची निवड व उपाय करण्यासाठी सहाय्य करते. हे व्यक्तीला त्याच्या क्षमता व त्यानुसार विविध वातावरणाशी जुळवून घेण्यास मदत करते.

मार्गदर्शन ही एक अशी प्रक्रिया आहे ज्यामुळे विद्यार्थी सध्याची परिस्थिती व शैक्षणिक संस्थेशी जुळवून घेण्यास समर्थ बनतो. ज्यामुळे विदयार्थ्याचा जास्तीत जास्त विकास होऊ शकतो आणि त्यांच्या भविष्यासंदर्भात आवड, क्षमता आणि गरजाच्या दृष्टीने योजना तयार करण्यास मदत होते. तसेच विदयार्थ्यांना त्यांच्या स्वभावाप्रमाणे योग्य, सरळ,

उपयुक्त आणि आनंदी जीवन जगण्यासाठी, आणि स्वतःला जगाशी, परिस्थितीशी जुळवून घेण्यास मदत होते. विद्यार्थ्यांना ज्ञान, कौशल्ये आणि दृष्टीकोन प्राप्त करण्यास मदत करण्यासाठी मार्गदर्शन आवश्यक असते. जे त्याला व्यवसायात प्रवेशाकरिता, जीवन सुखी करण्यासाठी, निर्णयाची परिपक्वता येण्यासाठी, भावनांच्या स्थिरतेसाठी मार्गदर्शन आवश्यक आहे. त्यामुळे मार्गदर्शन हे खरे स्वतःला दिशा देण्यास आवश्यक असे वैशिष्ट आहे.

**आपली प्रगती तपासा**

१. मार्गदर्शनाचा अर्थ सांगा स्पष्ट करा

२. मार्गदर्शन व्याख्या सांगा १.३ मार्गदर्शनाचे स्वरूप (Nature of Guidance) :

मार्गदर्शनाचा उद्देश एखादया व्यक्तीला स्वतःला समजून घेणे. त्याच्या क्षमता जास्तीत जास्त कशा वाढविता येतील हे शिकवणे आहे जेणेकरूण तो स्वत:ला समाजाचा समायोजित आणि तर्कसंगत सदस्य म्हणून सिद्ध करू शकतो. मार्गदर्शनाची मुळे ही केवळ ऐतिहासिकदृष्ट्या खोल नसून ती सर्वदूर विस्तारलेल्या आहेत. सुरवातीला, मार्गदर्शन व्यावसायिक क्षेत्रातील व्यक्तीला मदत करण्याचा सरळ मर्यादीत प्रयत्न होता. परंतु आता व्यक्तीच्या इतर गरजांप्रमाणे याचा उपयोग व्यक्ती अनेक क्षेत्रात करताना दिसतो. मार्गदर्शन प्रक्रिया कधी थांबत नाही. ती सातत्याने सुरूच असते. या प्रक्रियेत व्यक्ती स्वत:च्या क्षमता, अभिरूची, इतर योग्यता यांचा स्वतःला समजून घेण्यास जास्तीत जास्त प्रयत्न करत असतो. विविध परिस्थितींना तोंड देण्यासाठी समायोजन करण्यासाठी व्यक्तीला मार्गदर्शन आवश्यक असते. जीवनात मार्गदर्शन हे औपचारिक आणि अनौपचारिक स्वरूपात केले जाते. अनौपचारिक मार्गदर्शन हे व्यक्तीचे मित्र, समवयस्क, नातेवायीक यांच्याकडून होत असते तर औपचारिक मार्गदर्शन हे शाळा महाविद्यालयातील मार्गदर्शन सेवा व इतर संघटीत सेवा यांच्याकडून व्यक्तीला मिळते. यावरून मार्गदर्शन हे जीवनाशी संबंधित असते हे सिद्ध होते.

मार्गदर्शनाचा उपयोग करूण व्यक्ती सर्वदृष्टीने आपल्यामधील क्षमतांचा जास्तीत जास्त विकास करण्यास योग्य होते. जीवन जगत असताना समस्या आणि आव्हाने याचा सामना कसा करावा हे मार्गदर्शनामुळे समजते. मार्गदर्शन लोकांना कोणत्याही परिस्थितीत पूर्ण समाधानाने संतुलित आणि तणावमुक्त जीवन जगण्यास मदत करते.

व्यक्ती केवळ त्यांच्या दिसण्यामध्येच नव्हे तर त्यांच्या मानसिक आणि बौद्धिक संपत्ती, इच्छा, आकांक्षा आणि योग्यतेमध्ये वेगवेगळ्या असतात. मार्गदर्शनाची प्रक्रिया एखादया व्यक्तीला त्याच्या भविष्यासाठी तयार करण्यास मदत करते. मार्गदर्शन एखादया व्यक्तीच्या कारकिर्दिच्या निवडीसाठी मदत करते. ही एक कौशल्ययुक्त क्रिया आहे. मार्गदर्शनात, प्रशिक्षित व्यक्ती व्यतिरिक्त, मानसोपचार तज्ञ, समुपदेशक यांचे ही सहाय्य घ्यावे लागते. मार्गदर्शन स्वतः कोणतीच समस्या सोडवित नाही ते समस्या सोडविण्यासाठी व्यक्तीला

स्वत:च्या क्षमतांचा वापर करण्यासाठी प्रवृत्त करते. मार्गदर्शन व्यक्तीला आत्मविश्वासाने भविष्याकडे वाटचाल करण्यास मदत करते.

**आपली प्रगती तपासा**

१. मार्गदर्शनाची प्रक्रिया एखादया व्यक्तीला त्याच्या भविष्यासाठी तयार करण्यास मदत करते. याचे स्पष्टीकरण द्या.

२. मार्गदर्शन हे वैयक्तिक उपक्रम कसे आहे?

## १.४ मार्गदर्शनाची तत्त्वे (Principles of Guidance)

**मार्गदर्शन खालील तत्वावर आधारित आहे.**

**i. व्यक्तिचा सर्वांगीण विकास :**

प्रत्येक व्यक्तीला आपले व्यक्तीमत्त्व विकसित करण्या साठी स्वातंत्र्य दिले पाहिजे. जेव्हा आवश्यकता असेल तेव्हा त्याला त्याच्या समस्याबद्दल मार्गदर्शन केले पाहिजे. विद्यार्थ्याला मार्गदर्शन करताना त्याच्या अभिरूची, अभिवृत्ती लक्षात घेऊन विद्यार्थी स्वतःच स्वत:चा विकास करू शकेल. मार्गदर्शन व्यक्तीच्या संपूर्ण विकासाशी, संबंधित आहे. हे केवळ विद्यार्थ्याच्या शैक्षणिक कामगिरीवर भर देत नसून सामाजिक, शारीरिक अशा विविध पैलूंवर म्हणजेच व्यक्तीच्या सर्वांगीण विकासावर भर देते. (थुगू इ. अल (२०१०).

**ii. मार्गदर्शन हे व्यक्तीभेदाचा आदर करते:-**

प्रत्येक व्यक्ती अद्वीतीय असते. दोन व्यक्तीमध्ये शारिरीक, मानसीक, बौद्धिक तसेच इतर कौशल्याबाबत, क्षमतांबाबत फरक आढळतो. मार्गदर्शन हे व्यक्तीला तिच्यातील समस्येची उकल करुन व्यक्ती वैशिष्ट्यांचा विकास कसा करावा हे सांगते. व्यक्ती - भिन्नतेचे तत्त्व लक्षात घेऊन मार्गदर्शन केले पाहिजे.

**iii. मार्गदर्शन हे व्यक्तीच्या वर्तणुकीशी संबंधित प्रक्रिया आहे.**

मार्गदर्शन हे व्यक्तीला स्वतःच्या वर्तणावर जसे की आवड, नापसंती, प्रवृत्ती आणि कुमकुवतपणतवर चांगले नियंत्रण मिळवण्यास मदत करते या तत्त्वात मार्गदर्शक वेगवेगळ्या साधनांचा वापर करतो जसे वैयक्तिक मुलाखती, समुपदेशन, चाचण्या सत्र इ.

**iv. मार्गदर्शन सहकार्यावर अवलंबून असते सक्तीवर नाही**.

मार्गदर्शन ही दुसऱ्यावर निर्णय लादण्याची प्रक्रिया नव्हे. मार्गदर्शकाने केलेल्या मार्गदर्शनाचा फायदा कसा घ्यायचा मार्गदर्शन घेणाऱ्या व्यक्तीने ठरवायचे असते. मार्गदर्शक हा आपला दृष्टीकोन त्याच्यावर लादत नाही. सक्तीच्या मार्गदर्शनामुळे हट्टीपणा किंवा सहकार्याचा अभाव होऊ शकतो.

**v. मार्गदर्शन ही अखंड चालणारी प्रक्रिया आहे**.

विदयार्थ्यांना मार्गदर्शनाची सुरुवात घरातून होते. पुढे ते शाळेत, समाजातून मिळत असते. (पालक → शिक्षक → समुदाय) पालक, शिक्षक आणि समुदायाची मुख्य भूमिका ही एखादया व्यक्तीला योग्य वर्तन आणि मुल्ये मिळविण्यासाठी मागदर्शन करणे हे होय. घरी दिलेले मार्गदर्शन शिक्षण आणि समाज जे देतात त्याच्याशी सुसंगत असावे. जर पालकांनी घरी आज्ञाधारकपणाची शिकवण दिली तर शिक्षकांनी शाळेतही आज्ञाधारकपणाचे धडे दिले पाहिजेत.

वरिल मार्गदर्शन तत्वांचा एकत्रित विचार केल्यास, व्यक्तीच्या विकासाबरोबरच सामाजिक गरज पूर्ण करणे हे महत्वाचे ध्येय आहे हे दिसून येते.

**आपली प्रगती तपासा**

१. मार्गदर्शन ही अखंड चालणारी प्रक्रिया आहे ते स्पष्ट करा?

२. मार्गदर्शनाचे कोणतेही चार तत्वे लिहा?

## १.५ मार्गदर्शनाची गरज (Need of Guidance)

बदलत्या समाजाच्या स्वरूपाकडे व वाढत्या औद्योगिक तंत्रज्ञानामुळे मानवासमोर अनेक समस्या निर्माण होतात. या समस्यांचे योग्यवेळी योग्य वयात निराकरण केले नाही तर गंभीर समस्या धारण करतात. म्हणून व्यक्तीला मार्गदर्शनाची गरज भासते. Lefever, Tussel. आणि Wetzel यांच्या मते, " मार्गदर्शन ही एक शैक्षणिक सेवा आहे. जी विदयार्थ्यांना शालेय प्रशिक्षण कार्यक्रमाचा अधिक प्रभावी वापर करण्यास मदत करण्या साठी तयार केलेली आहे. " म्हणुन मार्गदर्शन हा विदयार्थ्याच्या क्रियाशीलतेचा मुख्य घटक आहे. विदयार्थ्याच्या सर्वांगीण विकासासाठी तसेच शाळेला मदत करण्यासाठी मार्गदर्शन सेवांचे नियोजन व आयोजन केले जाते. मुलांना समजून घेणे, त्यांच्या गरजा पूर्ण करणे आणि त्यांचे कार्य अधिक प्रभावीपणे आणि कार्यक्षमतेने करणे. ही मार्गदर्शनाची मुख्य गरज आहे. मार्गदर्शनाची गरज अधोरेखीत अधोरेखित करणारे काही घटक खाली दिले आहेत.

- **विकासाच्या विविध अवस्था :-**

  व्यक्तीचे जीवन हे वेगवेगळ्या अवस्थांमध्ये विभागले गेलेले आहे. यामध्ये बाल्यावस्था, किशोरावस्था, पूर्व-पौगंडावस्था, पौगंडावस्था, तारुण्यावस्था यांचा समावेश होतो. म्हणून व्यक्तीला आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यांवर मार्गदर्शनाची आवश्यकता असते. त्यातल्या त्यात पौगंडावस्थेत जास्तीत जास्त मार्गदर्शन आवश्यक आहे.

- **व्यक्तीभिन्नता:** :-

  मानसशास्त्र आपल्याला सुचित करते की कोणतीही व्यक्ती एकसारखी नसते. शिवाय कोणत्याही दोन व्यक्तींना जीवनात समान संधी मिळत नाहीत. म्हणून प्रत्येक व्यक्तीला योग्य व्यवसाय शोधण्यासाठी मार्गदर्शनाची आवश्यकता असते.

- **करिअरच्या बदलत्या गरजा:-**

  सकारात्मक कार्यप्रवृत्तीच्या विकासासाठी मार्गदर्शन नक्कीच आवश्यक आहे. शिवाय, मार्गदर्शनाने व्यक्तीत कामासाठी किंवा व्यवसायासाठी आवश्यक असणाऱ्या चांगल्या सवयी व मुल्ये बिंबवली जातात. तसेच मार्गदर्शन व्यक्तीच्या काम व व्यवसायात जागरूकता वाढविण्यास मदत करते. त्याचबरोबर एखादी व्यक्ती मार्गदर्शनामुळे त्याच्या कामासाठी किंवा व्यवसायासाठी कार्यक्षमतेने नियोजन आणि तयारी करण्यास सक्षम बनते त्यासाठी व्यक्तीला मार्गदर्शनाची वेळोवेळी गरज मासते

- **शैक्षणिक वाढ:-**

  शैक्षणिक कौशल्य आणि क्षमतांच्या विकासासाठी मार्गदर्शन नक्कीच मदत करते. ही कोशल्य शिकणे आणि |साध्य करणे यासाठी मार्गदर्शनाची गरज भासते.

- **मानवी उर्जेचा योग्य वापर :-**

  मार्गदर्शन सेवाचा उपयोग करूण व्यक्ती व्यवसायाची किंवा कोर्सची योग्य निवड करून, प्रत्येक जीवनात योग्य प्रकारचे काम निवडू शकतो. अशाप्रकारे वरील सर्व मुद्द्यांचा विचार मार्गदर्शनाची गरज अभ्यासताना करावा लागतो.

**आपली प्रगती तपासा**

१. जीवनाच्या वेगवेगळ्या अवस्थेत (टप्प्यांवर) मार्गदर्शन का आवश्यक आहे ?

२. विदयार्थ्यांची वैयक्तिक सेवा म्हणून मार्गदर्शनाचे स्वरूप स्पष्ट करा

## १.६ मार्गदर्शनाचे महत्त्व

जीवन जगत असताना व्यक्तीसमोर अनेक समस्या निर्माण होत असतात या समस्येचे निराकरण करण्याच्या दृष्टीने मार्गदर्शन प्रक्रियेला अनन्यसाधारण महत्व आहे. दोन व्यक्ती बौद्धिक, शारीरिक, मानसिक क्षमताबाबत सारख्या असू शकत नाही. त्यांच्या गरजा व समस्या वेगवेगळ्या असतात. त्यासाठी त्यांना मार्गदर्शन हवे असते. मार्गदर्शनाचा हेतू व्यक्तीच्या समायोजन क्षमतेचा विकास करणे हा आहे. मार्गदर्शन प्रक्रियेचा संबंध मानवाच्या संपूर्ण जीवनाशी संबंधित आहे. जीवनात, मार्गदर्शन हे औपचारिक आणि अनौपचारिक स्वरूपात केले जाते. अनौपचारिक मार्गदर्शन हे व्यक्तीचे मित्र, समवयस्क, नातेवाइक यांच्याकडून होत असते तर अनौपचारिक मार्गदर्शन हे शाळा, महाविदयालयातील मार्गदर्शन सेवा व इतर संघटीत सेवा यांच्याकडून व्यक्तीला मिळत असते. पूर्वी दिले जाणारे मार्गदर्शन पद्धतशीर, नियोजित नव्हते. पालक शिक्षक किंवा अनुभवी हितचिंतकांकडून मुलाला सल्यांच्या स्वरूपात अनौपचारिक पद्धतीने मार्गदर्शन मिळायचे. परंतू कालांतराने वेगवान मानवी विस्फोट, औदयोगिकीकरणाचा प्रभाव, विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा विकास, अधुनिकतेचा परिणाम आणि सामाजिक बदल यामुळे मानवी जीवन अधिक जटिल बनले. ज्यामुळे त्याला नेहमी किंवा अधूनमधून मार्गदर्शनाचे कलेल्या मार्गदर्शनाची मदत घेण्यास

भाग पाडले. मार्गदर्शनाचे प्रमुख महत्व म्हणजे मदत देण्याच्या दृष्टीने केलेल्या रचना खालीलप्रमाणे दिलेल्या आहेत.

मार्गदर्शन ही एक गतिमान प्रक्रिया आहे, ती सातत्याने सुरू असते. या प्रक्रियेत व्यक्ती स्वताच्या क्षमता, अभिरुची, तसेच इतर योग्यता यांचा स्वतःला समजून घेण्यास मार्गदर्शन खूप मोठी भूमिका बजावते विविध परिस्थितींना तोंड देण्यासाठी, समायोजन करण्यासाठी, त्याचबरोबर स्वतःचा निर्णय स्वतःच घेण्यासाठी व्यक्तीला मार्गदर्शनाची गरज भासते. यावरून मार्गदर्शन मानवी जीवनात एक महत्त्वाचे स्थान व्यापत आहे हे दिसून येते. त्याचबरोबर अपवादात्मक मुलांना विशेष मदत आणि सुचना देण्यास अभ्यासाचे योग्य विषय निवडण्यास, योग्य व्यवसाय निवडणे व्यक्तीगत विकासाला दिशा देण्यासाठी - तसेच व्यक्तीच्या सर्वांगीण विकासासाठी मार्गदर्शनाचे व्यक्तीच्या जीवनात अनन्यसाधारण महत्त्व आहे. व्यक्ती सर्वदृष्टीने आपल्यामधील क्षमतांचा जास्तीत जास्त विकास करण्यास योग्य होते.

मार्गदर्शन हे व्यक्तीची प्रतिष्ठा आणि मुल्यांवर भर देते. मार्गदर्शन हे शैक्षणिक प्रक्रियेचा अविभाज्य भाग आहे. शैक्षणिक समस्यांचे निराकरण करण्यासाठी तसेच त्या समस्यांवर विशेष उपचार करण्यासाठी मार्गदर्शन मदत करते. शिक्षण हे समायोजन आहे आणि मागदर्शन समायोजनाला वाव देते. व्यक्तीच्या विकासाबरोबरच राष्ट्राचा विकास अवलंबून असतो, समाजाचे कल्याण अवलंबून असते. विकास साधण्यासाठी व्यक्तीला मदत करणे गरजेचे असते. व्यक्तीची जीवनपद्धती, दूरगामी ध्येये, मूल्ये याचा विकास करण्यासाठी मार्गदर्शनाचे कार्य मोलाचे आहे.

वरिल विश्लेषणावरून, व्यक्तीजीवनात व्यक्तीच्या विकासासाठी, समायोजनासाठी, समस्या निराकरणासाठी भावी जीवनाच्या तयारीसाठी, स्वत:च्या क्षमता विकसीत करण्यासाठी मार्गदर्शन हवे असते. यावरून व्यक्ती जीवनात मार्गदर्शनाचे महत्व अनन्यसाधारण आहे हे दिसून येते.

**आपली प्रगती तपासा**

१. मार्गदर्शन हा शिक्षणाचा अविभाज्य भाग कसा आहे ते स्पष्ट करा.

२. मानवी जीवनात मार्गदर्शनाचे महत्व सांगा.

**मार्गदर्शनाच्या संस्था (साधने) (Agencies for Guidance)**

संस्था (Agency) याचा संबंध एखादया organisation शी जोडलेला असतो. ज्या विशिष्ट सेवा पुरविण्याचे कार्य करतात. म्हणून मार्गदर्शनाच्या संस्था या व्यक्तींना मार्गदर्शन करण्याचे कार्य करतात. अशा संस्थेचे मुख्य उद्दिष्ट एखाद्या व्यक्तीच्या भविष्याला आकार देण्यास मदत करणे हे आहे. तसेच सामाजिक उपयुक्तता प्राप्त करण्यास देखिल सहाय्य करतात. मार्गदर्शनाच्या सर्वात महत्त्वाची संस्था म्हणजे घर आणि शाळा.

### १.७.१ घर मार्गदर्शन साधन (Home as an. Agency of Guidance)

एखादया व्यक्तीचे घर हे नक्कीच मार्गदर्शनाचे अत्यंत महत्वाचे साधन आहे. प्रत्येकासाठीच घर हे पहले मार्गदर्शनाचे स्त्रोत आहे. कारण लहानपणापासूनच बालकाला वेळोवेळी मार्गदर्शन हे घरातूनच मिळते. व ते बालकाच्या मनावर खूप खोलवर प्रभाव करत असते. घरातून मिळणाऱ्या मार्गदर्शनामुळे बालकाच्या शारिरिक, मानसिक, बौद्धीक विकास होण्यास मदत होते. 'घर' हे मार्गदर्शनाचे साधन म्हणून खालील प्रकारे कार्य करते

- **स्वभावाचे व्यक्तीमत्व :**

  Nature's personality

  व्यक्तीच्या विकासाची सुरूवात ही त्याच्या घरातूनच होत असते. घरात लहानपणापासून मुलांवर अनेक संस्कार होत असतात. त्यातूनच मुले स्वतःची भावना विकसीत करू लागतात. घरात मुलाचा संबंध हा आई, वडील, भावंडाशी येत असतो. मुले त्यांचे अनुकरण करुण आवाज, देहबोली, वागणे, चांगल्या गोष्टी, सवयी शिकत असतात. घरात पालकांकडून, वडीलधाऱ्या व्यक्तींकडून कळतनकळत मार्गदर्शनाचे घडे मुलांना मिळत असतात. व्यक्तीचा विकास होत असताना व्यक्ती घरातील इतर घटकांशी आंतरक्रिया घडत असते. त्यातून व्यक्तीच्या मार्गदर्शनातून तिच्या व्यक्तीमत्व विकासास हातभार लागतो. त्यामुळे व्यक्ती विकासात घराची भूमिका ही महत्वपूर्ण आहे हे दिसून येते.

- **नैतिक मूल्ये :**

  Ethical value:

  घरातूनच मुलांना नैतिकता व नैतिक मूल्यांचे शिक्षण मिळण्यास सुरुवात होते. मुलांवर कळत नकळत पालकांकडून, भावंडाकडून अनेक बरे वाईट संस्कार होत असतात. त्यातून मुले जीवन जगण्याची कला शिकत असतात घरातून मिळणाऱ्या मागदर्शनातून मुलांच्या अंगी असणाऱ्या सुप्त गुणांचा विकास होण्यास मदत होते. त्यामुळे घरातून मिळणाऱ्या संस्काराचा, मूल्यांचा व्यक्तीच्या मानसीकतेवर प्रचंड परिणाम होत असतो.

- **नियमांचे आकलन :**

  (Understanding of rules)

  मुलांना नियम आणि नियमांचे पालन करण्याचे महत्व याबद्दल घरातून मार्गदर्शन मिळत असते. पालकांनी ठरवून दिलेल्या मर्यादा व्यक्तीमध्ये नियम समजून घेण्याची भावना निर्माण करण्यास मदत करतात. त्याचबरोबर मुले जेव्हा चुका करतात किंवा नियम मोडतात, पालक त्यांना कदाचित शिक्षा देतात किंवा भविष्यात तसे कृत्य घडू नये यासाठी मार्गदर्शन करताना दिसतात.

**१.७.२ शाळा : मार्गदर्शनाचे साधन (School as an Agency of Guidance) :**

शाळा नक्कीच मार्गदर्शनाचे प्रमुख साधन आहे. कारण मार्गदर्शन हा शिक्षणाचा अत्यंत अविभाज्य भाग आहे. शिक्षण घेत असताना विद्यार्थ्यांना निश्चितपणे शिक्षकांच्या मदतीची आवश्यकता असते. शाळेकडून मिळणाऱ्या योग्य मार्गदर्शनाशिवाय कोणत्याही व्यक्तीचा विकास हा पूर्ण क्षमतेपर्यंत होऊ शकत नाही. शालेय मार्गदर्शन विदयार्थ्यांना योग्य करिअर योजना बनविण्यात मदत करते. चांगले शालेय मार्गदर्शन मिळाल्यामुळे विद्यार्थ्याच्या Career (करिअर) विकासाला चालना मिळते.

विदयार्थ्यांना शालेय मार्गदर्शन, पुढीलप्रमाणे मदत करते.

- शालेय मार्गदर्शनामूळे विद्यार्थ्यात असणाच्या क्षमतांचा जास्तीत जास्त विकास होण्यास मदत होते.
- कोणतेही कार्य करत असताना विद्यार्थ्यांच्या आवडी,क्षमता, गरजा यांचे मुल्यांकन करण्यास मदत होते.
- विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी योग्य आणि परिणामकारक योजना आखण्यासाठी शालेय मार्गदर्शनाची मदत होते.
- विद्यार्थ्याच्या योग्य शालेय करिअर निवडीबाबत योग्य निर्णय घेण्यासाठी शालेय मार्गदर्शनाची मदत होते.
- विदयार्थी घरात, शाळेत, समाजात समाधानकारक समायोजन करतात.
- विद्यार्थ्यांना स्वतच्या विकासासाठी, स्वतःला दिशा देण्यासाठी आत्म साक्षात्कार मिळवण्यासाठी मदत होते.

## १.८ सारांश

यामध्ये खालील घटकाचा समावेश आहे.

- मार्गदर्शन म्हणजे एखादया व्यक्तीला स्वतःला समजण्यासाठी स्वतःला दिशा देण्यासाठी, आणि पर्यावरणाशी जास्तीत जास्त जुळवून घेण्यास मदत करणारी प्रक्रिया आहे.
- मार्गदर्शनाची गरज :
  १. मार्गदर्शनाचा उद्देश एखादया व्यक्तीला स्वतःला समजून घेण्यासाठी शिक्षीत करणे आहे.
  २. मार्गदर्शन ही जीवनाशी संबंधित प्रक्रिया आहे.
- मार्गदर्शनाची तत्वे
  मार्गदर्शन करत असताना खालील तत्त्वे लक्षात घेतली पाहिजे.
  १. व्यक्तिचा सर्वांगीण विकास

२. व्यक्ती भिन्नता
३. व्यक्तीची क्षमता
४. पर्यावरण
५. मार्गदर्शन एक अखंड आणि अनुक्रमिक शैक्षणिक प्रक्रिया आहे.

- मार्गदर्शनाची गरज
  १. व्यक्ती भिन्नता
  २. शैक्षणिक वाढ
  ३. मानवी स्रोताचा योग्य वापर
- मार्गदर्शनाचे महत्त्व
- मार्गदर्शनाची साधने (Agencies)
  १. घर
  २. शाळा

**स्वाध्याय प्रश्नः**

**आपली प्रगती तपासा - I**

प्र. १ मार्गदर्शनाची गरज आणि महत्त्व स्पष्ट करा

प्र. २ "मार्गदर्शन म्हणजे सूचित करणे, निर्देश करणे आणि मार्ग दाखविणे याचा अर्थ मदत करण्यापेक्षा अधिक आहे" हे सिद्ध करा.

प्र. ३ मार्गदर्शनाच्या विविध तत्त्वांचे थोडक्यात स्पष्टीकरण दया.

प्र. ४ मार्गदर्शनाच्या स्वरूपाबद्दल टिप्पणी लिहा

प्र. ५ संक्षिप्त टिपा लिहा

अ. शाळा: मार्गदर्शनाचे साधन

ब. घर : मार्गदर्शनाचे साधन

❄❄❄❄❄❄❄

# २

# मार्गदर्शनाचे प्रकार

**घटक रचना**

२.१. उद्दिष्टे
२.२. प्रस्तावना
२.३. शैक्षणिक मार्गदर्शन
 २.३.१. शैक्षणिक मार्गदर्शनाची संकल्पना
 २.३.२. शैक्षणिक मार्गदर्शनाची गरज आणि महत्त्व
 २.३.३. शिक्षकांची भूमिका
२.४. व्यावसायिक मार्गदर्शन
 २.४.१. व्यावसायिक मार्गदर्शनाची संकल्पना
 २.४.२. व्यावसायिक मार्गदर्शनाची गरज आणि महत्त्व
 २.४.३. शिक्षकांची भूमिका
२.५. वैयक्तिक मार्गदर्शन
 २.५.१. वैयक्तिक मार्गदर्शनाची संकल्पना
 २.५.२. वैयक्तिक मार्गदर्शनाची गरज
 २.५.३. शिक्षकांची भूमिका
२.६. सारांश
२.७. प्रश्न
२.८. संदर्भ

## २.० उद्दिष्टे

या प्रकरणाचा अभ्यास केल्यानंतर आपणास पुढील बाबी स्पष्ट करता येतील.

- शैक्षणिक मार्गदर्शनाची संकल्पना स्पष्ट करणे.
- शैक्षणिक मार्गदर्शनाची गरज आणि महत्त्व समजणे.
- विविध प्रकारच्या मार्गदर्शनामध्ये शिक्षकांच्या भूमिकेचा आढावा घेणे.
- व्यक्तिगत मार्गदर्शन आणि व्यावसायिक मार्गदर्शनातील फरक स्पष्ट करणे.
- व्यावसायिक मार्गदर्शनाची गरज आणि महत्त्व स्पष्ट करणे.
- व्यक्तीगत (वैयक्तिक) मार्गदर्शनाच्या गरजेचे मुल्यांकन करणे.

## २.२ प्रस्तावना

कोणत्याही विद्यार्थ्याची शैक्षणिक प्रक्रियेची सुरुवात ही शैक्षणिक संस्थेत, शाळेत प्रवेश घेण्यापासून होते. सर्वांसाठी ही प्रवेश प्रक्रिया सोपी असेलच असे नाही. काही विद्यार्थ्यांना प्रवेश घेण्यात अडचणी येत असतात. कदाचित तुम्हाला देखील दूरस्थ शिक्षण प्रणालीमध्ये प्रवेश घेण्यात अडचण आली असेल. कधीकधी वैकल्पिक विषय निवडतानाही तुम्ही गोंधळलेल्या मनस्थितीत असू शकता. अशावेळी आपल्या जीवनातील महत्त्वाच्या बाबीवर योग्य निर्णय घेण्यासाठी आपल्याला बऱ्याच वेळा इतरांच्या मदतीची आवश्यकता असते. जसे शिक्षण, व्यवसाय, लग्न इत्यादी क्षेत्रात आपल्याला इतरांच्या मदतीची गरज भासते. मला खात्री आहे की तुमच्या सर्वांना अनेक क्षेत्रात अशाप्रकारचे अनुभव आलेच असतील. तुम्ही तुमच्या दैनंदिन संभाषणात मार्गदर्शन, मदत, गरज, निर्णय, सल्ला यांसारखे शब्द देखील वापरता. या घटकात तुम्हाला “मार्गदर्शन” या शब्दाबद्दल सखोल माहिती मिळेल. कधीकधी तुमच्यापैकी अनेकजणांना असेही वाटत असेल की आम्हाला इतरांच्या मदतीची गरज नाही. आम्ही आमचे काम व्यवस्थितपणे करू शकतो. काहीवेळा तुम्ही इतरांनी विचारलेल्या सोप्या प्रश्नावर हसतही असाल. परंतू आपल्यासाठी जे सोपे असते ते इतरांसाठी सोपे असेलच असे नाही. त्यांच्यासाठी ते कठीण असू शकते. त्यामुळे सर्वांना सारख्याच समस्या, गरजा असू शकत नाही. कोणाला एखादया क्षेत्रात गरज भासत असेल, तर इतराना दुसऱ्या क्षेत्रात मदतीची आवश्यकता लागते. सर्वांनाच आयुष्यात लहान - मोठ्या समस्यांना तोंड दयावे लागते. या समस्याची उकल करण्यासाठी व्यक्ती शिक्षक, पालक, मित्र, डॉक्टर, मार्गदर्शक, समुपदेशक याची मदत घेत असतो. त्यामूळे या घटकात आपण मार्गदर्शनाची संकल्पना, त्याची तत्वे, मार्गदर्शनाचे कार्य याबाबतीत अधिक माहिती मिळवणार आहोत.

- व्याख्या:

  ज्या सर्व क्रियांमुळे व्यक्तीच्या आत्मसाक्षात्कारास चालना मिळते. त्यास मार्गदर्शन असे म्हणतात.

- बर्नाड आणि फुलमर

  जीवन जगत असताना प्रत्येक व्यक्ती हा काहीना काही समस्यांनी घेरलेला असतो. अशावेळेस त्या समस्येची समाधानकारक उकल करणे हे इतरांच्या मदतीशिवाय खूप कठिण जाते. म्हणजे सर्वांनाच मदतीची गरज असते असे नाही. काही व्यक्ती अशाही असतात जे त्यांच्या समस्या स्वतःच सोडविताना दिसतात. त्यांना इतरांची मदत लागत नाही. परंतु काही व्यक्ती अशाही असतात ज्यांना सतत इतरांच्या मदतीची गरज भासते. अशाप्रकारच्या मदतीला तांत्रीक भाषेत ‘मार्गदर्शन’ असे म्हणतात. वेगवेगळ्या समस्या सोडविण्यासाठी आपल्याला विविध मार्गदर्शन सेवांची आवश्यकता असते.

पॅटरसनने (Paterson) पुढिल पाच प्रकारचे मार्गदर्शन सुचविले आहेत

१) शैक्षणिक मार्गदर्शन

२) व्यावसायिक मार्गदर्शन

३) व्यक्तीगत मार्गदर्शन

४) आर्थिक मार्गदर्शन

५) आरोग्य मार्गदर्शन

या घटकांत आपण शैक्षणिक, व्यावसायिक आणि व्यक्तीगत मार्गदर्शनाचा अभ्यास करणार आहोत. त्यांचा अर्थ काय आहे आणि त्यांच्या गरजा काय आहेत ते पाहुया.

## २.३ शैक्षणिक मार्गदर्शन

शैक्षणिक मार्गदर्शन ही एक प्रक्रिया आहे. ज्याच्या मदतीने विद्यार्थ्याला उच्चतम शैक्षणिक विकास साधता येतो. ते एकप्रकारचे मार्गदर्शन आहे जे फक्त विद्यार्थी वर्गाला दिले जाते. शैक्षणिक मार्गदर्शन विद्यार्थ्यांना योग्य पर्याय निवडण्यास मदत करते. त्याचबरोबर शैक्षणिक जीवन, शालेय अभ्यासक्रम, वेगवेगळी Courses निवडण्यास व त्यात समायोजन करण्यास मदत करते. ज्यामुळे विदयार्थ्याचा सर्वांगीण विकास घडून येण्यास मदत होते.

### २.३.१ शैक्षणिक मार्गदर्शनाची संकल्पना :

शैक्षणिक मार्गदर्शनाची व्याख्या:

“शैक्षणिक मार्गदर्शन म्हणजे एखादया व्यक्तीच्या बौद्धिक वाढीस मदत करण्याचा केलेला जाणीवपूर्वक प्रयत्न होय."

- ब्रेव्हर (Brewer)
  "शाळा, अभ्यासक्रम, पाठ्यक्रम आणि शालेय जीवनाशी निगडीत निवड व समायोजन या संदर्भात करावयाच्या मदतीशी शैक्षणिक मार्गदर्शन संबंधित असते.”

- ऑर्थर जे जोन्स (Arther J. Jones)
  " प्रत्येक मुल कशासाठी योग्य आहे. कोणत्या प्रकारचे शिक्षण व योग्यता त्याला प्राप्त होऊ शकतात. आणि त्या विकसीत होण्यास ज्या ज्या व्यक्तींचा समावेश ज्या उपक्रमात होतो ते शैक्षणिक मार्गदर्शन होय.

- रूथ स्ट्राँग (Ruth Strong)
  "शैक्षणिक मार्गदर्शन ही एक प्रक्रिया आहे. जी विद्यार्थ्यांत वैशिष्ट्यपूर्ण विकास घडवून आणते तर दुसरीकडे वेगवेगळ्या संधी, गरजांतून विद्यार्थ्यांत अनुकूल वातावरण विकसित करण्यास मदत करते.

- मेयर्स (Myers)

  "शैक्षणिक मार्गदर्शन प्रामुख्याने विद्यार्थ्याच्या शैक्षणिक कारकीर्दीतील यशाशी संबंधित आहे. हे विदयार्थ्याच्या शाळेत समायोजन आणि त्याच्या शैक्षणिक गरजा, क्षमता, आणि करिअरच्या आवडी लक्षात घेवून योग्य शैक्षणिक योजना तयार करणे आणि त्या पार पाडण्याशी संबधित आहे"

- डन्समूर आणि मिलर (Dunsmoor & Miller)

### २.३.२ शैक्षणिक मार्गदर्शनाची गरज आणि महत्व

विदयार्थ्याला शैक्षणिक मार्गदर्शनाची गरज भासते हे वरिल व्याख्यांच्या विश्लेषणातून दिसून येते. अशा मार्गदर्शनाचे औचित्य सिद्ध करण्याची कारणे आपण खालील प्रकारे सांगू शकतो.

**१. व्यक्तीभिन्नता:**

व्यक्तीभिन्नतेमुळे प्रत्येक विदयार्थ्यात असणारी बुद्धीमत्ता, अभिरूची, योग्यता, सर्जनशीलता या क्षमतांमध्ये फरक आढळून येतो. आपल्या क्षमतेनुसार अभ्यासक्रमाची, पाठयक्रमाची किंवा वैकल्पिक विषयाची निवड करण्यासाठी विद्यार्थ्याला शैक्षणिक मार्गदर्शनाची गरज भासते.

**२. विदयार्थी गळती व स्थगिती रोखण्यासाठी:**

जेव्हा विद्यार्थी एकाच वर्गात अनेक वर्षे राहतात तेव्हा त्यास 'स्थगिती असे म्हणतात. तर शालेय जीवनात विदयार्थी शालेय अभियोग्यता किंवा साक्षरता प्राप्त करण्यापूर्वीच शाळा सोडून देतात त्यास 'गळती' असे म्हणतात. ग्रामीण भागात मुलींमध्ये गळतीचे प्रमाण जास्त आढळते. स्थगिती व गळती कशी रोखता येईल यासाठी शैक्षणिक मार्गदर्शनाची गरज भासते.

**३. योग्य वैकल्पिक अभ्यासक्रमाची निवड :**

जवळजवळ प्रत्येक शिक्षणप्रणाली ही दोन गृहीतकावर आधारित असते. पहिली गोष्ट म्हणजे प्रत्येक विदयार्थ्याने जास्तीत जास्त स्व - विकासासाठी प्रयत्न केले पाहिजेत आणि दुसरे म्हणजे प्रत्येक विद्यार्थ्याने उपयुक्त सदस्य म्हणून या समाजात आपले स्थान निर्माण केले पाहिजे. या दोन गृहीतकाचा अर्थ असा आहे की विद्यार्थ्यांच्या शाळा आणि सामाजिक क्रिया या निश्चित पॅटर्नवर अधारित असावेत. शैक्षणिक मार्गदर्शन सेवांनी योग्य पर्याय निवडून मुलाला हे लक्ष साध्य करण्यासाठी मदत केली पाहिजे. विदयार्थ्यांना, शिक्षण घेत असताना विषय कोणता निवडावा, कोणता वैकल्पिक विषय निवडावा अशा अनेक समस्या निर्माण होत असतात. अशावेळी वैविध्यपूर्ण अभ्यासक्रमातून त्यांना विषयाची, उपक्रमाची निवड करावी लागते. काहीवेळा विद्यार्थ्याचा निर्णय चुकीचा ठरू शकतो. म्हणजेच अभ्यासक्रमाची, पाठयक्रमाची किंवा उपक्रमाची चुकीची निवड केल्यामुळे ती त्याच्या कारकीर्दीला

नुकसान पोहचू शकते. म्हणून विद्यार्थ्यांना अभ्यासक्रम सह-अभ्यासक्रम पाठयक्रम, बोलण्याच्या शैली शिकण्याच्या पद्धती, लेखन आणि वाचन, अभ्यासासाठी पुस्तकें निवडण्यासंदर्भात योग्य मार्गदर्शन केले पाहिजे.

**४. योग्य शैक्षणिक समायोजनाची गरज:**

विदयार्थ्यांच्या योग्य शैक्षणिक विकासासाठी आणि कल्याणासाठी प्रचलित शैक्षणिक वातावरणात समायोजन आवश्यक आहे. मुल त्याच्या घरच्या वातावरणातून थेट शाळेत प्रवेश करतो. येथे त्याला शिक्षणाचे औपचारिक वातावरण मिळते. आणि त्याला असे अनुभव मिळतात जे त्याच्यासाठी अगदी नवीन आणि विचित्र आहेत. त्याला या शैक्षणिक परिस्थिती आणि या सभोवतालच्या परिस्थितीशी जुळवून घेणे आवश्यक असते. त्याला वाचन, लेखन, बोलणे आणि शिक्षण प्रक्रियेत भाग घ्यावा लागतो. ड्रिल वर्क, होम असाइनमेंट पूर्ण करावी लागतात. अभ्यासेत्तर कार्यक्रमात भाग घ्यावा लागतो. शैक्षणिक प्रक्रियेत नियमितता आणि वक्तशिरपणा पाळला पाहिजे. त्याचबरोबर विद्यार्थ्याला नव नवीन तंत्रे आणि शिकवण्याच्या साधणांचाही उपयोग करावा लागतो. तसेच मुल्यमापणासाठी चाचण्या तयार कराव्या लागतात. अशाप्रकारे, शालेय वातावरणात विदयार्थ्यांना अनेक समायोजन समस्यांचा सामना करावा लागतो. आणि म्हणून त्याला योग्य शैक्षणिक मार्गदर्शनाची आवश्यकता असते.

**५. पुढील शिक्षणाचा निर्णय:**

सध्याच्या शिक्षण पद्धतीतील विदयार्थी उच्च शिक्षणासाठी स्वतःच्या योग्यतेची पर्वा न करता उच्च शिक्षणासाठी महाविद्यालये, विद्यापीठांकडे धाव घेतात. यापैकी बऱ्याचजणांना व्यावसायीक अभ्यासक्रमाची, प्रशिक्षणाचे योग्य ज्ञान नसते. त्यामुळे विद्यार्थ्यांना अनेक समस्या निर्माण होतात. या समस्या टाळण्यासाठी उच्च शिक्षण घेण्यापूर्वी विद्यार्थ्याच्या योग्यतेसंदर्भात योग्य मार्गदर्शन करण्याची मोठी गरज आहे.

**६. ग्रेड बनवणे:**

शैक्षणिक मार्गदर्शनाची आवश्यकता असलेले आणखी एक महत्त्वाचे क्षेत्र म्हणजे विदयार्थ्यांना निवडलेल्या अभ्यासक्रमात समाधानकारक प्रगती करण्यास मदत करण्याचे क्षेत्र. आपल्या देशात, शैक्षणिक मार्गदर्शनाच्या अभावामुळे मोठ्या संख्येने विद्यार्थी शाळा, महाविद्यालये आणि विदयापीठांमध्ये नापास होतात.

**७. अपवादात्मक मुलाचे शिक्षण:**

साधारणपणे आपल्या शाळेत शिक्षक हे सरासरी विद्यार्थ्याचा विचार मनात ठेवून शिकवत असतात. जे हुशार, हळू शिकणारे, मूकबधीर, शारीरिक मानसिकदृष्ट्या अपंग आहेत त्यांना या शिकवण्याचा फायदा होत नाही. जर आपल्याला व्यक्ती

आणि सामाजिक विकास साधायचा असेल तर अपवादात्मक मुलांच्या विविध श्रेणीसाठी देखील शैक्षणिक मागदर्शन देणे खूप गरजेचे आहेत.

### २.३.३ शिक्षकांची भूमिका:-

मार्गदर्शन कार्यकर्ता (मार्गदर्शक) वेगवेगळ्या चाचण्या, व्यक्तीगत मुलाखती इत्यादीच्या मदतीने विद्यार्थ्याची मानसिक क्षमता, आवड अभिरूची इ. शोधण्याचा प्रयत्न करतो. ज्यायोगे तो विद्यार्थी ज्यात सक्षम आहे त्याची माहीती काढून त्यास योग्य प्रकारचा अभ्यासक्रम सुचवितो. शैक्षणिक मार्गदर्शनाच्या प्रक्रियेत, मार्गदर्शनाचे सर्वसाधारणपणे तीन टप्पे समाविष्ट असतात.

a. माहिती किंवा डेटा गोळा करणे :- (Collecting information or Data) पहिल्या टप्प्यात लोकांशी संबंधित संपूर्ण माहीती किंवा डेटा गोळा करणे आवश्यक आहे. त्यासाठी खालीलप्रमाणे माहिती गोळा केली जाऊ शकते.

विद्यार्थ्याच्या आरोग्यविषयक व शरीरासंबंधीत माहीती गोळा करणे.

- त्याची बुद्धीमत्ता व इतर आकलन क्षमतांची माहिति मिळवणे.
- त्याच्या शैक्षणिक प्राप्तीविषयी माहिती मिळवणे.
- त्याच्या आवडी, क्षमता, योग्यता, दृष्टीकोन आणि इतर व्यक्तीमत्व वैशिष्ट्यांविषयी माहीती मिळवणे.
- कौटुंबिक इतिहास आणि पार्श्र्वभूमीविषयी माहीती मिळवणे.
- त्याच्या सामाजिक आणि भावनिक विकासाची माहिती मिळवणे.
- विद्यार्थ्याच्या पूर्वीच्या शाळेविषयक माहीती मिळवणे.
- विद्यार्थ्यांचा समवयस्क गट आणि मित्रांविषयी माहिति मिळवणे. वरिल माहिती मिळवण्यासाठी व्यक्तीमत्व चाचण्या, बुद्धिमत्ता चाचण्या, अभियोग्यता चाचण्या, मुलाखती, प्रश्नावली रेटींग स्केल, निरिक्षणे इत्यादी विविध तंत्रांचा उपयोग माहिती किंवा डेटा गोळा करण्यासाठी केला जातो.

**b. मार्गदर्शन करणे (Rendering Guidance):-**

मार्गदर्शन म्हणजे प्रत्येक व्यक्ती समाजाची एक - एक उपयुक्त घटक बनु शकेल आणि स्वत:च्या जीवनात आनंद व समाधान प्राप्त करू शकेल या दिशेने मार्मीकपणे निर्णय घेणे. ज्यांना मार्गदर्शनाची गरज आहे त्यांना मार्गदर्शन करणे, त्यातल्या त्यात मार्गदर्शन करणे हे अवघड काम आहे. त्यासाठी कुशल व्यक्तींचीच मार्गदर्शनासाठी निवड करावी लागते. मार्गदर्शन करताना मार्गदर्शक व्यक्तीची माहिती विविध चाचण्या, वेगवेगळी तंत्रे वापरून मिळवितो. या मिळवलेल्या माहितीचे मार्गदर्शकाद्वारे विश्लेषण करणे आवश्यक असते. आणि मिळवलेल्या माहितीच्या

आधारावर व्यक्तीच्या व्यक्तीमत्व आणि समायोजनाबद्दल निष्कर्ष काढणे गरजेचे असते. या निष्कर्षाचा वापर करून व्यक्तीस योग्य मार्गदर्शन करण्यास मदत होते.

**c. पाठपुरावा करणे (Follow up program) :-**

मार्गदर्शनाच्या या टप्प्यात मार्गदर्शन प्रक्रियेची परिणामकारकता तपासली जाते. म्हणजेच मार्गदर्शकाचे काम फक्त मार्गदर्शन करणे एवढेच नसून समस्येचे निराकरण झाले आहे किंवा नाही याबाबतीत पाठपुरावा करणे हे देखील असते. या प्रक्रियेत मुलाने केलेल्या प्रगतीचे मुल्यमापन केले जाते. मिळालेल्या मुल्यमापनाच्या आधारावर त्याला पुढील मार्गदर्शनासाठी आवश्यक पावले उचलली जातात त्याचबरोबर पुर्वीच्या मार्गदर्शनात आवश्यक बदल केले जातात. प्रत्येक परिस्थतीत पाहणे आवश्यक असते की, मूल त्याच्या समस्येचे निराकरण योग्य पद्धतीने करत आहे ना, त्याचा विकास करण्यास तो पूर्णपणे सक्षम आहे ना आणि व्यक्तीला समाजव्यवहार ज्ञान प्राप्त झाले आहे. म्हणजेच व्यक्ती समाजात राहुन स्वतःशी, इतरांशी आणि परिस्थितीशी समायोजन करत असेल तेव्हाच आपण मार्गदर्शन कार्यक्रमाच्या यशाबददल विचार करू शकतो.

- आपली प्रगती तपासा.

  १. शैक्षणिक मार्गदर्शन परिभाषित करा.

  २. शैक्षणिक मार्गदर्शनात शिक्षकांच्या भूमिकेवर चर्चा करा.

## २.४ व्यावसायिक मार्गदर्शन

व्यावसायिक मार्गदर्शन म्हणजे एखादया व्यक्तीला व्यवसाय निवडणे, उद्योग निवडणे, त्यासाठी तयारी करणे, एखादया व्यवसायात प्रवेश करणे यासाठी केलेली मदत होय. दुसऱ्या शब्दात सांगायचे झाले तर, एखादया व्यक्तीस समाधानकारक व्यावसायिक समायोजन करण्यास मदत करणे.

२.४.१ व्यावसायिक मार्गदर्शनाची संकल्पना :-

दैनंदिन जीवनात आपण आपल्या सभोवती अनेक व्यक्ती बघत असतो. प्रत्येक व्यक्ती ही दुसऱ्या पेक्षा वेगळी असते. तिच्या दिसण्यात वागण्यात, बोलण्यात, आवडीत, क्षमतेत आपल्याला भिन्नता दिसून येते. तसेच प्रत्येक व्यक्तीचे व्यवसायही वेगवेगळे असतात. म्हणजे सर्व व्यक्ती एकसारखा व्यवसाय करू शकत नाही. व्यक्तींच्या आवडीनुसार, क्षमतेनुसार व्यवसाय निवडले जातात. सर्व व्यक्ती सर्व व्यवसायाला योग्य असू शकत नाही. प्रत्येक व्यवसायाला विशिष्ट पार्श्वभूमी, तयारी आणि योग्यतेची आवश्यकता असते. आणि तेच यशस्वी होऊ शकतात. व्यावसायिक मार्गदर्शकाचे कार्य पुढिलप्रमाणे आहे.

१. कोणती पदे, नोकऱ्या उपलब्ध आहे, आणि त्यांची आवश्यकता काय आहे ते शोधणे.

२. निरीक्षणाखाली असणारी व्यक्ती त्या अटींची पूर्तता करते आहे की नाही त्याचा शोध घेणे. या ठिकाणी मार्गदर्शकाला अनेक सूचना दिल्यानंतरही निरीक्षण करणे चालू ठेवावे लागते. आणि काहीवेळा पुन्हा समायोजन देखील करावे लागते. मुख्यता माध्यमिक शाळांच्या टप्प्यावर या विशिष्ट प्रकारच्या मार्गदर्शनाची सर्वाधिक गरज असते. कारण या टप्प्याच्या शेवटी, विद्यार्थी सहसा व्यावसायिक प्रशिक्षण संस्थेत प्रवेश घेतात.

- व्याख्या : नॅशनल व्होकेशनल गाईडन्स असोसिएशन (यू. एस. ए ) (National Vocational Guidance Association) U.S.A.

  या संस्थेने १९५४ मध्ये स्वीकारलेल्या व्याख्येनुसार, “व्यावसायिक मार्गदर्शन म्हणजे एखादा व्यक्तीला एखादा व्यवसाय निवडणे, त्यासाठी तयारी करणे, त्यात प्रवेश करणे आणि त्यात प्रगती करण्यास मदत करण्याची प्रक्रिया होय"

  इंटरनॅशनल लेबर ऑर्गनायझेशनची परिषद (१९५४)

  Conference of International Labour Organisation

  “व्यावसायीक मार्गदर्शन म्हणजे एखादया व्यक्तीला व्यवसाय निवड आणि प्रगतीशी संबंधित समस्यांचे निराकरण करण्यासाठी व्यक्तीची वैशिष्ट्ये आणि व्यवसायाच्या संधीशी त्यांचा संबंधित लक्षात घेऊन केलेली मदत."

  “व्यावसायिक मार्गदर्शन ही व्यक्तीने त्याच्या व्यवसायातील आवश्यक अशा काही विशिष्ट गोष्टी स्वत:च करण्यासाठी सहकार्य करण्याची प्रक्रिया आहे.”

  जी ई मायर्स (G.E Myers)

  “व्यावसायिक मार्गदर्शन हे मूलतः तरुणांच्या अमुल्य मूळ क्षमता, आणि शाळांमध्ये युवकांना दिले जाणारे महागडे प्रशिक्षण जपण्याचा प्रयत्न आहे. हे सर्व मानवी संसाधनांपैकी सर्वात उच्च संसाधन असून त्यांचे संवर्धन करण्याचा प्रयत्न करते. जेथे ते स्वतःला सर्वात जास्त समाधान आणि यश आणि समाजाला सर्वात जास्त लाभ देतात"

  अशाप्रकारे व्यावसायिक मार्गदर्शन हे एक प्रकारचे मार्गदर्शन आहे जे व्यक्तीच्या व्यावसायिक गरजा व समस्यांशी संबंधित आहे. थोडक्यात, व्यवसाय मार्गदर्शनात व्यक्तीला व्यवसायाच्या निवडीसंबंधी सहाय्य, त्याच्या मानासिक, शारीरिक बौद्धिक योग्यतांचे मुल्यमापन व त्यासंबंधी जाणीव करून देण्यात येते. व्यवसाय मार्गदर्शन ही एक प्रक्रिया असून ती तरुणांना समाधानाने भावी जीवन जगण्यास मार्गदर्शन करण्यास वचनबद्ध असते.

**२.४.२ व्यावसायिक मार्गदर्शनाची गरज आणि महत्त्व:-**

विविध व्यवसाय, त्यांचे बदलणारे स्वरूप, वाढते तंत्रज्ञान, जागतिकीकरण अशा बदलणाऱ्या वर्तमान जगात व्यावसायिक मार्गदर्शनाची गरज आणि महत्व खालील मुद्द्यांच्या आधारे स्पष्ट करता येईल.

(Looking forward to a better future)

१. चांगल्या भविष्यासाठी व्यावसायिक मार्गदर्शनाकडे बघणे :

एखादया व्यवसायात पदार्पण करणे सोपे असते परंतु त्यात यशस्वीरित्या, समाधानकारकरित्या टिकून राहणे महत्वाचे असते. यासाठी तरुणांना शिक्षण देणे, प्रशिक्षीत करणे आवश्यक असते. त्याचबरोबर त्यांच्याकडे शिक्षण आणि प्रशिक्षणात विस्तृत संधी असणे आवश्यक आहे. निवडलेल्या व्यावसायात प्रगती कशी करावी यासाठी व्यावसाय मार्गदर्शनाची गरज असते.

२. घरातून सुरुवात : (Beginning at Home) :

कोणत्याही प्रक्रियेची सुरुवात ही घरातून होत असते. व्यवसायाच्या यशावर घराचे सुख, समाधान अवलंबून असते. व्यवसायातील यश- अपयशाचा परिणाम हा कौटुंबीक जीवनावर होत असतो. लोकांच्या अपेक्षा आणि आकांक्षा तयार करण्यात कुटूंब आणि मित्रांची महत्वपूर्ण भूमिका असते. व्यावसायीक जीवन आणि कौटुंबीक जीवनात समतोल राखण्यासाठी पालकांनी आपले मूल काय करत आहे, त्याने निवडलेल्या व्यवसायात पूर्णपणे सहभाग घेवून मार्गदर्शन करणे आवश्यक असते.

३. शाळेचे सातत्य (continuation of Schools) :

विद्यार्थ्यामध्ये लहानपणापासून अपेक्षा आणि क्षमता विकसीत करण्यात शाळा महत्त्वाची भूमिका बजावतात. चांगली शाळा स्वः जागरूकता, इतरांबरोबर काम करण्याची क्षमता, पुढाकाराची वृत्ती, तसेच उत्तम गुणांची भावना विद्यार्थ्यांमध्ये रुजविण्याचे कार्य करते, जी विद्यार्थ्यांसाठी प्रत्येक परीक्षा मुल्यांकनाप्रमाणे मौल्यवान असतात. शाळेने विद्यार्थ्यांसाठी तयार केलेला अभ्यासक्रम हा व्यापक आणि संतुलित असणे गरजेचे असते. त्याचबरोबर अभ्यासक्रम सर्वसमावेशक असला पाहिजे जेणेकरूण व्यक्तीभेद म्हणजेच लिंग, वाशिक मूळ, अपंगत्वाची पर्वा न करता तो सर्वांसाठी समान असणे आवश्यक आहे. ज्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्याचा विकास साधला जाऊ शकतो.

४. व्यावसायिक यश (vocational success):-

विदयार्थ्यांना प्राथमिक वर्षापासूनच व्यवसाय जगताची माहिती देणे सुरू केले पाहिजे. यामुळे विद्यार्थ्यात व्यवसायाबाबत अंतर्दृष्टी निर्माण होण्यास मदत होते. विद्यार्थ्याला व्यवसायासंबंधी माहिती पुरवून चालत नाही. तर त्याला योग्य असा

व्यवसाय निवडण्यासाठी कृती योजना आखावी लागते. अशी कृती योजना तयार करण्यास मदत करण्यासाठी व्यवसाय मार्गदर्शनाची गरज असते. व्यावसायिक यशासाठी विश्वासार्ह माहिती आणि संवेदनशील मार्गदर्शन सर्वांसाठी योग्य वेळी उपलब्ध करणे आवश्यक आहे.

५. विषयाची निवड : (choice of subjects) :-

शालेय शिक्षण पूर्ण झाल्यानंतर विद्यार्थ्याला पुढिल शिक्षणासाठी महाविदयालयात प्रवेश घ्यावा लागतो. तिथे विद्यार्थ्यांसमोर अनेक पर्याय उपलब्ध असतात. स्वत:च्या अभिरुची आणि क्षमतेनुसार विद्यार्थ्याला पुढिल अभ्यासासाठी योग्य पर्यायांची निवड करावयाची असते. या शिक्षण प्रक्रियेत प्रवेश घेण्यापूर्वी विद्यार्थी पूर्णपणे तयार असणे आवश्यक आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांची कुवत लक्षात घेवून त्याच्या भावी व्यावसायिक यशासाठी त्याने कोणता विषय निवडावा यासाठी विदयार्थ्याला व्यावसायीक मार्गदर्शन करणे आवश्यक आहे.

६. निवडीसाठी माहिती : (Information for choice) :-

शालेय शिक्षण पूर्ण केल्यानंतर विदयार्थी महाविद्यालयीन शिक्षण घेण्यासाठी तो पूर्णपणे तयार असला पाहिजे. हे शिक्षण घेत असताना त्याचे वय जवळपास १६ वे १७ असते. यावेळी विद्यार्थ्याला महत्त्वाचे निर्णय घ्यायचे असतात. जसे शाळेत राहणे, महाविदयालयात जाणे, व्यावसायीक प्रशिक्षण घेणे त्याचबरोबर नोकरी बाबत योग्य आणि महत्त्वाचे निर्णय घ्यावयाचे असतात. यासाठी योग्य पर्याय निवडण्यासाठी येथे विद्यार्थ्याला मार्गदर्शनाची गरज भासते.

७. पर्यायातून निवड (choice among option):-

शाळा किंवा महाविद्यालय सोडणाऱ्या विदयार्थ्यांना त्यांच्यासाठी उपलब्ध असणाऱ्या सर्व पर्यायांची वास्तववादी माहिती देणे आवश्यक असते. त्यानंतरच्या टप्प्यांवरही, विद्यार्थ्यांना संबंधित, विश्वासार्ह आणि पूर्ण माहिती आणि पर्याय निवडीबाबत कुशल मार्गदर्शन विद्यार्थ्यांना देणे आवश्यक आहे.

८. आरोग्यावर विपरीत परिणाम (Adverse effect on Health):-

व्यक्तीला तिला आवडणारे काम दिले नाही तर तसे काम करताना तिच्या आरोग्यावर परिणाम होतो. तसेच काही व्यवसाय आणि आरोग्य यांचा निकटचा संबंध असतो. काही ठिकाणी शारीरिक इजा होण्याचा धोका असतो जसे एखाद्या कामगाराला काम करत असताना डोळ्याला इजा झाल्यास त्याच्या दृष्टीवर विपरीत परिणाम होवू शकतो. त्याचबरोबर एखादी व्यक्ती त्याच्या क्षमतेपेक्षा जास्त उत्पादन गती राखण्यासाठी प्रयत्न करत असेल तर त्याचा विपरीत परिणाम त्या व्यक्तीच्या मज्जासंस्था बिघडण्यावर दिसून येतो. हे टाळण्यासाठी व्यक्तीला व्यावसायिक मार्गदर्शनाची खूप गरज असते.

९. मानवी क्षमतांचा वापर (Utilization of Human Potentialities):-

काही व्यक्तीच्या अंगी अव्यक्त सामर्थ्य असते. अशा व्यक्तींना योग्य संधी, योग्य व्यवसाय मिळाला तर ते आपली कर्तबगारी सिद्ध करतात आणि त्या व्यक्तीच्या अंगभूत क्षमता व सूप्त उर्जेचाही वापर होतो. त्यासाठी मार्गदर्शनाची गरज भासते.

१०. व्यक्तिभेद (Individual Differences):-

प्रत्येक व्यक्ती ही दुसऱ्या व्यक्तीपेक्षा वेगळी असते. 'व्यक्ती तितक्या प्रकृती' असे म्हटले जाते. व्यक्तीची क्षमता, अभिरूची, अभियोग्यता, कौशल्ये ही दुसऱ्या व्यक्ती पेक्षा भिन्न असतात. त्यांच्या योग्यतेप्रमाणे त्यांना मार्गदर्शन करणे गरजेचे असते.

### **२.४.३ शिक्षकांची भूमिका : Role of Teachers:-**

शैक्षणिक मार्गदर्शनाप्रमाणे व्यावसायिक मार्गदर्शनाचे कार्य देखील तीन टप्प्यांमध्ये पूर्ण केले जाऊ शकते.

१) माहिती किंवा डेटा गोळा करणे

२) या माहितीच्या आधारावर मार्गदर्शन करणे

३) फॉलो -अप प्रोग्राम (अनुधावन)

१. माहिती किंवा डेटा गोळा करणे (Collecting of Information or Data) मुलांच्या स्वभावाशी संबंधित जसे त्याची क्षमता, अभिरूची, प्रवृत्ती, व्यक्तीमत्वाची वैशिष्ट्ये आणि जीवनाची परिस्थिती यासारखी माहीती काळजीपूर्वक मिळवावी लागते. दुसरीकडे, मार्गदर्शक कामाबाबतीत आणि नोकरीच्या संधीविषयी पुरेशी आणि संबंधित माहिती मिळविण्याचा प्रयत्न करत असतो. त्याचबरोबर तो सदयस्थितीतील साहित्य आणि प्रकाशनांशी संपर्क साधून तो स्वतः माहिती मिळवितो. त्याचे एम्प्लॉयमेंट ब्युरो, मार्गदर्शन आणि समुपदेशनाचे राज्य आणि केंद्रीय ब्युरो तसेच रोजगार बाजाराच्या सद्यस्थितीतील प्रचलित मागणी आणि पुरवठ्याबाबतीत त्याच्या चांगल्या ओळखी असतात.

२. माहितीच्या आधारावर मार्गदर्शन करणे: Rendering guidance on the basis of this Information.:- येथे विद्यार्थ्यांना व्याख्यान, साहित्य प्रदर्शन, पुस्तक किंवा ग्रंथालय वाचनाद्वारे कामाबद्दल आणि नोकरीच्या संधीबद्दल माहिती दिली जाते. त्यांना त्यांच्या व्यक्तीगत वैशिष्ट्यांशी जुळणाऱ्या नोकरी आणि व्यवसायाबाबत माहिती देण्यात मदत केली जाते. त्याबरोबर त्यांच्या व्यावसाय निवडीशी संबंधित अभ्यासक्रम आणि उपक्रम निवडण्यात देखील मदत केली जाते. तसेच रोजगाराच्या संधीबाबत पुरेशी माहिती देणे त्याच्या आवडीच्या व्यवसायात प्रवेश करण्यास मदत करण्याची जबाबदारी व्यावसायिक मार्गदर्शकाची असते. रोजगार संस्थेशी मार्गदर्शकाचे घनिष्ठ संपर्क असतात. काही बाबतीत व्यावसायीक मार्गदर्शनामुळे स्वयं

रोजगार मिळण्यास मदत होते. या सर्व प्रकारचे कार्य सक्रिय व्यावसायिक मार्गदर्शन आणि पाठपुरावा कार्यक्रमाच्या क्षेत्रात येतात.

३. पाठपुरावा कार्यक्रम (follow - up Programme):- एखादया व्यवसायात पदार्पण करणे सोपे असते परंतू त्यात यशस्वीरित्या समाधानकारकरित्या टिकून राहणे महत्त्वाचे असते. कोणत्या व्यवसायात आर्थिक उत्पन्न जास्त मिळू शकेल, उत्पादन खर्चापेक्षा जास्त नफा कोणत्या व्यवसायात मिळण्याची जास्त शक्यता आहे. यासाठी मार्गदर्शना बरोबरच पाठपुरावा करणे देखील खूप महत्वाचे असते. अशा फॉलो अप प्रोग्रामद्वारे एखादयाला त्याच्या. व्यवसायाच्या योग्य समायोजनासाठी मदत केली जाऊ शकते.

अशाप्रकारे विदयार्थ्यांना व्यावसायिक मार्गदर्शनाचे काम खूप व्यापक आणि कष्टाचे आहे हे दिसून येते हे कार्यशाळेतील करिअर मास्टर्स किंवा शाळेतील नियुक्त मार्गदर्शकांवर सोडले जाऊ शकत नाही तर पालक, शिक्षक आणि संस्थाप्रमुखांनीही विद्यार्थ्यांना व्यावसायिक मार्गदर्शन देण्याची योग्य भूमिका बजावली पाहिजे. या सेवांमधून जास्तीत जास्त लाभ मिळवण्यासाठी शाळेतील मार्गदर्शन सेवा योग्यरित्या स्थापित केल्या पाहिजे.

- आपली प्रगती तपासा

    १. व्यावसायिक मार्गदर्शनाची गरज आणि महत्व यावर चर्चा करा.

    २. व्यावसायिक मार्गदर्शन परिभाषित करा.

## २.५ वैयक्तिक मार्गदर्शन / व्यक्तीगत मार्गदर्शन (Personal Guidance) :

नावाप्रमाणेच, व्यक्तीगत मार्गदर्शन म्हणजे एखादया व्यक्तीला त्याच्या वैयक्तिक समस्या सोडविण्यासाठी दिले जाते. या संघर्ष आणि स्पर्धेच्या जगात, एखादयाला त्याच्या व्यक्तीगत गरजा पूर्ण करण्यासाठी खूप प्रयत्न करावे लागतात. त्यासाठी त्याला भिन्न परिस्थितीमध्ये अनेक पैलूंमध्ये समायोजन करावे लागते,

### २.५.१ व्यक्तीगत मार्गदर्शनाची संकल्पना:-

शैक्षणिक व व्यावसायिक मार्गदर्शना व्यतिरिक्त काही समस्या ह्या मानवी जीवनाशी संबंधित असतात. त्या समस्या ह्या व्यक्तीगत स्वरूपाच्या असतात. अशा समस्यांविषयी केलेले मार्गदर्शन म्हणजे व्यक्तीगत मार्गदर्शन होय. व्यक्ती विविध क्षेत्रात कार्य करीत असते. कामाच्या स्वरूपानुसार त्या त्या ठिकाणी विशेष ज्ञान व कौशल्याची गरज असते. कोणत्याही दोन व्यक्ती एकसारख्या नसतात. त्यांच्यात सुप्तक्षमता कौशल्ये, निसर्गदत्त देणगी, समस्या या बाबत फरक असतो. यामुळे व्यक्तीला स्वत:च्या गरजा पूर्ण करण्यात अडचण येत असते. तसेच व्यक्तीला स्वतःशी, इतरांशी, सभोवतालच्या वातावरणाशी जूळवून घेण्यासही अडचणींचा सामना करावा लागतो. अशाप्रकारे एखाद्याच्या व्यक्तीगत

गरजा पूर्ण करण्यासाठी समस्यांचे निराकरण करण्यासाठी व्यक्तीगत सहाय्य किंवा मदतीची गरज असते.

म्हणून, व्यक्तीगत मार्गदर्शन म्हणजे एखादया व्यक्तीला त्याच्या सामाजिक, भावनिक, नैतिक आणि आरोग्यविषयक समस्या सोडविण्यासाठी दिलेली मदत.

व्याख्या:-

- हॉपकिन्स (Hopkins):- "व्यक्तीगत मार्गदर्शन हे असे मार्गदर्शन आहे, जे व्यक्तीच्या आरोग्यविषयक समस्या, भावनिक समायोजन आणि सामाजिक समायोजनाशी संबंधित आहे. यात त्याच्या करमणुकीचा आणि विश्रांतीच्या वेळेचाही समावेश आहे."

- रूथ स्ट्रँग (Ruth Strang):- "व्यक्तीगत मार्गदर्शन म्हणजे एखादया व्यक्तीला त्याच्या वैयक्तिक समस्या जसे की भावनिक आणि सामाजिक समायोजन, आर्थिक आणि सामाजिक संबंध आणि त्याच्या शारीरिक तसेच मानसिक आरोग्याशी संबंधित समस्या सोडविण्यासाठी दिलेली मदत होय."

- विल्सन (Wilson):- "व्यक्तीगत मार्गदर्शनाचा हेतू व्यक्तीला त्याच्या शारीरिक, भावनिक, सामाजिक, नैतिक आणि आध्यात्मीक विकासात आणि समायोजनात मदत करणे आहे."

वरिल सर्व गोष्टींचा विचार केल्यास व्यक्तीगत मार्गदर्शनात एखादया व्यक्तीच्या विकास आणि समायोजना संबंधित सर्व समस्या आणि पैलूंचा समावेश होतो. क्रो आणि क्रो (Crow and Crow) हे मत व्यक्त करतात की, "व्यक्तीगत मार्गदर्शन म्हणजे एखादया व्यक्तीला जीवनातील सर्व क्षेत्रातील दृष्टीकोन आणि वर्तणुकीच्या विकासामध्ये चांगल्या प्रकारे समायोजन करण्यासाठी मदत करणे होय."

### २.५.२ व्यक्तीगत मार्गदर्शनाची आवश्यकता आणि महत्व :

(Need and Importance of Personal Guidance):-

व्यक्तीगत समस्या सोडविण्यासाठी व्यक्तीगत मार्गदर्शन आवश्यक असते. विद्यार्थ्याचे सामाजिक आणि भावनिक कल्याण करणे हे त्याचे उद्दिष्ट आहे. तसेच व्यक्तीचे व्यक्तीगत आणि सामाजिक गुण विकसित करणे हे देखील आहे. ज्यामुळे व्यक्ती स्वत:च्या समस्या सोडविण्यास आणि चांगले बनते समायोजन करण्यास सक्षम बनते.

- हे प्रत्येक व्यक्तीच्या व्यक्तीमत्व समायोजना साठी व्यक्तीगत समस्यांवर मात करण्यासाठी आहे.
- हे विद्यार्थी किंवा व्यक्तींच्या व्यक्तीगत आणि सामाजिक गरजांना महत्त्व देते.
- हे आपल्या दैनंदिन जीवनाशी जोडलेले आहे.

- हे आपण काय करावे आणि काय करू नये या मोठ्या प्रश्नाचे उत्तर देते.
- हे आपण कोणत्या सवयी, दृष्टीकोन आणि मूल्ये विकसित केली पाहिजे हे ठरवण्यासाठी आहे.
- हे जीवनातील सर्व समस्यांना हाताळते जे शैक्षणिक आणि व्यावसायिक मार्गदर्शनात समाविष्ट नाहीत.
- हे मार्गदर्शन सर्व प्रकारच्या मार्गदर्शनाचा गाभा आहे.
- हे सर्व व्यक्तींशी संबंधित आहे.
- काही व्यक्तीगत समस्या असतात ज्यांना व्यक्तीगत मार्गदर्शनाची गरज भासते ते खालील प्रकारे असू शकतात.
- शारीरिक आरोग्याशी संबधित समस्या
- मानसिक आरोग्याशी संबंधित समस्या
- कौटुंबिक समस्या
- शाळेच्या समस्या
- व्यावसायिक समस्या
- व्यक्तीमत्व समस्या
- धार्मिक समस्या
- आर्थिक समस्या

जर विद्यार्थ्यांना व्यक्तीगत मार्गदर्शन दिल्यास, तो स्वतःच्या समस्या स्वतः सोडविण्यास, समाजाशी जुळवून घेण्यास आणि समाजात सर्वसामान्य जीवन जगण्यास सक्षम बनतो.

### २.५.३ शिक्षकांची भूमिका :-

शिक्षकांच्या भूमिकेच्या दृष्टीने व्यक्तीगत मार्गदर्शन कार्यक्रमात खालील पायऱ्यांचा समावेश होतो.

१. सर्व माहिती किंवा डेटाचे संकलन करणे : (Collection of all the Information or Data):- सर्वप्रथम ज्या व्यक्तीस व्यक्तीगत किंवा मानसशास्त्रीय मार्गदर्शनाची गरज आहे त्यांची आवश्यक माहीती किंवा डेटा गोळा केला पाहिजे. ही माहिती त्याच्या शारीरिक, बौद्धिक, सामाजिक आणि भावनिक विकास, शैक्षणिक कामगिरीशी संबंधित असू शकते. तसेच व्यक्तीमत्वाची वैशिष्ट्ये, आवडी, योग्यता, कौटुंबिक आणि शालेय पार्श्वभूमी आणि इतर पर्यावरणीय परिस्थिती यांचाही त्यात समावेश असू शकतो. अशाप्रकारे एखादया व्यक्तीच्या समस्यांचे निवारण करण्यासाठी त्या व्यक्तींची पार्श्वभूमी व व्यक्तीमत्व वैशिष्ट्यांची पुरेशी माहिती मार्गदर्शकास असणे गरजेचे असते.

२. समस्यांच्या कारणाचे निदान (Diagnosis of the causes of the problems):- व्यक्तीची माहिती गोळा केल्यानंतर त्यामाहिती आधारे व्यक्तीच्या समस्येचे विश्लेषण केले जाते. त्यावरुण व्यक्ती आणि त्याच्या परिस्थितीची कारणे शोधली जातात.

योग्य निदान व्हावे यासाठी व्यक्तीगत मुलाखत किंवा इतर तंत्राचा देखील माहीती मिळवण्यासाठी केला जाऊ शकतो.

३. उपाययोजनांचा विचार करणे: (Thinking about the Remedial Measures):- संभाव्य कारणांचा शोध घेतला जातो. उपाययोजना आखल्या जातात. यातून मार्गदर्शक व्यक्तीगत मार्गदर्शन देण्याचा विचार करतो जो एखाद्या व्यक्तीला त्याच्या समस्येचे निराकरण करण्यासाठी दिला जाऊ शकतो.

४. व्यक्तीगत मार्गदर्शन प्रदान करने: (Rendering Personal Guidance):- या प्रक्रियेत मार्गदर्शक आणि ज्या व्यक्तीचे मार्गदर्शन करायचे आहे त्या व्यक्तीचा योग्य संबंध प्रस्थापित होणे गरजेचे असते. मार्गदर्शक व्यक्तींची पूर्ण माहिती मिळवतो. त्यातून व्यक्तीला असणाऱ्या अडचणी व अडचणींची कारणे शोधली जातात. मार्गदर्शकाद्वारे त्यावर सूचना व संभाव्य उपाय दिले जातात. तसेच व्यक्तीच्या वागणुकीत किंवा वृत्तीत संभाव्य बदलांची जाणीव होते किंवा त्यांचा विचार केला जातो. मार्गदर्शकाकडून प्रेमळ, सहानुभूतीपूर्ण सल्ला दिला जातो. व्यक्तीचे ध्येय निश्चित करण्याचे आवश्यक तंत्राचा वापर केला जातो. एखादया व्यक्तीला त्याच्या समस्येतून मुक्त करण्यास मदत करणे हा एकमेव हेतू व्यक्तीगत मार्गदर्शनाचा असतो.

५. पाठपुरावा करण्याची सेवा: (Follow-up Service):- एखाद्या व्यक्तीस व्यक्तीगत मार्गदर्शन दिल्या नंतर व्यक्तीगत मुलाखत संपर्क किंवा इतर योग्य तंत्राद्वारे अशा मार्गदर्शनाची प्रगती किंवा परिणामांचे मुल्यांकन करणे आवश्यक असते. पाठपुरावा करणे ही एक अशी सेवा आहे जो प्रशासित व्यक्तीगत मार्गदर्शनाचे सामर्थ्य आणि कमकुवतपणा जाणून घेण्यास मदत करतो. ज्यायोगे पुढिल मार्गदर्शनाची गरज किंवा प्रस्तावित मार्गदर्शनात बदल कोणतेही बदल सुचवू शकते.

- आपली प्रगती तपासा

१. व्यक्तीगत मार्गदर्शन कार्यक्रमात शिक्षकांच्या भूमिकेवर चर्चा करा.

२. व्यक्तीगत मार्गदर्शन कार्यक्रम परिभाषित करा.

## २.६ सारांश:-

व्यक्तीगत मार्गदर्शन हे शैक्षणिक मार्गदर्शनापासून पूर्णपणे वेगळे करता येत नाही. कारण व्यक्तीगत मार्गदर्शन हे शैक्षणिक मार्गदर्शनाचा आधार आहे. एखादा विद्यार्थी जर व्यक्तीगत समस्यांचा बळी असेल तर तो शिक्षणात प्रगती करू शकणार नाही. म्हणून त्याच्या वर्गशिक्षकाने आदी त्याच्या व्यक्तीगत समस्या सोडवल्या पाहिजेत. पुन्हा एखादी व्यक्ती व्यवसायात यशस्वी होऊ शकत नाही, जर ती व्यक्तीगत समस्येने ग्रासलेली असेल, अशावेळी त्या व्यक्तीच्या समस्या सोडविण्यासाठी एखादा तज्ञ किंवा कुशल मानसशास्त्रज्ञाची मदत घ्यावी लागेल. यावरून व्यक्तीगत मार्गदर्शनाची व्याप्ती विस्तृत आहे हे दिसून येते. यात शैक्षणिक तसेच व्यावसायिक मार्गदर्शन देखील समाविष्ट आहे.

## २.७ प्रश्न

१. शैक्षणिक मार्गदर्शन परिभाषित करा आणि त्याची गरज यावर चर्चा करा.

२. शैक्षणिक मार्गदर्शनात शिक्षकाची भूमिका स्पष्ट करा.

३. व्यावसायिक मार्गदर्शन परिभाषित करा आणि त्याची गरज यावर चर्चा करा.

४. व्यावसायिक मार्गदर्शनात शिक्षकाची भूमिका काय आहे ते स्पष्ट करा.

५. व्यक्तीगत मार्गदर्शन परिभाषित करा आणि त्याची त्याचे महत्त्व यावर चर्चा करा.

६. व्यक्तीगत मार्गदर्शनात शिक्षकाची भूमिका स्पष्ट करा.

❈❈❈❈❈❈❈

# ३

# समूपदेशन (अर्थ व प्रकार)

**घटक रचना**

३.१ उद्दिष्टे
३.२ प्रस्तावना
३.३ समुपदेशनाचा अर्थ
३.४ समुपदेशनाचा हेतू (उद्देश)
३.५ समुपदेशनाचे दृष्टिकोन
 ३.५.१ निर्देशित समुपदेशन
 ३.५.२ अनिर्देशित समुपदेशन
 ३.५.३ सर्वसंग्रहात्मक समुपदेशन
३.६ समुपदेशनाचे प्रकार
 ३.६.१ वैयक्तिक समुपदेशन
 ३.६.२ गट समुपदेशन
३.७. सारांश
३.८. प्रश्न
३.९. संदर्भ

## ३.१ उद्दिष्टे

- या घटकाची उद्दिष्टे खालील प्रमाणे आहेत.
- समुपदेशनाचा अर्थ आणि उद्देश समजून घेणे.
- समुपदेशनाच्या विविध पद्धतीचा आढावा घेणे.
- वेगवेगळ्या प्रकारच्या समुपदेशनातील फरक स्पष्ट करणे.

## ३.२ प्रस्तावना :-

समुपदेशन हा संपूर्ण मार्गदर्शन कार्यक्रमाचा मध्यवर्ती पैलू आहे. समुपदेशन प्रक्रियेत मार्गदर्शन कार्यक्रमाचे सर्व उपक्रम आणि सेवांची मदत होते. समुपदेशनाचा उद्देश व्यक्तीला भविष्यात उद्भवणाऱ्या समस्या सोडविण्यास मदत करणे त्याचबरोबर वैयक्तिक, सामाजिक, भावनिक, शैक्षणिक आणि व्यावसायिक विकास करणे हा आहे. समुपदेशनात उपचारात्मक, प्रतिबंधात्मक विकासात्मक मूल्य आहे.

**समुपदेशनाची व्याख्या:-**

जोन्स समुपदेशनाला संपूर्ण मार्गदर्शनाचा व्यक्तीगत आणि महत्त्वाचा भाग समजतात. वेबस्टर डिक्शनरी समुपदेशनाची व्याख्या “समुपदेशन म्हणजे सल्ला मसलत, एकमेकांच्या मतांचे आदानप्रदान एकत्रित विचार करणे.” म्हणून करते.

**रेन (Wren)** :-

च्या मतानुसार समुपदेशन म्हणजे, “समुपदेशन म्हणजे दोन व्यक्तींमधील गतिमान व हेतुपूर्व असा नातेसंबंध होय. ज्यामध्ये परस्पर विचार विनिमयाने 'निश्चित केलेल्या समस्येवर शेवटी दोघांतील लहान, अपरिपक्व किंवा अधिक त्रस्त व्यक्तीला स्वतः उपाय निश्चित करण्यासाठी सहाय्य केले जाते."

**अर्बकल (Arbuckle)** :-

"समुपदेशन एखादया व्यक्तीला हे पाहण्यासाठी मदत करते की तो खरोखर कोण आहे. त्याच्याकडे काय आहे आणि काय नाही, तो सहज काय करू शकतो. तो अडचण असल्यास काय करू शकतो आणि काय करू शकत नाही. एखादयासाठी उच्च आदर असेल तर त्याच्याशी मानवी नातेसंबंध हे जवळचे शेअरिंग असते, जो त्याला बिनशर्त स्वीकृती देऊ शकतो. परंतु ज्याची कोणतीही हमी नाही. तर उत्तरे ही मिळणार नाहीत."

**विविध व्याख्यांचे विश्लेषण**

- समुपदेशनात दोन व्यक्ती असतात. समुपदेशन देणारी व्यक्ती म्हणजे समुपदेशक (Counsellor), आणि समुपदेशन घेणारी व्यक्ती म्हणजे समुपदेश्य (Counselee) होय.
- समुपदेशन हे ग्राहकाच्या (client) वागण्यातील बदल सुलभ करण्याचे साधन आहे.
- समुपदेशन ही व्यावसायिक सेवा आहे. जे Trained ब्यावसायिक प्रशिक्षित लोकांसाठी उपयुक्त आहे.

## ३.३ समुपदेशनाचा अर्थ

मार्गदर्शन आणि समुपदेशन हे दोन शब्द जरी परस्पर बदलले जात असले तरी दोन्ही शब्दाचा अर्थ मात्र वेगळा आहे. आपण मार्गदर्शना बद्दल अभ्यास केलेला आहे. आता आपल्याला समुपदेशनाची माहीती मिळवायची आहे.

जीवनात व्यक्तीला अनेक छोटया मोठ्या समस्यांना सामोरे जावे लागते. या समस्यांतून मार्ग काढतांना जेव्हा व्यक्ती स्वतःच्या समस्येविषयी योग्य निर्णय घेऊ शकत नाही, तेव्हा त्या व्यक्तीला तिची बलस्थाने, कमतरता यांची जाणीव करून देण्यासाठी समुपदेशनाची आवश्यकता असते. दैनंदिन जीवनात, आपल्याला असे दिसून येते की, समुपदेशन अनेक स्तरांवर चालते. जसे कुटुंबात पालक त्यांच्या मुलांचे, डॉक्टर रुग्णांचे, वकील त्याच्या Client चे आणि शिक्षक विद्याथ्यांचे समुपदेशन करतात. समुपदेशन प्रदान करण्यात

समस्या किंवा सल्लागारांना कोणतीही मर्यादा नसते. म्हणून समुपदेशन काय असते ते आपण जाणून घेऊया.

"समुपदेशन ही एक परस्परसंवाद प्रक्रिया आहे जी स्वतः आणि पर्यावरणाचे अर्थपूर्ण आकलन सुलभ करते. आणि परिणामी भविष्यातील वर्तनासाठी उद्दिष्टे आणि मूल्यांची जोपासना करते किंवा स्पष्टीकरण देते."

- **शर्टझर आणि स्टोन**

  "समुपदेशन हे एक स्वीकार्य, विश्वासू, आणि सुरक्षित नातेसंबंध आहे ज्यात ग्राहक ग्राहकांच्या चिंता आणि त्यांना अस्वस्थ करणाऱ्या बाबी याबद्दल ग्राहक उघडपणे चर्चा करायला शिकतात. त्याचबरोबर अचूक वर्तनाची ध्येये निश्चित करण्यासाठी, आवश्यक सामाजिक कौशल्ये आत्मसात करण्यासाठी आणि इच्छित नवीन वर्तन लागू करण्यासाठी धैर्य आणि आत्मविकास विकसित करतात."

- **Merle M. Ohlsen**

  "समुपदेशन ही एक प्रक्रिया आहे. ज्याद्वारे समस्याग्रस्त व्यक्तीला (client) एक असंबंधित व्यक्ती (Counsellor) संवाद साधून अधिक व्यक्तीगतरित्या, समाधानकारक पद्धतीने सांगण्यास आणि वागण्यास मदत करतो. समुपदेशक (Counselor) जी माहिती आणि प्रतिक्रीया ग्राहकाला प्रदान करतो. त्यामुळे ग्राहकाला स्वतःची वागणूक विकसित करण्यास उत्तेजन मिळते व ज्यायोगे ग्राहक (client) सक्षम बनण्यास मदत होते. तसेच तो स्वतःशी आणि त्याच्या पर्यावरणाशी अधिक प्रभावी पणे वागू लागतो."

- **एडविन लुईस**

  वरिल सर्व व्याख्यांच्या विश्लेषणावरुण आपण खालील निष्कर्ष सांगू शकतो.

  - समुपदेशन ही एक मार्ग दाखविणारी प्रक्रिया आहे.
  - यात दोन व्यक्ती समाविष्ट असतात. समुपदेशक (counsellor) आणि समुपदेश्य (Counselee)
  - या दोन व्यक्तींमध्ये परस्पर संबंध प्रस्थापित होतात.
  - हे व्यक्तीला आत्म-समज, आत्म-स्वीकृती आणि आत्मसाक्षात्कार विकसीत करण्यास मदत करते.
  - समुपदेशनाने व्यक्ती आनंदी, अधिक सर्जनशील बनते. त्याचबरोबर चांगले समायोजित होण्यास मदत करते.

आता आपण समुपदेशन काय नाही यावर चर्चा करूया. समुपदेशन ही एक प्रक्रिया आहे ज्यात माहिती देणे, सल्ला देणे आणि समुपदेशन अशा क्रियांचा समावेश होतो. परंतू यात केवळ व्यक्तीगत माहिती देणे सल्ला देणे, सूचना देणे, शिफारशी देणे या

गोष्टींचा समावेश होत नाही यावरून समुपदेशन म्हणजे काय हे स्पष्ट होते. समुपदेशनात तीन क्रिया समाविष्ट असतात.

जसे A- माहिती B- सल्ला C- समुपदेशन

- **माहिती (Information) :**

  यामध्ये समुपदेशकाची भूमिका योग्य आणि अचूक माहिती ग्राहकांना देणे आहे. उदाहरणार्थ: तुम्ही विदयार्थी आहात आणि भविष्यासाठी तुम्हाला अभ्यासक्रम निवडायचा आहे. त्यासाठी तुम्हाला समुपदेशनाची आवश्यकता आहे. येथे समुपदेशकांची भूमिका म्हणजे तुम्हाला वेगवेगळ्या अभ्यासक्रमांच्या उपलब्धतेविषयी तसेच भविष्यातील संभाव्यतेविषयी माहिती देणे आहे.

- **सल्ला देणे. (Advising ):**

  या टप्प्यात समुपदेशक विद्यार्थ्यांना योग्य कृती अभ्यासक्रम सुचवतो. येथे समुपदेशक तुम्हाला अनेक पर्याय सुचवतात आणि तुमच्या ध्येय आणि आवडीनुसार एका पर्यायाची शिफारस करतात.

  उदाहरणार्थ : जर तुमचे ध्येय अभियंता बनण्याचे असेल तर समुपदेशक तुम्हाला गणिताशी संबंधित अभ्यासक्रम सुचवेल.

- **समुपदेशन (Counselling):-**

  या अवस्थेत समुपदेशक विद्यार्थ्यांना त्यांच्या गरजा अपयशाची कारणे, प्रेरणा याविषयी माहिती स्पष्ट करण्यास मदत करतो. ज्यामुळे तो स्वतः योग्य निर्णय घेऊ शकेल.

  उदाहरणार्थ : जर तुम्ही सांगाल की तुमचे ध्येय नाही किंवा तुम्ही भविष्यात काय कराल हे ठरवू शकत नाही.

  अशावळी समुपदेशक तुम्हाला विचारेल की तुम्हाला भविष्यात काय करायचे आहे. याची खात्री नसल्यास तो तुम्हाला नक्कीच काहीतरी मनोरंजक करायचे असेल या विचाराने तुम्हाला तुमच्या कल्पनेचे वर्णन करण्यास सांगतात. याप्रमाणे समुपदेशक तुम्हाला तुमची कल्पना जाणून घेण्यासाठी प्रेरित करू शकतो आणि तुमच्या आवडीनुसार तुम्हाला (कोर्सची) शिफारस करू शकतो यावरून समुपदेशन हे विदयार्थ्यावर अवलंबून नसून ज्ञानावर अवलंबून असते. समुपदेशक म्हणून किंवा एखादया व्यक्तीला ज्ञानाऐवजी कौशल्याची गरज असते त्याला उच्च स्तरीय व्यक्तीगत कौएल्ये आवश्यक असतात. म्हणून समुपदेशन ही एक प्रक्रिया आहे ज्यात माहिती, सल्ला आणि समुपदेशन यांचा समावेश असतो.

- **आपली प्रगती तपासा**

१. समुपदेशनाची व्याख्या सांगा

२. समुपदेशनाच्या अर्थाची चर्चा करा

## ३.४ समुपदेशनाचा उद्देश / हेतू

- ग्राहकांना त्यांच्या भावनिक अवस्थेची जाणीव होण्यास मदत करणे. ज्यामुळे तणाव अनुभवत असताना ग्राहकांना त्याची जाणीव होण्यास मदत होते.
- ग्राहकांना त्यांच्या भावना सुरक्षितपणे (स्वतःला आणि इतरांना) व्यक्त करण्यास शिकवते. ज्यामुळे ते त्यांच्या व्यक्तीगत सीमांबद्दल जागरूक होतील किंवा स्वतःचे संरक्षण करू शकतील.
- ग्राहकांना भावनिक पातळीवर त्यांच्या भूतकाळाला वर्तमानापासून वेगळे करण्याचे कार्य करणे ज्यामुळे ते भूतकाळात घडलेल्या घटनापासून स्वतःला दूर ठेवू शकतील तसेच वर्तमान गरजा पूर्ण करण्यासाठी सक्षम बनतील.
- ग्राहकांना असणाऱ्या गरजा पूर्ण करण्यास शिकवणे ज्यामुळे त्यांच्यात समाधानाची भावना निर्माण होते. तसेच गरजा दडपण्याच्या भूमिकेतून आलेल्या निराशा वाटाघाटीच्या भावनेतून त्यांचे संरक्षण करण्यास शिकवणे.

**आपली प्रगती तपासा**

१. समुपदेशनाचा उद्देश / हेतू स्पष्ट करा.

## ३.५ समुपदेशनाचे दृष्टीकोन / पद्धती (Approaches of Counselling)

समुपदेशनाचे विविध दृष्टीकोन आहेत तसेच व्यावसायिक समुपदेशकांनीही अनेक दृष्टीकोनांचा वापर केला आहे त्यापैकी कदाचित तीन मुख्य दृष्टीकोन आहेत ते म्हणजे सायकोडायनामिक, ह्युमॅनिष्टीक (मानवतावादी) तसेच वर्तणूक (Behavioural). प्रत्येकाचा एक वेगळा सिद्धांत आणि कल्पना आहे. प्रत्येक थेरपिस्ट आणि समुपदेशक वेगवेगळ्या समस्या सोडविण्यासाठी या दृष्टीकोन (पद्धतीचा) वापर करतात.

### ३.५.१ निर्देशित समुपदेशन किंवा समुपदेशक केंद्री समुपदेशन (Directive counselling):

समुपदेशक किंवा थेरपिस्टचे व्यावसायिक प्रशिक्षण आणि अनुभव या गृहीतकावर निर्देशित समुपदेशन आधारित आहे. यामध्ये समुपदेशक उपचारात्मक, प्रक्रियेचा वापर करून ग्राहकाच्या वर्तनास मार्गदर्शन करण्याचा प्रयत्न करतात. याला डायरेक्टिव्ह थेरपी असेही म्हणतात.

या समुपदेशनात समुपदेशक सक्रिय भूमिका बजावतो कारण हे लोकांना त्यांच्या स्वतःच्या समस्या सोडविण्यास शिकवण्यासाठी मदत करण्याचे साधन मानले जाते. म्हणून या प्रकारच्या समुपदेशनाला समुपदेशक समुपदेशन असेही म्हणतात. कारण या समुपदेशनात समुपदेशकाचा क्रियात्मक सहभाग असतो. म्हणजे समुपदेशकच सर्व काही करतो जसे

विश्लेषण, संश्लेषण, निदान, रोगनिदान उपाय देणे आणि पाठपुरावा करणे अशी अनेक कार्य त्यालाच करावी लागतात.

- **निर्देशित समुपदेशनाची वैशिष्ट्ये**

यात खालील वैशिष्ट्ये आहेत.

१. मुलाखती दरम्यान लक्ष एका विशिष्ट समस्येवर आणि त्याच्या निराकरणाच्या शक्यतांवर केंद्रित असते.

२. मुलाखती दरम्यान समुपदेशक ग्राहक किंवा विद्यार्थ्यापेक्षा अधिक सक्रिय भूमिका बजावतो.

३. विद्यार्थी किंवा ग्राहक निर्णय घेतो, परंतु समुपदेशक ग्राहकाला त्याच्या निदानाच्या अनुषंगाने निर्णय घेण्यासाठी जे काही करता येईल ते करतो.

४. समुपदेशक समुपदेश्याच्या किंवा ग्राहकाच्या विचारसरणीला दिशा देण्याच्या दृष्टीने त्यांना सूचना, स्पष्टीकरण, अर्थ लावणे आणि सल्ला देऊन निर्देशित करण्याचा प्रयत्न करतो.

निर्देशित समुपदेशनाच्या पायऱ्या: या प्रकारच्या समुपदेशनात खालील पायऱ्यांचा समावेश होतो.

**a. विश्लेषण (Analysis) :**

समुपदेशक समुपदेश्याचा शोध घेण्यासाठी विविध स्त्रोतांद्वारे समुपदेश्याबाबत माहिती संकलित करतो. माहिती संकलनासाठी पुढील साधणे वापरली जातात. जसे संकलित नोंदी, मुलाखत, प्रासंगिक नोंदी, अत्मचरित्र, रोजनिशी, मानसशास्त्रीय चाचण्या

**b. संयोजन (Synthesis):**

समुपदेश्याबाबत मिळालेली माहिती अशा प्रकारे संघठित केली जाते की, ज्याद्वारे समुपदेश्याची अभिरूची, सामर्थ्य, जबाबदाऱ्या, समायोजन व विषमसमायोजन यांचे दर्शन घडते.

**c. निदान (Diagnosis) :**

या पायरीत उपलब्ध माहितीचे अर्थनिर्वचन केले जाते व त्यातून समस्या निश्चित केली जाते म्हणजेच समस्येचे योग्य निदान करणे हे या पायरीचे मुख्य लक्षण आहे.

**d. भविष्यातील समस्येबाबत अंदाज (पूर्वनिदान) Prognosis**:

वर्तमान समस्येचे निदान केल्यानंतर, भविष्यात समस्येचे स्वरूप काय असेल, समस्येचे परिणाम काय होतील याबाबत अंदाज व्यक्त केला जातो.

e. **समुपदेशन (Counselling):**

या पायरीत प्रत्यक्ष समुपदेशनाची क्रिया पार पाडली जाते, समुपदेश्य समुपदेशकाच्या विविध प्रश्नाची उत्तरे देतो.

f. **पाठपुरावा (Follow - up) :**

या पायरीत समुपदेशन प्रक्रियेची परिणामकता तपासली जाते. समस्येचे निराकरण झाले किंवा नाही याबाबत पाठपुरावा केला जातो.

- **निर्देशित समुपदेशनात समुपदेशकाची भूमिका**

समुपदेशक या समुपदेशन प्रक्रियेत महत्वाची भूमिका बजावतो. तो या प्रक्रियेचा मुख्य घटक असतो. आणि परिस्थितीचे नेतृत्व करत असतो. समुपदेशन करणारी व्यक्ती ही प्रशिक्षित, अनुभवी आणि परिपक्व असते. तसेच तो आपल्या प्रशिक्षण आणि अनुभवाद्वारे समुपदेश्याची समस्या सोडविण्यास पूर्णपणे कार्यक्षम असतो. समुपदेशक समुपदेश्याच्या किंवा ग्राहकाच्या विचारसरणीला दिशा देण्याच्या दृष्टीने त्यांना सूचना, स्पष्टीकरण, अर्थ लावणे आणि कधीकधी सल्ला देऊन देखील निर्देशित करण्याचा प्रयत्न करतो. समुपदेशक् विद्यार्थी किंवा समुपदेश्याबद्दल सर्व शक्य माहिती गोळा करतो आणि पुरेसे समजण्यासाठी माहितीचे विश्लेषण करतो. तो माहितीचे सारांश आणि आयोजनकरतो ज्यामुळे समुपदेशकाला विद्यार्थ्यांच्या क्षमता आणि मर्यादा, समायोजन आणि गैरसमायोजन समजण्यासाठी मदत होते. त्याचबरोबर समुपदेशक विद्यार्थ्यांच्या समस्यांचे स्वरूप आणि कारणाविषयी निष्कर्ष काढतो. या निष्कर्षाच्या मदतीने तो त्याच्या भविष्यातील समस्यांच्या विकासाचा अंदाज लावतो. विद्यार्थ्याने समस्या सोडविण्यासाठी काय केले पाहिजे हे तो प्रिस्क्राईब करतो म्हणजेच लिहून देतो. निर्देशित समुपदेशनाला प्रिस्क्रिप्टिव्ह समुपदेशन देखील म्हणतात. कारण समुपदेशक विदयार्थ्यांसाठी उपाय किंवा कृतीचा मार्ग निर्धारित करतो.

### ३.५.२ अनिर्देशित समुपदेशन किंवा समुपदेश्य केंद्रित समुपदेशन (Non Directive Counselling) :-

या प्रकारच्या समुपदेशनात समुपदेश्य केंद्रस्थानी असतो, यात समुपदेशक नव्हे तर समुपदेश्याची मुख्य भूमिका असते. अनिर्देशित समुपदेशनामध्ये समुपदेश्यास स्वत:ची जाणीव व स्वत: विषयी समज प्राप्त करून देण्यास मदत केली जाते. त्यामूळे समुपदेश्य स्वतः समस्या सोडविण्याच्या दृष्टीने पावले उचलतो.

या समुपदेशन प्रक्रियेत समुपदेश्य समुपदेशकाकडे मदतीसाठी स्वत: पुढाकाराने येतो. समुपदेशक परस्पर विश्वास, स्वीकार आणि समज यावर अधारित समुपदेश्यकाशी संबंध प्रस्थापित करतात. समुपदेश्य त्यांच्या समस्यांविषयी सर्व माहितीचे वर्णन करतो. समुपदेशक त्याला विश्लेषण आणि संयोजन करण्यासाठी, त्यांच्या अडचणीचे निदान करण्यासाठी, त्याच्या भविष्यातील समस्यांचा अंदाज लावण्यासाठी तसेच त्याच्या

समस्यांच्या निराकरणाबाबत निर्णय घेण्यास मदत करतो. आणि अंतिम निर्णय घेण्यापूर्वी त्याच्या उपायाचे सामर्थ्य आणि परिणामांचे विश्लेषण करतो. समुपदेश्याला त्याच्या समस्याबद्दल बोलण्याचे आणि त्यावर उपाय करण्याचे पूर्ण स्वातंत्र्य असल्याने, या तंत्राला "अनुज्ञेय' समुपदेशन असेही म्हणतात.

- **नात्याबद्दल विद्यार्थ्याची धारणा**

  **Pupil's perception of the relationship : -**

  जेव्हा एखादा विद्यार्थी समुपदेशकाची मदत घेतो, त्याला लवकरच कळते की समुपदेशक त्याला जसे आहे तसे स्वीकारतो आणि त्याच्या समस्येचे स्वतःच्या मार्गाने निराकरण करण्याच्या त्याच्या क्षमतेवर विश्वास ठेवतो. त्याला हे समजते की तो जे काही निवडतो त्याबद्दल बोलू शकतो. कधीकधी त्याला आश्चर्य देखील वाटते की, तो अशा विषयांवर बोलू शकतो ज्यावर तो आतापर्यंत त्याच्या जवळच्या मित्रांशी चर्चा करू शकला नाही. सल्लागारांसह मागील अनुभवांनी त्याला हे शिकवले असेल की सल्लागार हा “सल्ला देणारा” असतो. त्याला आता कळले की तो एका व्यक्तीशी बोलत आहे जो त्याला समजून घेण्याचा प्रयत्न करतो, तो जे काही सांगत आहे त्याचे पालन करण्याचा प्रयत्न करतो, त्याचबरोबर त्याला स्वतःला समजून घेण्यास मदत करण्याचा प्रयत्न करतो तसेच त्याला हे देखील समजते की, जर त्याला वाटत असेल तर तो समुपदेशकाकडे आणलेल्या विशिष्ट समस्यचे निराकरण न करता संबंध संपुष्टात आणू शकतो किंवा ते टाळू शकतो.

- **अनिर्देशित समुपदेशनातील पायऱ्या :-**

  या प्रकारच्या समुपदेशनात खालील पायऱ्यांचा समावेश होतो.

  १. विद्यार्थी किंवा व्यक्ती समुपदेशकाकडे स्वतः मदतीसाठी येतो.

  २. समुपदेशक त्याच्याकडे उत्तर नसल्याचे सांगून परिस्थितीचे वर्णन करतो. परंतु तो विदयार्थ्याला किंवा ग्राहकाला एक दिशा किंवा वातावरण प्रदान करण्यास मदत करतो. ज्याच्या मदतीने समुपदेश्य किंवा विदयार्थी त्यांच्या समस्यांचे उत्तर शोधू शकतात किंवा त्यावर उपाय शोधण्याचा विचार करू शकतात.

  ३. समुपदेशक मैत्रीपूर्ण आणि स्वारस्यपूर्ण आहे आणि तो समुपदेश्याला मुक्तपणे त्याच्या भावना व्यक्त करण्याचे स्वातंत्र्य देतो.

  ४. समुपदेशक व्यक्ती किंवा ग्राहकाच्या भावना समजून घेण्याचा प्रयत्न करतो.

  ५. समुपदेशक सकारात्मक तसेच नकारात्मक भावना स्वीकारतो आणि ओळखतो.

६. समुपदेशक समुपदेश्याच्या मर्मदृष्टीच्या विकासाचा विचार करून नवीन भावनांचे वर्गीकरण करतो.

७. ग्राहक भावनिक तसेच बौद्धिकदृष्ट्या त्याच्या वास्तविक मनोवृत्ती आणि इच्छा ओळखतो आणि त्याचा स्वीकार करतो.

८. समस्या निराकरणाच्या दिशेने सकारात्मक पावले उचलली जातात.

९. वरील पाय-यांच्या पूर्ततेनंतर मर्मदृष्टी विकसित होते व समुपदेशन संपुष्टात आणले जाते. स्वत:च्या समस्या स्वतः सोडविण्याची क्षमता समुपदेश्यामध्ये येते.

### ३.५.३ सर्वसंग्रहात्मक समुपदेशन (समन्वयित समुपदेशन) (Eclectic Counselling)

सर्वसंग्रहात्मक समुपदेशनात निर्देशित व अनिर्देशित समुपदेशनाचा समन्वय साधला जातो. काही समुपदेशक जेव्हा वरील दोन्ही समुपदेशनाशी सहमत होत नाहीत तेव्हा सर्व संग्रहात्मक समुपदेशनाचा वापर केला जातो. समुपदेशक परिस्थितीनुसार तंत्र बदलतो. तो कोणत्याही एका प्रकारास बांधील राहत नाही.

सर्वसंग्रहात्मक समुपदेशनात कोणीही कोणत्याही पद्धतीचा वापर करू शकतो. जरी त्या पद्धतीचे सैध्दांतीक आधार स्पष्टपणे भिन्न असले तरीही हे समुपदेशन ओळखते की, प्रत्येक सिद्धांतामध्ये काही सत्य असू शकते. आणि जोपर्यंत सिद्धांतामधील अंतिम निर्णय शेवटचा निर्णय घेतला जाऊ शकत नाही तोपर्यंत व्यावहारिक आवश्यकता औचित्यपूर्णतेला प्राधान्य देते. या समुपदेशनातील समुपदेशक निर्देशित तंत्राने सुरवात करू शकतो. परंतु परिस्थिती आवश्यक असल्यास अनिर्देशित समुपदेशनाकडे वळू शकते तसेच तो अनिर्देशित तंत्राने सुरवात करून परिस्थीतीची मागणी असल्यास निर्देशित तंत्राकडे वळू शकतो.

तसेच या समुपदेशनातील समुपदेशक निर्देशित आणि अनिर्देशित समुपदेशनाचा आणि समुपदेशकाच्या कल्पना आणि दृष्टिकोन सुधारण्याच्या हेतुने उपयुक्त मानल्या जाणाऱ्या इतर कोणत्याही प्रकाराचा वापर करते. म्हणूनच परिस्थितीच्या आवश्यकतेनुसार समुपदेशकाला निर्देशित आणि अनिर्देशित तंत्राचा उपयोग करणे शक्य आहे. यावरून निर्देशित आणि आनिर्देशित समुपदेशन हे मार्गदर्शन ध्रुवाच्या विरुद्ध टोकावर आहे असे म्हटले जाऊ शकते. सर्वसंग्रहात्मक समुपदेशनाने निर्देशित आणि अनिर्देशित तंत्रातील अंतर कमी करण्यास मदत होते. त्याबरोबर दोन्हीमध्ये समायोजन साधता येते.

- **सर्वसंग्रहात्मक समुपदेशनाची वैशिष्ट्ये :**

  सर्वसंग्रहात्मक समुपदेशनात खालील वैशिष्ट्यांचा समावेश होतो.

१. समुपदेश्याच्या व्यक्तीगत गरजा लक्षात घेऊन उपचार पद्धती वेळोवेळी बदलता येतात.

२. "लवचिकता" हे या समुपदेशन पध्दतीचा मुख्य गुणधर्म आहे.

३. समुपदेशक आणि ग्राहक दोघांनाही निवडीचे आणि अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य आहे.

४. ग्राहक आणि तत्त्वज्ञानाची चौकट संबंधाच्या हेतूसाठी समायोजित केली जातात.

५. परस्पर विश्वास आणि नातेसंबंधातील विश्वास हा पाया आहे.

६. सांत्वनाची भावना आवश्यक आहे.

- **सर्वसंग्रहात्मक समुपदेशनात समुपदेशकाची क्षमता**

सर्वसंग्रहात्मक समुपदेशनासाठी उच्च स्तरीय क्षमता असावी लागते. या प्रकारच्या समुपदेशनात समुपदेशक क्रियाशीलही नसतो व निष्क्रीयही नसतो. समुपदेश्याच्या व्यक्तीगत गरजा लक्षात घेऊन समुपदेशक उपचार पद्धती बदलतो.

सर्वसंग्रहात्मक समुपदेशनात समुपदेशक तत्त्वज्ञानाच्या इतर सर्व प्रमुख सिद्धांताशी परिचीत असतो. तंत्रज्ञानाची निवड करण्यासाठी आणि ग्राहकाशी सकारात्मक संबंध प्रस्थापित करण्यासाठी या ज्ञानाचा उपयोग करतो. कोणत्याही तत्त्वज्ञानाच्या चौकटीला नकार देणे हे समुपदेशकाच्या हातात असते तसेच जर त्याच्याकडे अधिक चांगला मार्ग असेल तर त्याच्या साह्याने तो कार्य साध्य करू शकतो.

समुपदेशकाला या वस्तुस्थितीची जाणीव असणे आवश्यक आहे की समस्या या प्रत्येक व्यक्ती व्यक्तीमध्ये वेगवेगळ्या असतात. समुपदेश्याला किंवा विद्यार्थ्याला तो आहे तसा स्वीकारता आले पाहिजे आणि त्याला समजून घेण्याचा प्रयत्न समुपदेशकाने केला पाहिजे. प्रत्येक समस्या अनन्य मानली पाहिजे. तसेच समुपदेशकाने ग्राहकाच्या वैयक्तिक समस्या हाताळण्यापूर्वी त्यांच्याविषयीच्या पूर्व कल्पना काढून टाकल्या पाहिजे.

समुपदेशकाचे काम खुप कठीण असते. त्याला व्यक्तीबददल उपलब्ध असलेल्या सर्व बाबींचे स्थानांतर् करणे आणि अर्थ लावणे आवश्यक असते. समुपदेशकाने विदयार्थ्यासोबत काम करताना उबदार, समन्वयपूर्ण, मैत्रीपूर्ण, प्रतिसाद देणारे, आणि समजूतदार होण्यासाठी काळजी घेतली पाहिजे.

- **आपली प्रगती तपासा**

१. निर्देशित समुपदेशनात समुपदेशकाची भूमिका काय आहे ?

२. सर्वसंग्रहात्मक समुपदेशनात समुपदेशकाच्या योग्यतेची चर्चा करा ?

## ३.६ समुपदेशनाचे प्रकार (Types of counselling)

समुपदेशन म्हटले की समुपदेशक आणि ग्राहक यांची समोरासमोर भेट होते असा विचार केला जातो. परंतू हा थोडासा गैरसमज आहे. गट समुपदेशनाची संरचना वैयक्तिक समुपदेशनापेक्षा पूर्णपणे भिन्न असते. गट समुपदेशनात देखील वैयक्तिक समुपदेशनासारखेच वारंवार उपचारात्मक थेरपी देणे आवश्यक असते. त्यासाठी स्वतंत्र कौशल्ये आणि ज्ञान आवश्यक असते.

ग्रॅज्युएट पदवी मिळवणारे विद्यार्थी या आवश्यक फरकांशी परिचित असले पाहिजे. कारण गट थेरपी जवळजवळ सर्व समुपदेशन क्षेत्रात जसे कौटुंबिक, मानसिक आरोग्य, विवाह तसेच शालेय समुपदेशनात वापरली जाते. गट गतीशीलता (Group Dynamic) वैयक्तिक थेरपीपेक्षा वेगळी असते आणि गटा - गटानुसार बदलत असते. थोडक्यात, समुपदेशकाना सर्व ग्राहकांसाठी सर्वोत्तम परिणाम साध्य करण्यासाठी वेगवेगळ्या समुपदेशन क्षमतांचा वापर करणे आवश्यक आहे.

### ३.६.१ वैयक्तिक समुपदेशन (Individual Counselling)

वैयक्तिक समुपदेशनात समुपदेशक आणि ग्राहक यांच्यात समोरासमोर चर्चा घडून येते. ही चर्चा घडून येत असताना दोघांत एक प्रकारची युती, संबंध किंवा बंध तयार होतो. जो त्यांचात विश्वास आणि व्यक्तीगत विकासास चालना देण्यास मदत करतो. व्यसन, मानसिक आरोग्य, आघात, तणावामुळे चिंता आणि नैराश्यास सामोरे जाण्यास मदत करणे हे वैयक्तिक समुपदेशनाचे उद्दिष्ट आहे. हे दैनंदिन जीवनात घडणाऱ्या नकारात्मक गोष्टींपासून बरे होण्यास मदत करण्याविषयी आहे. जसे नुकसान, घटस्फोट वेगळे होणे, कौटुंबिक संघर्ष, हिंसा किंवा गैरवर्तन. वैयक्तिक समुपदेशन तणावपूर्ण जीवनातील परिस्थिती काम / शाळेतील समस्या, दु:ख आणि भावनिक त्रास किंवा नातेसंबंधातील अडचणींचा सामना करण्यास मदत करू शकते. यासाठी अनुभवी व्यावसायीक, काळजी घेणारे, सहाय्यक तज्ञ थेरपिष्ट आणि व्यसन सल्लागार मदत करू शकतात.

### ३.६.२ गट समुपदेशन (Group Counselling) :

गट समुपदेशन म्हणजे समान समस्या असलेल्या अनेक व्यक्तीचे समुपदेशन होय. गट समुपदेशनाचे सामर्थ्य असे आहे की जर तुमच्याकडे ३, ५, किंवा १० लोक एकत्र असतील जे सारख्या समस्यांना तोंड देत आहेत ते एकत्र काम करू शकतात. व्यसन आणि मानसिक आरोग्य विकारानी ग्रस्त असलेल्यांसाठी समुपदेशन सामान्य आहे. प्रत्येक व्यक्ती केवळ या समस्या अनुभवत नाही. या कल्पनेला बळकटी देण्यासाठी गटातील व्यक्ती अंतदृष्टी आणि सामर्थ्याचे स्त्रोत म्हणून काम करतात.

- **फायदे:-**

  १. ग्राहक एकमेकांकडून शिकतात.

  २. ग्राहक गटात नवीन परस्पर कौशल्यांचा सराव करू शकतात.

३. ग्राहक समस्या सोडवण्याचे कौशल्य शिकतात.

४. ग्राहक गट सदस्याकडून अनेक दृष्टीकोन ऐकतात.

५. अभिप्राय देणे किंवा घेण्याद्वारे ग्राहक समवयस्कांना समर्थन देतात आणि प्राप्त करतात.

६. ग्राहक त्यांच्या isolation मधून बाहेर येऊ शकतात.

७. ग्राहकांना प्रमाणीकरणाची (validation) ची संधी मिळते.

- **गट थेरपीसाठी कुशल सल्लागाराची आवश्यकता असते.**

  गट सत्र चालवण्यासाठी विशेष कौशल्यांची आवश्यकता असते. समुपदेशन सेटिंग्जमध्ये अनेक व्यक्तीमत्त्वाचे व्यवस्थापन करणे यासाठी समुपदेशकाकडे वैयक्तिक कौशल्ये असणे आवश्यक आहे. जसे संप्रेषण, ऐकणे आणि सहानुभूती यासारख्या क्षमता समुपदेशकाला वैयक्तीक थेरपीसाठी महत्त्वाच्या असतात. तसेच गट संभाषणाचे मार्गदर्शन आणि नेतृत्व करण्यात त्यांचा अधिक परिणाम होतो. समुपदेशकांनी संघर्ष सोडवण्यास आणि ग्राहकांनी ऐकमेकांना समजून घेण्यासाठी त्यांना मदत करणे आवश्यक असते. वैयक्तिक थेरपीत सहसा जवाबदाऱ्या नसतात.

  गट समुपदेशनासाठी गोपनीयता आणि नैतिकता हे दुसरे विषय आहेत ज्याला या समुपदेशनात कमी महत्त्व आहे. परंतू त्याचा वापर संदर्भासाठी मोठ्या प्रमाणावर केला जातो. वैयक्तिक सत्रामध्ये जे सांगितले जाते ते कठोर नियंत्रणाखाली असते. परंतु जेव्हा ते संरक्षण गट समुपदेशनात येते तेव्हा ते तितके कठोर राहत नाही. काही बाबतीत गट समुपदेशनात नियम कमी झालेले आपल्याला दिसून येतात. म्हणून ग्राहकात विश्वास वाढवणे आणि प्रामाणिकतेला प्रोत्साहन देणे हे समुपदेशकाचे मुख्य कर्तव्य आहे.

- आपली प्रगती तपासा

  समुपदेशन आयोजित करण्यासाठी आवश्यक असलेल्या कौशल्यांची चर्चा करा.

## ३.७ सारांश

या घटकांत आपण समुपदेशनाचा अर्थ आणि प्रकाराची चर्चा केली आहे.

- अर्थ : “समुपदेशन ही दोन व्यक्तीमधील प्रत्यक्ष भेटीची मालिका असून त्यात समुपदेश्यास स्वतःशी किंवा त्याच्या सभोवतालच्या परिस्थितीशी परिणामकारक समायोजन करण्यास मदत केली जाते."

- प्रकार : समुपदेशन प्रक्रियेचे स्वरूप आणि समुपदेशकाच्या भूमिकेच्या आधारावर समुपदेशनाचे तीन प्रकार आहेत.

**निर्देशित समुपदेशन:-**

निर्देशित समुपदेशनाचा मुख्य पुरस्कर्ता B. G. Williamson हा आहे. या समुपदेशनात समुपदेशक पुढाकार घेतो व त्याचा क्रियात्मक सहभाग अधिक असतो.

अनिर्देशित समुपदेशन:-

या समुपदेशनाचा मुख्य पुरस्कर्ता कार्ल रॉजर्स आहे. या समुपदेशनात समुपदेश्य केंद्रस्थानी असतो. त्याचा क्रियात्मक सहभाग जास्त असतो.

सर्वसंग्रहात्मक समुपदेशन:-

सर्वसंग्रहात्मक समुपदेशनाचा मुख्य पुरस्कर्ता बोर्डन (Borden) हा आहे. या समुपदेशनात समुपदेशक आणि समुपदेश्य दोघेही सक्रिय असतात.

## ३.८ प्रश्न :

१. सल्ला देण्यापेक्षा समुपदेशन का जास्त आहे ?

२. निर्देशित आणि अनिर्देशित समुपदेशनातील फरक स्पष्ट करा.

३. निर्देशित आणि अनिर्देशित समुपदेशनात सर्वसंग्रहात्मक समुपदेशनाला प्राधान्य का दिले जाते?

❄❄❄❄❄❄❄

# ४

# समुपदेशन प्रक्रिया

**घटक रचना**

४.० उद्दिष्टे
४.१ समुपदेशनाची प्रक्रिया - प्रास्ताविक (प्रस्तावना)
    ४.१.१ समुपदेशनाच्या प्रक्रियेतील संकल्पना
४.२ समुपदेशन प्रक्रियेचे टप्पे / अवस्था (stages)
    ४.२.१ सुरुवातीचे प्रकटीकरण / प्रारंभिक अवस्था
    ४.२.२ सखोल शोधन / सखोलता
    ४.२.३ कृतिविषयीची बांधिलकी /संप्रेषण व सूचन
४.३ समुपदेशन कौशल्ये
    ४.३.१ संबंध प्रस्थापित करणे
    ४.३.२ श्रवण कौशल्ये
    ४.३.३ प्रश्न विचारण्याची कौशल्ये
    ४.३.४ प्रतिसादाची कौशल्ये
४.४ समुपदेशनाचे परिणाम
४.५ समुपदेशक म्हणून शिक्षकाची भूमिका
४.६ सारांश
४.७ संदर्भ

## ४.१ उद्दिष्टे

या घटकाच्या अभ्यासानंतर तुम्हाला पुढील गोष्टी करता येतील.

१ समुपदेशनाची प्रक्रिया सांगता येईल
२ समुपदेशनाची कौशल्ये स्पष्ट करता येतील
३ समुपदेशनाचे परिणाम सांगता येतील
४ समुपदेशक म्हणून शिक्षकाची भूमिका स्पष्ट करता येईल.

## ४.१ समुपदेशनाची प्रक्रिया – प्रस्तावना

### पिकार्ड आणि कॅरोल (२०१५), यांनी समुपदेशनाची व्याख्या

समुपदेशन ही एक प्रक्रिया असून यामध्ये एका व्यावसायिका (समुपदेशक) द्वारे ग्राहकाच्या मानसिक, सामाजिक, आणि वैयक्तिक अडचणी सोडवण्यासाठी मार्गदर्शन आणि सहाय्य प्रदान करणे होय. मॅकलॉड (२०१३) च्या मते समुपदेशन ही एक मानसशास्त्रीय थेरपी असून ज्यात समुपदेशकाद्वारे ग्राहकाला पुरविण्यात येणाऱ्या रिलेशनशिप थेरपी, Cognitive कॉग्निटीव्ह, Behavioural बिहॅव्हीअरल थेरपी आणि मानसोपचार थेरपी यांचा समावेश आहे. ग्राहकाने आपल्या कठिण भावना प्रभावीपणे समुपदेशकाला सांगाव्यात

आणि समुपदेशक ग्राहकाला त्या समस्याचे स्वतःच उपाय शोधण्यासाठी त्यांना मदत करतात. या व्याख्येतून आपण असे म्हणू शकतो की समुपदेशन प्रक्रिया ही समुपदेशक आणि ग्राहक यांच्यातील नियोजित आणि रचनात्मक संवाद आहे. तसेच ही एक सहाय्यक प्रक्रिया आहे ज्यात एक प्रशिक्षित व्यावसायिक जो सल्लागार आहे. तो एखादया अडचणीत असलेल्या व्यक्तीला म्हणजेच ग्राहक नावाच्या व्यक्तीला अडचणी किंवा चिंतांचे स्त्रोत ओळखण्यास मदत करतो ज्याचा ती व्यक्ती अनुभव घेत असते. सहकार्यासह ते या समस्यांना सामोरे जाण्याचे आणि त्यावर मात करण्याचे मार्ग विकसित करतात जेणेकरून त्या व्यक्तीकडे नवीन कौशल्ये आणि स्वत:बद्दल आणि आणि इतराबद्दलची समज वाढण्यास मदत होते. उदाहरणार्थ: महाविद्यालय किंवा विद्यापीठातील विदयार्थी विद्यापीठात कसे शिक्षण घ्यावे याबददल चिंता करू शकतात. शैक्षणिक किंवा करिअरच्या दिशेने त्याच्यात स्पष्टता नसु शकते. दुसऱ्या वंश किंवा धर्माच्या विद्यार्थ्यासोबत रूम शेअर करण्यात त्यांना अडचण येऊ शकते. स्वाभिमान, भावनेविषयी काही समस्या असू शकतात.  तणावग्रस्त, रोमँटिक नातेसंबंधामधील अडचणी असू शकतात. अशाप्रकारच्या अनेक समस्या विदयार्थ्याना येत असतात. अशावेळी विदयार्थ्याला समुपदेशन हा एक उत्तम पर्याय ठरू शकतो, “समुपदेशन ही समोरासमोरील नातेसंबंधाची प्रक्रिया आहे ज्यामध्ये समुपदेशक आणि सल्लार्थी या दोघांचीही वाढ होते.  तसेच समुपदेशनामध्ये सर्व प्रकारच्या व्यक्तिगत परिस्थितीचा समावेश होतो. ज्यामध्ये एका व्यक्तीला स्वतःशी व त्याच्या पर्यावरणाशी प्रभावीपणे समायोजन करण्यासाठी सहकार्य केले जाते.

- व्यावसायिक समुपदेशनाचे स्वरूप खालीलप्रमाणे असू शकते.
- वैयक्तिक समुपदेशन :-
- हा समुपदेशनाचा सर्वात सामान्य प्रकार आहे. यात एखादया व्यक्तीची वाढ आणि मानसिक आरोग्यावर लक्ष केंद्रित केले जाते.
- जोडपे किंवा विवाह समुपदेशन :-
- हा प्रकार प्रामुख्याने जोडप्यांना त्यांच्यामध्ये निर्माण झालेल्या संघर्षावर मात करण्यासाठी आणि नात्यांना करण्यावर लक्ष केंद्रित करतो.
- कौटुंबिक समुपदेशन:-

या प्रकारात कुटूंबाची वेगळी गतीशीलता आणि ते कुटूंबाच्या संरचनेवर कसा परिणाम करतात याचा समावेश होतो.

**गट समुपदेशन :-**

समुपदेशनाच्या या प्रकाराचा वापर गटातील सुसंवादात वाढ करण्यासाठी केला जातो.

व्यावसायिक सल्लागार आणि समुपदेशन मानसशास्त्रज्ञ सामान्यतः सर्व प्रकारच्या संस्थात्मक सेटिंग्जमध्ये आढळतात. जसे की, हायस्कूल, महाविद्यालये, खाजगी उद्योग, समुदाय एजन्सी, कारागृह आणि लष्करी तसेच खाजगी सरावामध्ये, अनपेक्षित दुर्घटनांमुळे उद्‌भवलेल्या त्यांच्या तक्रारींना सामोरे जाण्यासाठी लोकांना मदत करण्यासाठी त्यांना अनेकदा बोलावले जाते.

### ४.१.१ समुपदेशनाच्या प्रक्रियेतील संकल्पना

समुपदेशनाच्या प्रक्रियेत काही संकल्पना असतात, त्या खालीलप्रमाणे आहेत.

- **(Readiness) /तत्परता / तयारी**

  समुपदेशक मुख्यतः दोन प्रकारचे असतात. एक म्हणजे स्वेच्छेने मदत मागणारे आणि दुसरे ज्यांना काही स्त्रोतांद्वारे संदर्भित केले जाते. समुपदेशनात समुपदेशकाची मदत करण्याची इच्छा ही पूर्व ग्रहीत असते. यात समुपदेशक ग्राहकाची किंवा समुपदेश्याची समस्या सोडविण्यास स्वेच्छेने तयार असतो. म्हणून या इच्छेला तत्परता म्हणून संबोधिले जाते.

- **(Counter will) काउंटर विल :**

  लोकांना सहसा मदत मागण्यात आणि ती स्वीकारण्यात अडचण येते, कारण ते बदलाचे परिणाम किंवा अपयशाच्या अपुरेपणाचा स्वीकार करण्यास तयार नसतात. नकारात्मक भावना जी एखादयाला मदत मागण्यापासून रोखते त्याला काउंटर इच्छाशक्ती म्हणून संबोधले जाते.

- **केस हिस्ट्री / भूतकाळातील घटनांचे अध्ययन (case History)** :-

  केस हिस्ट्री ही समुपदेशकाच्या भूतकाळातील आणि वर्तमान जीवनाविषयी माहिती गोळा करण्याची पध्दतशीर प्रक्रिया आहे.

- **संबंध (Rapport):-**

  संबंध हे समुपदेशकाने तयार केलेले एक उबदार, मैत्रीपूर्ण, आणि समजुतदार वातावरण आहे. जे ग्राहकासोबत प्रभावी समुपदेशन संबंध तयार करण्यासाठी उत्प्रेरक म्हणून कार्य करते. नात्याची उबदारता आणि विश्वासाची भावना जी बिनशर्त स्वीकारल्यामुळे वाढत असते. तसेच यामुळे समुपदेशक आणि ग्राहक |यांच्यातील संबंध प्रस्थापित होण्यास मदत होते

- **हस्तांतरण (Transference):-**

  यामध्ये समुपदेशकांने ग्राहकांना त्याच्या भावना मुक्तपणे व्यक्त करण्यास प्रोत्साहित केले पाहिजे. स्वताविषयीची सर्व माहिती, त्याच्या मनातील संघर्ष, मतभेद जाणून घेण्यास ग्राहकाला उद्युक्त करण्यासाठी समुपदेशकाने प्रयत्न करणे आवश्यक असते

- **काउंटर ट्रान्सफरन्स (Counter transference):-**
  काउंटर ट्रान्सफरन्स तेव्हा घडते जेव्हा समुपदेशक त्यांचे निराकरण न केलले संघर्ष समुपदेश्यावर मांडतात. यावेळी समुपदेशकला राग अनावर होतो. त्याला अस्वस्थतेची जाणीव होत असते.

- **प्रतिकार (Resistance) :-**
  हे समुपदेशकाच्या निर्धारित उद्दिष्टांचा दिशेने काम करण्यासाठी समुपदेश्याला विरोध करण्याच्या हालचालीचा संदर्भ देते. हे समुपदेशनाच्या परिणामावर सकारात्मक परिणाम करते.

## ४.२ समुपदेशन प्रक्रियेचे टप्पे / अवस्था :-


समुपदेशनाच्या व्याख्येतून हे स्पष्ट होते की, ही एक परस्पर संवादी प्रक्रिया आहे जी समुपदेशक आणि ग्राहक यांच्यातील एक अद्वितीय संबंध दर्शवते. एक प्रक्रिया म्हणून समुपदेशन समजून घेण्यासाठी परिणामाची उद्दिष्टे आणि प्रक्रियेची उद्दिष्टे यात फरक करणे महत्वाचे आहे. निकालाची उद्दिष्टे ही समुपदेशनाचे इच्छित परिणाम असतात. सामान्यतः त्यांचे वर्णन समुपदेशकाशी त्याच्या संवादाच्या परिणामस्वरूप ग्राहकाला काय साध्य करायचे आहे या संदर्भात केले जाते. निकालाची उद्दिष्टे ग्राहकाच्या बदलाच्या दृष्टीने सांगीतली जातात. जी समुपदेशनानंतर ग्राहकाच्या वागण्यातून दिसून येतात.

याउलट प्रक्रियेची उद्दिष्टे त्या घटना असतात. ज्यात समुपदेशकाला इच्छित उद्दिष्टे आणण्यासाठी सर्व आवश्यक पावले उचलावी लागतात तसेच सर्व प्रक्रिया कराव्या लागतात.

उदाहरणार्थ: - एखादा समुपदेशक विचार करू शकतो "जर मी या ग्राहकाला मदत करू इच्छितो, तर तो काय म्हणत आहे. ते मी सक्रियपणे ऐकले पाहिजे आणि त्याच्या वर्तमान आणि भविष्याच्या कल्याणासाठी त्याच्या चिंतांचे महत्त्व समजून घेतले पाहिजे. तसेच त्याचा दृष्टीकोन काय आहे हे मला समजले पाहिजे. त्याचे वर्णन इतरांशी त्यांच्या वागण्याच्या पद्धतीवर प्रभाव पाडते. मला त्याच्या चिंतांशी संबंधित आसपासच्या परिस्थिती समजल्या पाहिजेत आणि त्याच्या वर्तनाला समर्थन देणाऱ्या प्रबलक घटना मला समजल्या पाहिजेत" ही सर्व विधाने प्रक्रिया उद्दिष्टांची आहेत. जी समुपदेशकाच्या वर्तनाशी संबंधित आहेत.

प्रक्रिया ही कालांतराने घडणाऱ्या घटनांचा ओळखता येणारा क्रम आहे. सहसा या प्रक्रियेत प्रगतीशील टप्प्यांचा वापर केला जातो.

**समुपदेशनाच्या अवस्था खालील प्रमाणे**



### ४.२.१ प्रारंभिक प्रकटीकरण

समुपदेशनाच्या सुरवातीला, समुपदेशक आणि ग्राहक एकमेकांसाठी नवीन असतात. ते एकमेकांना चांगले ओळखत नसतात. समुपदेशक त्याच्या चर्चेला शेवटी कोणत्या दिशेने नेईल याचा पूर्व अंदाज लावू शकत नाही. ग्राहकाला पूर्व अंदाज नसतो की तो त्याच्या समस्या उघडपणे समुपदेशकासमोर मांडू शकतो. यावेळी तो थोड़ा चिंताग्रस्त असू शकतो. कारण समुपदेशक त्याने केलेले खुलासे कशाप्रकारे स्वीकारेल याची त्याला खात्री नसते. आपल्या सर्वांना माहित आहे की प्रकटीकरण न करता, समुपदेशन ही एक रिक्त प्रक्रिया आहे.

पहिल्या टप्प्यात म्हणजेच प्रारंभिक प्रकटीकरणात समुपदेशकास दोन महत्त्वाची कार्य पार पाडावी लागतात. ती म्हणजे समुपदेश्याच्या मनातील भिती दूर करणे आणि त्याला स्वतःबद्दल अधिकाधिक माहिती उघड करण्यास प्रेरित करणे. समुपदेश्य जो पर्यंत स्वयंप्रेरित होऊन स्वताची माहिती समुपदेशकाला सांगत नाही तोपर्यंत समुपदेशनाला काही अर्थ उरत नाही. तसेच समुपदेशकाला समुपदेश्याला बोलते करून त्याच्याकडून अधिकाधिक माहिती मिळवण्यासाठी प्रयत्नशील असले पाहिजे.

प्रारंभिक प्रकटीकरणाचे मुख्य उदिष्ट म्हणजे समुपदेश्याच्या मनात समुपेदशकाबद्दल विश्वास निर्माण करणे. हा विश्वास निर्माण होण्यासाठी समुपदेशकास योग्य वातावरण निर्मीती करावी लागते. परस्परातील विश्वास संपादन करण्याच्या प्रक्रियेला काल रॉजर्स (१९५१) यांनी फार महत्व दिले आहे. योग्य आणि पोषक वातावरण निर्मीतीसाठी पुढील बाबी महत्त्वपूर्ण आहेत.

- **तद्नुभूती (Empathy):-**

  दुसऱ्यांचे अनुभव आपलेच आहेत असे समजण्याची क्षमता म्हणजेच तद्नुभूती होय. हे जसे ग्राहकाच्या -हृदयात शिरुण त्याच्या भावना व त्याच्या बोलण्याचा आशय समजून घेण्यासारखे आहे.

- **एकरूपता आणि खरेपणा (congruence or Genuineness)**

  यामध्ये समुपदेशकाचे नैसर्गिक वर्तन आणि समुपदेश्याबरोबर बोलण्यातील, वागण्यातील खरेपणा असणे गरजेचे असते. यामुळे नात्यातील विश्वसार्हता टिकून राहण्यास मदत होते.

- **बिनशर्त सकारात्मक संबंध: (Unconditional Positive Regards) :-**

  समुपदेशकात कोणत्याही अटीशिवाय समुपदेश्यास मदत करण्याची इच्छा असवी लागते. उदाहरण: "मला जे हवे ते केले तर मी तुमची काळजी करेन." असा विचार समुपदेशकाने टाळणे महत्त्वाचे असते

- **एकसंघता (concreteness) :-**

  Egan (१९८८) यांनी समुपदेशन प्रक्रियेत आणखी एक अट जोडली आहे ती म्हणजे एकसंघता. यात ग्राहकाच्या जीवन परिस्थितीचे वर्णन करण्यासाठी स्पष्ट भाषा वापरणे समाविष्ट आहे. ज्यामुळे समुपदेशन प्रक्रिया सुलभ होण्यास मदत होते.

  प्रारंभिक प्रकटीकरण अवस्थेत प्रभावी समुपदेशन प्रक्रियेमुळे ग्राहकांद्वारे खालील हेतूसाठी आत्म- प्रकटीकरण केले जाते.

- ग्राहकाच्या आयुष्यात काय घडले आहे आणि त्या घटनांबद्द्ल ग्राहक काय विचार करतो आणि त्याला काय वाटते. याबद्दलची सर्व माहिती ग्राहकाने समुपदेशकाला देणे चांगल्या समुपदेशनासाठी आवश्यक असते.

- समुपदेशक ग्राहकाला तिच्या किंवा त्याच्या समस्याबद्दल बोलण्यासाठी किंवा त्यांच्या भावना प्राप्त करण्यासाठी प्रोत्साहित करतात. यातून ग्राहकांच्या भावना हलक्या होतात व त्यांना आराम मिळतो तसेच त्यांच्यात विश्वासाची भावना विकसीत होते

- ग्राहकाला त्याची नेमकी समस्या काय आहे याची स्पष्ट व्याख्या विकसित करण्यासाठी आणि नेमके त्रासदायक काय आहे याबददल अधिक समज विकसित करण्यासाठी प्रोत्साहित करणे.

- ग्राहकाला त्याच्या किंवा तिच्या कथेतील घटकांना जोडण्यासाठी आणि परस्पर संबंध प्रस्थापित करण्या साठी मदत होते. ज्यामुळे त्यांच्यात नवीन अंतर्दृष्टी आणि नवीन आयाम निर्माण होते.

### ४.२.२ सखोल शोधन / सखोलता (In depth Exploration)

सखोल शोधन करणे हा समुपदेशन प्रक्रियेचा दुसरा टप्पा आहे. या टप्प्यात, समस्येचा सखोल शोध घेणे आणि समस्येचा मर्मावर बोट ठेवणे हा या टप्प्याचा उद्देश असतो. तसेच ग्राहकाला त्याच्या किंवा तिच्या समस्येची जाणीव असणे आवश्यक असते. पहिल्या टप्प्यात मिळालेल्या माहितीच्या आधारे समुपदेशक ग्राहकाची चुकीची विचारपध्दती, आणि समस्येला चुकीचा प्रतिसाद देण्याची पद्धती यावर लक्ष केंद्रित करतो. समुपदेशकाने ग्राहकाच्या वर्तनाचे केलेले निरीक्षण त्यांच्या लक्षात आणून दिले जाते. समुपदेशक ग्राहकाच्या गरजा, क्षमता, उणीवा अधिक चांगल्या प्रकारे स्पष्ट करतो. समुपदेशकाने केलेल्या नोंदीद्वारे ग्राहकाला स्वतःकडे आव्हानात्मक आणि सुधारित दृष्टीने बघण्याची संधी मिळते. सखोल शोधात समुपदेशक आणि ग्राहक परस्परमान्य समस्येचे मुल्यांकन आणि निदान करतात.

सखोल शोधण हे उदयोन्मुख ध्येयपूर्ण करताना निर्माण होणाऱ्या समस्याची "फ्लिप साईड" म्हणून विचार करण्यासाठी हे एक उपयुक्त रूब्रिक आहे. या टप्प्यांत समुपदेशकाचे कार्य हे मित्रत्वाचे आणि मार्गदर्शकाचे असते जे ग्राहकात नवीन जागरूकता आणि दृष्टीकोन विकसित करण्यासाठी ग्राहकाला मदत करते. या टप्प्यात अनेकदा भावनिक तणाव निर्माण होतो कारण आपले इच्छित ध्येय साध्य करण्यासाठी ग्राहकाने आपल्या काही सवयी सोडणे, वर्तनात काही बदल घडवून आणणे अपेक्षित असते. ग्राहकाच्या पूर्वीच्या वर्तनावर टीका न करता समुपदेशक त्याला त्याच्या चूका समजावून सांगतो या टप्प्यात समुपदेशक आणि ग्राहक या दोघांनाही खालील बाबतीत जागरूक राहणे आवश्यक असते.

- ग्राहकाच्या जीवनातील काही घटना ज्या ग्राहकाचे सध्याचे व्यक्तिमत्त्व आणि परिस्थिती घडवण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात.
- जीवनातील परिस्थितीशी सामना करण्यासाठी ग्राहकाच्या क्षमतेमध्ये असलेल्या कमतरता, ग्राहकांकडे असणारे सामर्थ्य आणि त्याच्या समस्येचे निराकरण करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या क्षमतेतील कमतरतची जाणीव त्याला असावी लागते.

दुसऱ्या टप्प्यात सुरुवातीला समुपदेशक ग्राहकाची गतीशिलता आणि त्याच्या लढा देण्याच्या वर्तनावर त्याच्या निदानात्मक छाप चर्चेत आणण्यास सुरुवात करतो. या टप्प्यात समुपदेशकाचा सहानुभूतीपूर्ण प्रतिसाद म्हणजे त्याचे वागणे समुपदेशकाच्या या सहानुभूती प्रतिसादात पूर्वीच्या सत्रातील सर्व साहित्यांचा समावेश असतो. त्यानंतर समुपदेशक ग्राहकाच्या मनाच्या स्थितीवर जास्त लक्ष केंद्रित करतो ज्यामुळे समुपदेशकाला त्याच्या जगाची माहिती मिळेल तसेच आणखी सखोल शोधणासाठी प्रेरणा मिळेल.

पुढे नातेसंबंध जास्तच सुरक्षित आणि मजबूत होत असताना समुपदेशक देखील ग्राहकाला त्याच्या ध्येयांच्या वर्तनाबद्दल निरीक्षणासह तोंड देण्यास तयार असतो. व्यापकपणे सांगायचे झाले तर, विधायक संघर्ष ग्राहकाला त्याच्या वागणूकीचा बाह्य दृष्टिकोण प्रदान करतो. ग्राहक समुपदेशनाचा ठसा स्विकारण्यास, नाकारण्यास किंवा सुधारण्यास पूर्णपणे स्वतंत्र असतो.

समुपदेशकाच्या वर्तनाचा दुसरा गुण म्हणजे तत्परता. दुसऱ्या टप्प्यात समुपदेशनाच्या दृष्टीने तत्परतेला खूप महत्त्व आहे. समुपदेशक ग्राहकाच्या विधानावर त्वरित प्रतिक्रिया देतात. किंवा ग्राहकाला समुपदेशकाबद्दल वर्तमान विचार उघड करण्यास सांगतात. समुपदेशकाचा त्वरित प्रतिसाद एक स्वयं अंतर्भूत विधान असू शकते.

समुपदेशनाचा दुसरा टप्पा सहसा खूप भावनिक आणि तणावपूर्ण असतो कारण ग्राहकाला आपल्या वर्तनात बदल करावे लागतात. त्यामुळे त्याला हे काम अत्यंत काळजीपूर्वक करावे लागते. तसेच समुपदेशक ग्राहकाच्या पूर्वीच्या वर्तनावर टीका न करता त्याला त्याच्या चुका समजावून सागतात.

### ४.२.३ कृतिविषयीची बांधिलकी (commitment to action)

हा समुपदेशन प्रक्रियेतील शेवटचा टप्पा आहे. आधीच्या दोन टप्प्यांत निश्चित झालेली उद्दिष्टे कशी साध्य करावीत याचा विचार तिसऱ्या पायरीत केला जातो. साध्य करावयाचे ध्येय आणि आपले वर्तन यातील संबंध ग्राहकाला लक्षात घ्यावे लागते. समस्या दूर करण्यासाठी आपल्या वर्तनात आवश्यक ते बदल करण्यास ग्राहक बांधिल असतो. अनेक पर्यायापैकी एका पर्यायाची निवड ग्राहकास करावी लागते. त्यानंतर परिणामाच्या संभाव्यतेनुसार त्या पर्यायाचे मुल्यमापण करणे आवश्यक असते. ग्राहकाच्या मर्यादा व त्यांची बलस्थाने ओळखून. समुपदेशक त्याला विशिष्ट कृती करण्यासाठी प्रवृत्त करतो.

समुपदेशक प्रथमत: ती कृती कशी करावी हे सांगतो. त्यानंतर ती कृती करून दाखवितो आणि शेवटी ती कृती ग्राहकांकडून करून घेतो. यासाठी तो ग्राहकाला विशिष्ट विचारकौशल्ये, संवादकौशल्ये किंवा कृतीकौशल्ये यांचा कसा वापर करावा हे शास्त्रीय पद्धतीने सांगतो. ग्राहकाला त्याच्या कृतीत अपयश आल्यास समुपदेशक त्याची कारणमिमांसा देतो. शिवाय त्यात योग्य त्या सुधारणा सुचवितो, समुपदेशन प्रक्रियेचे उद्दिष्ट गाठण्याकरिता पायरी - पायरी ने प्रत्येक कृतीत यशस्वी होणे अत्यंत आवश्यक असते आणि त्याकडेच समुपदेशकाचे लक्ष असते.

चांगले बदल घडून आले तर समुपदेशक ग्राहकाला शाबासकी देतो. त्याची प्रशंसा करतो. त्यामुळे ग्राहकाचा उत्साह वाढतो. समुपदेशकाच्या अपेक्षेप्रमाणे नवीन वर्तन कृती शिकण्याचा व ती स्वतःत रुजविण्याचा ग्राहक प्रयत्न करतो. नवीन वर्तनबदलाचे त्याच्या परिणामकतेचे मूल्यमापन केले जाते. अपेक्षित ध्येय साध्य होताच समुपदेशनाची प्रक्रिया समाप्त होते.

## ४.३ समुपदेशन कौशल्ये :-

काही महत्वपूर्ण समुपदेशन तंत्रे आहेत ज्याचा वापर तुम्ही समुपदेशन सत्रांत करू शकता. प्रभावी समुपदेशनासाठी तसेच ग्राहकाशी व्यवहार करण्यासाठी समुपदेशकाकडे काही आवश्यक कौशल्ये असणे आवश्यक आहे. चार आवश्यक समुपदेशन कौशल्ये खालीलप्रमाणे आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| संबंध प्रस्थापित करणे | ऐकणे | प्रश्न विचारणे | प्रतिसाद |

### ४.३.१ (Rapport Building): - संबंध प्रस्थापित करणे

समुपदेशन करताना ज्या समुपदेशन प्रकाराचा किंवा थेरपीचा विचारपूर्वक वापर करणे आवश्यक असते, जर त्याचा संबंध ग्राहकाशी नसेल तर अर्थपूर्ण बदल घडून येणार नाहीत. ग्राहकासोबत काम करताना आपल्याला त्यांच्याशी चांगला संबंध प्रस्थापित करणे आवश्यक आहे. संबंध म्हणजे व्यक्तीशी संबंध असण्याची जाणीव किंवा भावना. ग्राहक

आणि समुपदेशक यांना जोडणारा दुवा म्हणून संबंधाकडे पाहिले जाते. चांगला व मजबूत संबंध ग्राहक व समुपदेशकात निर्माण होणे आवश्यक असते. यामुळे ग्राहकांकडून समुपदेशकाकडे माहितीचे परस्पर प्रसारण शक्य होते. आपल्या ग्राहकाशी संबंध निर्माण करणे हे सर्वात महत्त्वाचे समुपदेशन कौशल्ये आहे. ग्राहकाशी संबंध प्रस्थापित करण्यासाठी समुपदेशकाला खालील बाबींची जाण असावी लागते.

- समुपदेशकाला सत्रासाठी तयार असणे आवश्यक आहे. समुपदेशनाच्या प्रक्रियेसाठी समुपदेशकाने स्वतःला शांत आणि सज्ज ठेवावे लागते. तसेच स्वतःच्या समस्यादूर ठेवणे आवश्यक असते.

- पर्यावरण सुरक्षित आणि विश्वासार्ह बनवले पाहिजे. ती जागा शांत, स्वच्छ, आनंददायी आणि आकर्षक असावी. तसेच ग्राहकाला आरामदायक आसनाची व्यवस्था केली जावी, त्याला एखादा कप कॉफी दिली जावी आणि ज्या खोलीत समुपदेशन प्रक्रिया घेतली जाणार आहे तेथे कोणी घुसखोर तर नाही याची खात्री केली जावी, त्याचबरोबर सत्र खाजगी बनवव्यासाठी खोली ध्वनीरोधक करणे आवश्यक असते.

- ग्राहक कोण आहे याची जाणीव असणे गरजेचे असते. यात ग्राहकाची मुलभूत माहिती जसे की नाव माहित असणे आणि त्यांच्या समस्याविषयीच्या महत्त्वाच्या गोष्टी लक्षात ठेवाव्या लागतात. मागील सत्रातील नोट्स वाचाव्या लागतात.

- जेव्हा जेव्हा आवश्यक असेल त्यावेळी ग्राहकासोबत, राहण्याचा प्रयत्न करून ग्राहकास सहानुभूती प्रदान करणे, तसेच ग्राहकाला त्याच्या समस्येबद्दल काय वाटते त्याचा दृष्टीकोन समुपदेशकाच्या दुष्टीकोनाशी वेगळा असण्याची शक्यता असते. हे जाणून घेण्याचा प्रयत्न करावा लागतो.

- समुपदेशकाने ग्राहकाला आहे तसे स्विकारण्याची त्याची मानसिकता असावी लागते. ग्राहकाने जे काही आणले असेल त्याला आहे तसे स्विकारण्याचा प्रयत्न समुपदेशकाने करावा लागतो. काही वेळा ग्राहकाचे वर्तन आश्चर्यचकीत करणारे असू शकते. तरीही समुपदेशकाने त्याला बिनशर्त सकारात्मक आदर देणे आवश्यक असते.

- समुपदेशकाने ग्राहकाला वेळ देणे खूप महत्त्वाचे असते. त्याच्या भावना जाणून घ्याव्या लागतात. काही वेळा ग्राहकाला स्वतःच्या भावना व्यक्त करणे अवघड जाते. अशावेळी त्याच्याशी धीर धरून त्याला विचार करायला वेळ दयावा लागतो.

  समुपदेशकाशी ग्राहकाचा चांगला संबंध प्रस्थापित झाल्यास, ग्राहकाचा समुपदेशकाबद्दल विश्वास वाढण्यास मदत होते. खाली काही समुपदेशन कौशल्ये दिले आहेत जे ग्राहकाशी संबंध विकसित करण्यासाठी वापरले जाऊ शकतात.

- सक्रियपणे ऐकणे (Active Listening) :-
  ऐकणे हे समुपदेशनाचे सर्वात महत्त्वाचे कौशल्ये आहे. यात फक्त ऐकणेच महत्वाचे नाही तर ग्राहकाला हे जाणवले पाहिजे की त्याचे बोलणे ऐकले जात आहे. याची समुपदेशकाने खात्री करणे आवश्यक आहे. समुपदेशकानेही आदरपूर्वक प्रतिसाद दिला पाहिजे. तसेच त्याने ग्राहकाचे बोलणे सक्रियतेने ऐकले पाहिजे.

- शांततेत विचार केल्याने ग्राहकाला त्याचे विचार आणि भावनांवर विचलित न होता प्रक्रिया करण्यास वेळ मिळतो.

- परावर्तनाने तसेच शब्दलेखनामुळे ग्राहकाला जाणवेल की त्याला पूर्णपणे समजले जात आहे. समुपदेशनात हे खूप महत्त्वपूर्ण असते.

- ग्राहकाविषयीची अधिक वैयक्तिक आणि संवेदनशील मुदयांवर चर्चा करण्यासाठी त्याची संस्कृती, पार्श्वभूमी, व्यक्तीमत्व इत्यादीवर विश्वास निर्माण करण्यासाठी ग्राहकाकडून अधिक वेळ घेतला जाईल. मुल्यांकन हे विश्वास स्तरावर करण्याच्या हेतूने ग्राहक दोन्ही घटकावर काय माहीती पुरवत आहे हे लक्षपूर्वक पाहणे गरजेचे असते. (सुरवातीला काही ग्राहक फक्त वरवरची माहिती पुरवतात) आणि ग्राहकाची देहबोली, चेह-यावरील हावभाव शारीरिक अविर्भाव, हालचाली स्पर्श इ. मधील त्याची' शब्दापलीकडील मानसिक स्थिती समुपदेशकाला समजली पाहिजे.


- ग्राहकाशी आदराने वागले पाहिजे. हे खूप सहाजिक वाटू शकते. परंतू आपल्या पहिल्या भेटी पासूनच ग्राहकाला एक महत्त्वाची व्यक्ती म्हणून वागवले पाहिजे. यासाठी सत्र वेळेवर सुरू करणे, व्यावसायिकपणे कपडे परिधान करणे, त्यांच्यासाठी कागदपत्रे तयार करणे इत्यादीद्वारे केले जाऊ शकते. तसेच तुम्ही तुमच्या वेळेची किंमत करता तसे त्यांच्या वेळेलापण महत्त्व दिले पाहिजे.

- आपल्या ग्राहकाचे बोलणे व्यवस्थित ऐका आणि त्यांच्या संप्रेषण शैलीबद्दल जागरूक होणे आवश्यक असते. एकदा एक शहाणा शिक्षक म्हणाला होता की, समुपदेशक म्हणून आम्ही ट्यूनिंग फॉर्क सारखे होतो. आमची कामे ग्राहकाला निरोगीपणा किंवा सामान्यपणाच्या जवळ आणणे किंवा त्यांच्यात सुसंगतता आणणे ही होती. म्हणून आम्ही ग्राहकांच्या संवाद लयशी जूळवण्याचा प्रयत्न केला पाहिजे. उदाहरणार्थ जसे हायपर ॲक्टीव्ह ग्राहकासाठी आम्हाला हायपर ॲक्टीव्हीटीच्या शांत बाजूचा स्वीकार करावा लागतो. बऱ्याचदा ग्राहक आमच्या शैलीला प्रतिबिंबित करण्याचा प्रयत्न करतो. अशाप्रकारे ग्राहक शांत होऊ लागतो.

- सक्षम होणे खूप आवश्यक आहे कारण असक्षमताच समुपदेशनाचे संबंध बिघडण्यासाठी कारणीभूत असते. ग्राहकाच्या समस्या निराकरण करण्यापूर्वी आपल्याला योग्य प्रशिक्षण आणि अनुभव मिळाल्याची खात्री करणे आवश्यक असते.

### ४.३.२ ऐकणे (Listening ):-

ऐकणे हे उपचारात्मक संबंधातील सर्वात महत्त्वाचे समुपदेशन कौशल्यांपैकी एक आहे. हे खालील तीन प्रकारात वापरले जाऊ शकते.




- **(Attending) उपस्थिती /हजेरी** :

  ग्राहकासाठी विशिष्ट ठिकाणी आणि वेळेवर शारीरिकरित्या उपस्थित राहण्याची क्षमता म्हणन हजेरीची व्याख्या केली जाते. याचा अर्थ त्यांना आपले वैयक्तिक आणि अविभाज्य लक्ष देणे असा होतो. यामध्ये योग्य Eye Contact करणे, शरीराची देहबोली आणि होकार देणे यांचा समावेश होतो. हे उपस्थित वर्तन ग्राहकाला सूचित करते की आपण त्यांच्या समस्यांची काळजी घेत आहोत. खर तर समुपदेशक आणि ग्राहक यांच्यातील संवाद हे अभाविकपणे होत असतात याचे संशोधन केले गेले आहे.

- **सक्रिय ऐकणे (Active listening) :**

  जेव्हा समुपदेशक आपल्या ग्राहकाचे सर्व इंद्रियानी आणि लक्षपूर्वक ऐकतो तेव्हा त्याला सक्रिय ऐकणे असे म्हणतात. सक्रिय ऐकण्यात तुमच्या शरीराचा, हृदयाचा, कानांचा, डोळ्यांचा आणि तोंडाचा समावेश होत असतो.

- **मौखिक ऐकणे (verbal listening) :**

  आपण वापरत असलेल्या शब्दांद्वारे आपण ऐकत आहोत हे दाखवण्याचा हा एक प्रकार आहे. शब्दित संकेत हे लक्ष दर्शवण्यासाठी आणि अधिक प्रोत्साहित करण्यासाठी वापरले जातात. यामध्ये होय किंवा पुढे जा सारखे सोप्या शब्दांचा देखील समावेश असतो. तसेच ते ग्राहकाने नुकत्याच सांगीतलेल्या शब्दांची व्याख्या किंवा पुनरावृत्तीच्या स्वरूपात देखील असू शकते.

### ४.३.३ प्रश्न विचारणे

समुपदेशनात ग्राहकाकडून आवश्यक ती माहिती काढून घेण्यासाठी समुपदेशकास प्रश्न कौशल्य अवगत असणे अपरिहार्य असते. ग्राहकाला बोलण्यास प्रेरित करण्यासाठी प्रश्न उपयुक्त असतात. ग्राहकाच्या समस्येचे अचूक निदान करण्यासाठी त्याच्याकडून आवश्यक ती माहिती मिळवावी लागते. ही माहीती प्रश्नाच्या साह्याने समुपदेशक मिळवू शकतो. सामान्यतः प्रश्नाचे ढोबळ मानाने दोन प्रकार पडतात.

**१. बंदिस्त प्रश्न (closed Question):-**

होय किंवा नाही अशा स्वरूपाचे प्रश्न म्हणजे बंदिस्त प्रश्न होय. ग्राहकाकडून तात्काळ माहिती मिळविण्यासाठी बंदिस्त प्रश्न उपयुक्त आहेत. या प्रश्नांना एका शब्दाची उत्तरे येतात. समुपदेशन संबंधात बंदिस्त प्रश्न सामान्यतः टाळले जातात. कारण ते सखोल संशोधनाला प्रोत्साहन देत नाही.

**२. मुक्त प्रश्न (open Question):-**

मुक्त प्रश्न विचारास प्रवृत्त करतात. ग्राहकाला समस्या कथन करण्यास, समस्येचे विस्तृत वर्णन करण्यास समुपदेशक मुक्त प्रश्नांचा वापर करतो. माहिती गोळा करण्यासाठी मुक्त प्रश्न आवश्यक आहे. प्रत्येक मुक्त प्रश्न हा हेतुपरस्पर आणि उपचारात्मक असावा लागतो. सर्वोत्तम खुले प्रश्न कसे आणि काय ने सुरू होतात. मुक्त प्रश्न ग्राहकाच्या समस्यासाठी वर्णनात्मक आणि अधिक व्यापक दृष्टिकोण प्रदान करण्याचे स्त्रोत म्हणून काम करतात.

### ४.३.४ प्रतिसाद कौशल्ये (Responding)

समुपदेशकाला शाब्दिक तसेच अशाब्दिक प्रतिसाद देण्याचे तंत्र अवगत असले पाहिजे. समुपदेशनाच्या वातावरण्यात, प्रतिसाद देताना समुपदेशकाचे लक्ष प्रत्यक वेळी ग्राहकाच्या भावना आणि शाब्दिक अभिव्यक्तीवर केंद्रित असणे आवश्यक असते. ग्राहकाचे बोलणे पूर्णपणे समजून घेतल्याशिवाय सकारात्मक पद्धतीने प्रतिसाद देण्यासाठी केवळ लक्ष केंद्रित करणे आवश्यक नाही तर एकाग्रता, मौखिक आणि भावनिकदृष्ट्या काय व्यक्त केले जात आहे. तसेच ग्राहक एखादया सूचनेशी सहमत आहे की नाही हे देखील तपासले पाहिजे. ग्राहकाच्या समुपदेशनाचा अनुभव आणि सत्रांत सहाय्यक सेवा प्रदान करणे हे समुपदेशकाचे कर्तव्य आहे. स्पष्ट प्रतिसाद आणि प्रतिबिंबित कौशल्यांचा वापराशीवाय, ग्राहकाला देऊ केलेले समुपदेशनाचे स्तर ग्राहकाला प्रेरित आणि प्रोत्साहित करण्यासाठी पुरेसे नसतील.

प्रतिसाद देणे म्हणजे सक्रिय ऐकण्याच्या तंत्राचा वापर करणे. कोणी तुम्हाला काय म्हणते ते तुम्ही पुन्हा सांगू शकता, त्यावर हो किंवा नाही मध्ये होकार देऊ शकता आणि विशेषतः त्यांच्या शब्दांबद्दल प्रश्न विचारू शकता. ग्राहकाच्या समस्यांवर परिपूर्ण उपाय शोधण्यासाठी संभाषणाच्या माध्यमातून समुपदेशकाला विचारपूर्वक प्रतिसाद देणे खुप महत्वाचे असते.

## ४.४ समुपदेशन परिणाम :

समुपदेशन ही परस्परसंवादी प्रक्रिया आहे. यामध्ये समुपदेशक आणि ग्राहकाचा समावेश होतो. या प्रक्रियेत दोघांत अद्वितीय संबंध प्रस्थापित होतो. यामुळे ग्राहकात अनेक बदल होताना दिसून येतात. ग्राहकात बदल होणारे काही क्षेत्रे खाली दिलेली आहेत.

**वर्तणूक : -**

समुपदेशन प्रक्रियेनंतर ग्राहक ज्या प्रकारे वागतो, समस्येला सामोरे जातो, निर्णय घेतो घटनांशी संबंधित असतो. याचे निरिक्षण केल्यास त्याच्या वर्तणूकीत बदल झालेला दिसून येतो.

**विश्वास:-**

समुपदेशन प्रक्रियेचा ग्राहक स्वतःबद्दल, इतराबद्दल, जगाबद्दल किंवा भावनिक चिंता या धारणांबददल ज्या प्रकारे विचार करतो त्यावर संबंधित परिणाम होत असतो.

भावनिक त्रासाची पातळी:-

समुपदेशन प्रक्रिया ग्राहकांना अस्वस्थ भावना किंवा पर्यावरणीय तणावाच्या प्रतिक्रियांचा सामना करण्यास मदत करते.

**दृष्टीकोन:-**

ग्राहक सकारात्मक दृष्टिकोन विकसित करतात. आणि स्वतःबददल किंवा इतरांबद्दल नकारात्मक दृष्टीकोन टाळतात.

## ४.५ समुपदेशक म्हणून शिक्षकांची भूमिका

जोपर्यंत शाळेत प्रशिक्षित मार्गदर्शक आणि समुपदेशक उपलब्ध होत नाही तोपर्यंत शिक्षकालाच समुपदेशकाची भूमिका बजावावी लागते. विद्यार्थ्यांना त्यांच्या समस्या शिक्षकांना सांगणे सोपे नाही. यासाठी शिक्षक खुल्या मनाचे आणि स्वयंसेवकांना मदत करणारे असावे लागते. जर एखादया शिक्षकाला विश्वासू रहायचे असेल तर विद्यार्थ्याच्या मनात विश्वास निर्माण करणे आवश्यक असते. काही गुण जे विद्यार्थ्यांना शिक्षकांशी बोलण्यास प्रोत्साहित करतात ते खालील प्रमाणे

**(old timer )**

एखादी व्यक्ती जितका जास्त काळ एखादया संस्थेत काम करत असेल तितकी ती व्यक्ती त्या जागेला आणि विद्यार्थ्यांना समजू शकते. त्यामुळे ती व्यक्ती समुपदेशकाच्या भूमिकेसाठी आदर्श उमेदवार होऊ शकते. ज्या शिक्षकांना विदयार्थ्यांपर्यंत पोहचता येते अशांना ओळखून त्यांना समुपदेशनाचे प्रशिक्षण दिले जाऊ शकते.

**सक्रिय ऐकण्याचे कौशल्ये (Active Listening Skills):**

शिक्षक एक सक्रिय श्रोता असावा लागतो. विद्यार्थी त्यांना जे काही सांगत असेल त्यात त्यानी मनातून रस दाखविला पाहिजे. तसेच विद्यार्थ्यांना धीर देणे, होकार देणे आणि त्यांच्या संकेतांना प्रतिसाद देऊन सहाय्यक देहबोली वापरणे समुपदेशनात शिक्षकांसाठी आवश्यक असते.

**(High Level of Integrity) :**

विदयार्थ्यांना त्यांच्या सर्वात त्रासदायक समस्या शिक्षकांसोबत शेअर करण्यासाठी शिक्षकांनी विश्वासू असणे गरजेचे असते. तसेच त्यांच्या समस्या इतर कोणासोबत शेअर करू नये. विश्वासाचे नातेसंबंध निर्माण करण्यासाठी गोपनीयता हे मध्यवर्ती आहे याची जाणीव शिक्षकाला असणे आवश्यक असते.

**सहानुभूतीशील आणि शोधक : (Empathetic and Exploratory) :**

शिक्षकाने सहानुभूतीशील असणे असते कारण त्यांना विद्यार्थ्यांच्या समस्या त्यांच्या दृष्टिकोनातून समजण्यास मदत होते. तसेच त्यांच्याकडे उत्तम संभाषण कौशल्य असले पाहिजे. विद्यार्थ्यांच्या निरीक्षणातून शिक्षकास त्यांच्या शब्दाच्या पलीकडच्या अनेक गोष्टी समजून घेण्याचा प्रयत्न करावा लागतो, जसे विद्यार्थ्यांची चुळबूळ, आवाजातील चढउतार, आत्मविश्वास, बुजरेपणा, श्वासातील बदल, संकोच, बारकाव्यांकडे शिक्षकाचे लक्ष असावे लागते. ज्यामुळे विद्यार्थ्यांच्या समस्येवर तोडगा काढण्यास मदत होते.

विद्यार्थ्यांचा समावेश असलेल्या कोणत्याही कार्यक्रमासाठी शिक्षकांचे समर्थन आणि सहभाग महत्त्वाचा असतो, मार्गदर्शन आणि समुपदेशन याला अपवाद नाहीत.

**शिक्षकाची भूमिका खालीलप्रमाणे आहे**

- विद्यार्थी आणि मार्गदर्शन कार्यक्रमादरम्यान थेट संपर्क
- समस्या ओळखणे.
- करिअर माहिती केंद्राची स्थापना करणे आणि देखभाल करणे.
- प्रेरक वातावरण तयार करणे
- विद्यार्थी, पालक आणि संबंधित अधिकाऱ्यांमध्ये सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करणे.

विदयार्थ्यांच्या मार्गदर्शनावर परिणाम करण्यासाठी शिक्षकांना अनेक तंत्रांचा वापर करावा लागतो. शिक्षकांना विद्यार्थ्यां विषयी माहिती मिळवण्यासाठी अनेक चाचण्या, निरीक्षणे, प्रासंगीक नोंदी ॲनेक्डोटल (Anecdotal) रेकॉर्ड चा वापर करावा लागतो. तसेच वर्ग समुपदेशक म्हणून, प्रत्येक विद्यार्थ्यात त्यांच्या व्यावसायिक योजनांमध्ये मदत म्हणून वैयक्तिक, सामाजिक, आणि शैक्षणिक गुण विकसित करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. शिक्षक पुढिल बाबींसाठी समुपदेशकाला सहकार्य करू शकतात:

तज्ञांच्या मदतीची गरज असलेल्या विद्यार्थ्याला ओळखा आणि संदर्भित विद्यार्थ्याबददल माहिती पुरवा. तज्ञांची कृतीयोजना पूर्ण करण्यास मदत करा. शिक्षकांच्या मार्गदर्शनासाठी सात प्रकारच्या कृती दिल्या जाऊ शकतात. त्या खालीलप्रमाणे आहेत.

१) वैयक्तिक संबंधाचा वापर करणे
२) स्वतःविषयी चांगले मत आणि क्षमता तयार करणे
३) वैयक्तिकृत सूचना
४) दैनंदिन शिक्षणाचे मार्गदर्शन
५) विद्यार्थ्यांसोबत शैक्षणिक उदिष्टे शेअर करणे
६) सामान्य समस्यांवर चर्चा करणे
७) विदयार्थ्यांच्या गरजा पूर्ण करणे

## ४.७ सारांश:-

विद्यार्थ्यांपुढे असणाऱ्या समस्यांची उकल करण्याच्या हेतुने समुपदेशक आणि ग्राहक यांच्यातील संभाषण म्हणजे समुपदेशन होय. समुपदेशन प्रक्रिया समुपदेशक आणि ग्राहक यांच्यातील परस्परसंवादाच्या दरम्यान किंवा परिणामी उद्भवणाऱ्या सर्व घटना, वैशिष्ट्ये किंवा परिस्थितीचा संदर्भ देते. दुसऱ्या शब्दांत सांगायचे झाले तर समुपदेशन ही वैयक्तिक, सामाजिक किंवा मानसशास्त्रीय समस्या आणि अडचणींचे निराकरण करण्यासाठी ग्राहकांना मदत करणारी प्रक्रिया आहे. आकलन, ग्राहकातील बदल, स्वप्रकटीकरण कामाचा अनुभव नैतिक वर्तन ही समुपदेशनाची वैशिष्ट्ये आहेत. समुपदेशनाची प्रक्रिया प्रारंभिक प्रकटीकरण, सखोल शोधण आणि कृतीसाठी बांधिलकी अशा तीन टप्प्यात पार पाडली जाते. प्रभावी समुपदेशनासाठी श्रवण कौशल्ये (ऐकणे), प्रश्न कौशल्य, संप्रेषण कौशल्य, उपस्थिती असणे तसेच प्रतिसाद कौशल्य, संबंध प्रस्थापिक करणे इत्यादी कौशल्ये समुपदेशकाकडे असणे आवश्यक आहे. समुपदेशकाला विविध भूमिका पार पाडाव्या लागतात. त्यासाठी काही आवश्यक गुण त्याला अंगी बाणावे लागतात. शाळेत समुपदेशकाच्या अनुपस्थितीत शिक्षकांनाच समुपदेशकाची भूमिका पार पाडावी लागते.

❄❄❄❄❄❄❄

# अ

# मार्गदर्शन आणि समुपदेशन - ( विभाग १ )

**घटक रचना**

**प्रात्यक्षिक कार्य १**

१. व्यवसाय विश्लेषणाचा अर्थ

२. व्यवसाय विश्लेषण अहवालाचे विहित स्वरुप. (यामध्ये दिलेल्या मुद्दयांखेरीज तुम्ही तुमचे स्वत:चे मुद्दे समवेशीत करू शकता.)

**प्रात्यक्षिक कार्य 2**

३. समाजाप्रती तीने/त्याने दिलेल्या योगदानाबद्दल समुपदेशकाच्या भाषणास हजर रहा.

४. एक समुपदेशक म्हणून स्विकारलेली (सामोरी आलेली) आव्हाने

५. समुपदेशनातील भविष्यातील संभावना

६. विहीत नमुन्यानुसार संपूर्ण अहवाल सादर करा. (नमुन्यात दिलेल्या मुद्दयांखेरीज तुम्ही तुमचे स्वतःचे मुद्दे देखील समाविष्ट करू शकता.)

**प्रात्यक्षिक कार्य १: व्यवसाय विश्लेषण करण्याकरिता आणि संपूर्ण अहवाल सादरीकरणासाठीचे प्रात्यक्षिक कार्य**

**व्यवसाय विश्लेषणाचा अर्थ**

व्यवसाय विश्लेषणाचा अर्थ म्हणजे, माहिती एकत्र करणे आणि एखादया विशिष्ट व्यवसायासंदर्भात माहिती समजून घेणे. माहितीचे एकत्रीकरण करताना पुढील गोष्टींचा त्यात समावेश होतो. व्यवसायाप्रती असलेल्या जबाबदा-या आणि कर्तव्ये, त्या जबाबदाऱ्या आणि कर्तव्ये निभावण्यासाठी आवश्यक कौशल्ये आणि त्या जबाबदाऱ्या आणि कर्तव्ये पार पाडण्यासाठी आवश्यक असलेले ज्ञान  विशिष्ट व्यवसाय करण्यास लागणारे विद्यमान कार्यालयीन वातावरण इ. या सर्व एकत्रित माहितीचे नीट आकलन होणे गरजेचे आहे आणि या सर्व मुद्दयांची व्यवसाय विश्लेषण अहवालाच्या विहित  आराखड्यात नोंद करावी.

व्यवसाय विश्लेषण अहवालाचा विहीत नमुना: (खाली दिलेल्या मुद्द्यांव्यतिरिक्त अहवालामध्ये तुम्ही तुमच्या स्वतःच्या मुद्दयांचा समावेश करू शकता.) तुम्ही तुमचा व्यवसाय विश्लेषण अहवाल तयार करताना खालील विहित नमुन्याचा आधार घ्यावा.

**प्रस्तावना**

- प्रथम परिच्छेद - व्यवसाय विश्लेषणाचा अर्थ यावर काही ओळी लिहा.
- द्वितीय परिच्छेद - व्यवसाय विश्लेषणाचे महत्व लिहा.
- तृतीय परिच्छेद - हे व्यवसाय विश्लेषण तुम्ही कोणत्या कंपनीचे / बँकेचे / ऑफिसचे / कारखान्याचे / स्टोअर्स चे इ. केले त्या विषयी लिहा.

- चौथा परिच्छेद-ह्या व्यवसायाचे विश्लेषण करताना तुम्ही कोणत्या आवाहनांना सामोरे गेलात ते लिहा.

**व्यवसायासाठी आवश्यक गोष्टी**

- प्रथम परिच्छेद - त्या व्यवसायाकरिता आवश्यक शैक्षणिक अर्हता लिहा.
- द्वितीय परिच्छेद - या व्यवसायाकरीता आवश्यक कौशल्ये लिहा
- तृतीय परिच्छेद - या व्यवसायाकरीता आवश्यकता असल्यास वयोमर्यादेचे निकष लिहा.
- चतुर्थ परिच्छेद - या व्यवसायाकरीता आवश्यक असलेला कार्य /कामाचा अनुभव लिहा.
- पाचवा परिच्छेद - व्यवसायासाठी आवश्यक असलेल्या प्रमाणीकरणाबद्दल लिहा

**व्यवसायाचे वर्णन**

- प्रथम परिच्छेद - व्यवसायाचे शीर्षक लिहा.
- द्वितीय परिच्छेद - व्यवसायाशी संबंधित कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या लिहा.
- तृतीय परिच्छेद - व्यवसायाची वेळ व लागणारा व्यवसायासाठीचा कालावधी लिहा.

**व्यवसायाचे मूल्यमापन**

- प्रथम परिच्छेद- त्या व्यवसायातील कामाच्या ताणाविषयी लिहा.
- द्वितीय परिच्छेद- या व्यवसायात दिल्या जाणाऱ्या वेतनाविषयी लिहा.
- तृतीय परिच्छेद- ह्या व्यवसायाने मिळणारे फायदे /लाभांविषयी लिहा.
- चौथा परिच्छेद- या व्यवसायाच्या एकंदरीत कार्य अनुभवाबद्दल लिहा

**समारोप**

दोन परिच्छेदांमध्ये प्रात्यक्षिक कार्यामध्ये तुम्ही संपादित केलेले अध्ययन आणि अनुभवांबद्दल लिहा तसेच इतर विद्यार्थ्यांना सूचना दया जेणेकरून त्या सहाय्यभूत ठरु शकतील:

नमुना उत्तर

**व्यवसाय विश्लेषण अहवाल**

**प्रस्तावना**

व्यवसाय विश्लेषण म्हणजे एखादया विशिष्ट व्यवसायासंदर्भात माहिती गोळा करणे आणि ती माहिती विशिष्ट व्यवसायांसंदर्भात समजून घेणे. माहिती संकलनात नेमून दिलेल्या जबाबदाऱ्या आणि कर्तव्ये आवश्यक कौशल्ये, जबाबदाऱ्या आणि कर्तव्ये पार पाडण्यासाठी आवश्यक ज्ञान, विद्यमान कामाचे वातावरण आणि तो, विशिष्ट व्यवसाय करण्यास पुरवल्या गेलेल्या अटी या सर्वांचा यामध्ये समावेश होतो.

व्यवसायामध्ये कराव्या लागणाऱ्या कामात आणि कृतीमध्ये आवश्यक असणारे गुण किंवा गुणविशेषांचे आकलन करण्यात व्यवसाय विश्लेषण महत्वपूर्ण भूमिका निभावते. व्यवसाय विश्लेषण हे आपल्या कार्यासाठी दिलेल्या गोष्टी व माहितीचे संकलन करण्यासाठी, जबाबदाऱ्या, कर्तव्ये, आवश्यक कौशल्ये अपेक्षित फलनिष्पत्ती आणि एखाद्या विशिष्ट व्यवसायाकरीता लागणारे अनुकुल व्यवसाय वातावरण यासाठी फार महत्वाचे असते. संस्थेची माहिती पुरवण्याच्या संदर्भात व्यवसाय विश्लेषण महत्वपूर्ण ठरते. विशिष्ट व्यवसायाकरीता कोणत्या प्रकारचे कर्मचारी समर्पक ठरु शकतील हे व्यवसाय विश्लेषणाद्वारे समजते. व्यवसाय विश्लेषणाद्वारे व्यवसाय विश्लेषक व्यवसायातील महत्त्वाची कामे, ती कशाप्रकारे करून घ्यायची, आणि ते काम यशस्वी पूर्ण करण्यासाठी आवश्यक मानवी गुणांचे आकलन करून घेतो.

एखादा व्यवसाय यशस्वीरीत्या करावयाचा असल्यास व्यवसाय विश्लेषण ही एक कार्यपद्धती असून ती जबाबदाऱ्या कर्तव्य व आवश्यक कौशल्य ठरवत असते. कोणत्या प्रकारची व्यक्ती त्या कामात योग्य ठरू शकेल हे व्यवसाय विश्लेषणात पाहिले जाते. आपल्या ह्या अहवालामध्ये ‘अबक’ ह्या बँकेच्या शाखा व्यवस्थापकाचे व्यवसाय विश्लेषण केले गेले आहे.

व्यवसाय विश्लेषणाचे काम करतानाची आव्हाने प्रचंड आहेत. परंतु, अंतिमतः तो एक अध्ययन अनुभव आहे. सर्वात महत्वपूर्ण आव्हान वेळेचे आहे. व्यवसाय विश्लेषण करताना वेळ नियोजन हा निर्णायक घटक असतो.

व्यवसाय विश्लेषण करण्याकरिता अधिकाऱ्यांकडून परवानगी मिळणे देखील महत्वाचे असते. एखाद्याच व्यक्तिचे विचार किंवा अनुभव सामान्यीकरण करताना प्रश्न निर्माण करू शकतात, एक व्यवसाय विश्लेषक म्हणून योग्य प्रशिक्षण आणि प्रेरणा खूप आवश्यक आहे. व्यवसाय विश्लेषण करताना नियोजनाचे उपयोजन हे आव्हान असते.

**बँक शाखा व्यवस्थापकाच्या व्यवसायासंदर्भातील सारांश-**

बँकेच्या शाखेचा व्यवस्थापक हा बँकेच्या शाखेच्या पर्यवेक्षणास व व्यवस्थापनास जबाबदार असेल. शाखा व्यवस्थापकाने पुढील गोष्टींवर देखील देखरेख ठेवावी. उदा०

- आर्थिक अहवाल
- कर्मचाऱ्यांची भाडोत्री नियुक्ती व प्रशिक्षण, आणि
- शाखेचा महसूल (उत्पन्न) वाढवणे.

**व्यवसायाकरिता आवश्यक गोष्टी**

**शैक्षणिक आणि इतर अर्हता**

- तीने / त्याने ‘वित्त’ मधील पदवी घ्यावी किंवा आर्थिक व्यापारासंबंधीत, किंवा त्या संदर्भातील क्षेत्रांविषयी पदवी घ्यायला हवी.
- तीने / त्याने वित्त किंवा तत्संबंधि पदव्युत्तर परिक्षा पास करणे आवश्यक आहे.
- त्याचे / तीचे अभ्यासाचे क्षेत्र एमबीए मार्केटिंग असलेल्या उमेदवारांना प्राधान्य द्यावे.
- तीचे / त्याचे किमान वय 24 वर्ष असावे.
- तिला / त्याला बैंकिंग किंवा आर्थिक संस्थेत मार्केटिंगचा किमान ५ वर्ष अनुभव असावा.

**इतर गाभा कौशल्ये**

- एका चांगल्या व्यवस्थापकाकडे चांगली नेतृत्व कौशल्ये असायला हवीत.
- एका चांगल्या व्यवस्थापकाने ग्राहकांना कार्यक्षमतेने हाताळायला हवे.
- एका चांगल्या व्यवस्थापकाकडे निरीक्षण कौशल्ये आणि चिकित्सक विचार कौशल्ये असायला हवीत.
- एका चांगल्या व्यवस्थापकाकडे निरीक्षण कौशल्ये आणि विपणन (विक्री-marketing) कौशल्ये असायला हवीत.
- एका चांगल्या व्यवस्थापकाकडे संप्रेषण कौशल्ये आणि समस्या निराकरण कौशल्ये असायला हवीत.

**व्यवसायाचे वर्णन –**

- संघठनेचे नाव अ.ब.क. बँक
- व्यवसायाचे शीर्षक - शाखा व्यवस्थापक
- नाव आणि इतर माहिती - श्री. य.र.ल., अ.ब.क- बँक शाखा व्यवस्थापक
- प्रती अहवाल - सहाय्यक जनरल व्यवस्थापक
- पर्यवेक्षण - शाखेतील सर्व विभागांचे
- कार्ये- शाखेच्या कार्याचे व्यवस्थापन आणि सांभाळ

**बँकेच्या शाखा व्यवस्थापकाची कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या खालील प्रमाणे-**

- शाखा व्यवस्थापक शाखेच्या कामाचे नियोजन व दिग्दर्शन करतो.
- शाखा व्यवस्थापकास बँकेच्या विपणनाची (मार्केटिंग) काळजी घ्यावी लागते.
- शाखा व्यवस्थापकास बँकेच्या संपूर्ण शाखा कार्यालयाच्या कामाचे व्यवस्थापन करावे लागते.
- शाखा व्यवस्थापकास ठेवींची उदिष्टे साध्य करणे, नविन योजनांच्या जाहीराती करणे इ. कार्ये साध्य करावी लागतात.
- शाखा व्यवस्थापक बँकेच्या मानवी संसाधनांचे पर्यवेक्षण देखील करतो. उदा० बँकेतील शाखेचा कर्मचारी वर्ग.
- शाखा व्यवस्थापकास आस्थापनाने दिलेल्या वेळेच्या मर्यादा पूर्ण कराव्या लागतात तसेच सर्व सभांना हजर रहावे लागते.
- शाखा व्यवस्थापकास बँकेच्या कर्मचाऱ्यांचे नेतृत्व करावे लागते.
- बँकेच्या शाखेच्या उन्नतीसाठी शाखा व्यवस्थापक जबाबदार असतो.
- शाखा व्यवस्थापकास बँकेच्या इतर कार्यपद्धती पार पाडाव्या लागतात.
- सेंट्रल बँकेने दिलेल्या नियम आणि कायदयां संदर्भात शाखा व्यवस्थापकाने अद्ययावत राहणे अपेक्षित आहे.

- आस्थापनांना नियमितपणे अहवाल पुरवणे हे शांखा व्यवस्थापकाकडून अपेक्षित आहे.

बैंक शाखा व्यवस्थापकाच्या कामाची वेळ ही बहुतेक वेळा ज्या बँक संघटनेत तो/ती काम करत असते यावर आधारलेली असते. बहुतांश बँकेच्या शाखा शनिवार व रविवार सोडून ग्राहकांकरीता सकाळी ९ ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत चालू असतात. बँकेच्या शाखेचे शाखा व्यवस्थापक जरी ते असले तरीही शाखा व्यवस्थापकांस अधिक काळ काम करणे आवश्यक ठरते जसे कि, इतर बैंक शाखांना भेटी देणे, परिसंवाद व सभांना हजर राहणे इत्यादी.

**शाखा व्यवस्थापकाच्या व्यवसायाचे मूल्यमापन**

बँक संघठनेमध्ये बँकेचा शाखा व्यवस्थापक हे महत्वाचे पद आहे. एखाद्या बँकेचा शाखा व्यवस्थापक हा अनुभवी आणि कुशल कर्मचारी असतो. बँक शाखा व्यवस्थापक हा एक नेता असतो जो त्याच्या शाखेच्या संदर्भात ध्येये आणि उद्दिष्टे साध्य करण्यास जबाबदार असतो. त्याने / तीने बँकेच्या शाखेच्या सर्व विभागांच्या बँकिंग आणि त्या संदर्भातील कामकाजाची देखरेख करायला हवी. त्याला / तिला लोकांना, हाताळण्यात आणि ग्राहक संबंध सुधारण्यासाठी जबाबदार ठरविण्यात येते.

वर्णनात्मक घटक आणि कार्यकुशलता याचा योग्य समतोल साधण्यासाठी बँकेच्या शाखा व्यवस्थापकास चांगल्या वेतनासह इतर मोबदला व फायदे देखील पुरवले जातात. एखादी अबक बँक उच्च प्रकारची फलनिष्पत्ती आणि बँकेच्या सदभावनेवर भर देते तर काही बँका आपल्या कर्मचाऱ्यांच्या गरजा लक्षात घेऊन परिणामकारक आणि कार्यक्षम व्यवसाय आराखडा तयार करण्यास सहाय्य करते. बँकेच्या शाखा व्यवस्थापकाचे वेतन महिन्याला ७५,००० ते करते १ लाख या दरम्यान असायला हवे. ज्या बँक शाखेच्या व्यवस्थापकाची मी जी मुलाखत घेतली त्याद्वारे अबक बँकेच्या शाखा व्यवस्थापकाचे वार्षिक पॅकेज ९, ५०,०००/- होते म्हणजे अंदाजे -मांसिक ८०,०००/- रु

**समारोप**

ह्या व्यवसाय विश्लेषण अहवालाच्या प्रात्यक्षिक कार्याद्वारे मी खूप शिकलो आणि भरपूर अभ्यासपूर्ण अनुभव मिळाले. या व्यवसाय विश्वेषण आयोजनाचे महत्वाचे उदिष्ट असे होते कि त्याद्वारे व्यवसाय वर्णन आणि व्यवसाय तपशील तयार करणे. तसेच त्या तपशीलांचा उपयोग योग्य पदावर आणि समर्पक कौशल्यासह योग्य व्यक्तिची निवड करण्यास सहाय्यक ठरेल.

मला इथे काही सूचना द्याव्यात असे वाटते कि ज्या इतरांना सहाय्यक ठरु शकतील.

- या संघ कार्य विश्लेषणात मला असा आढळले कि बँकेचा शाखा व्यवस्थापक हा बँक शाखेचा नेता असतो.
- बँकेत शाखा व्यवस्थापक म्हणून काम करणाऱ्या व्यक्तिकडे नेतृत्व कौशल्ये व गुणवैशिष्ट्ये असावीत.
- ती / तो पुरेसा आत्मविश्वासू असायला हवा जेणेकरून तो तीच्या / त्याच्या बँक कर्मचाऱ्यांच्या संघाचे नेतृत्व करू शकेल
- बँक शाखा व्यवस्थापक हा एक चांगला निरिक्षणकर्ता आणि विपणनकर असावा.

- बँक शाखा व्यवस्थापक ही शांत व्यक्ति असावी. कठिण परिस्थिती आणि आव्हानांना सामोरे जाण्याची क्षमता त्याकडे असायला हवी.

# ब

## प्रात्यक्षिक कार्य-२

- समुपदेशकाचे समाजाप्रती त्याचे योगदान
- एक समुपदेशक म्हणून सामोरी गेलेली आवाहने, आणि समुपदेशनातील भविष्यकालीन संधी यावरील समुपदेशकाचे भाषण ऐकून त्यावर आधारित. संपूर्ण अहवाल सादर करावा.
- समुपदेशक कोण ?
- जो मार्गदर्शन करतो तो समुपदेशक असतो. समुपदेशक ही अशी एक व्यक्ति असते जीने समुपदेश्यास विविध समस्यांसंदर्भात मार्गदर्शन करण्याचे प्रशिक्षण आणि शिक्षण घेतलेले असते. समुपदेश्याच्या समस्या व्यक्तिगत किंवा सामाजिक खाजगी किंवा वैयक्तिक किंवा भावनिक वा मानसशास्त्रीय स्वरूपाच्या असू शकतात. समुपदेश्य म्हणजे ज्याला समुपदेशकाकडून मार्गदर्शन मिळते ती व्यक्ति होय.
- समाजाप्रती समुपदेशकाचे योगदान कोणते?
- समुपदेशकाचा समाजाप्रती योगदानातील समावेशामध्ये समुपदेश्यास त्याच्या वैयक्तिक किंवा सामाजिक तसेच खाजगी किंवा वैयक्तिक तसेच भावनिक किंवा मानसशास्त्रीय समस्यांच्या निराकरणामध्ये होऊ शकतो.

**तुम्ही जेव्हा समुपदेशकाचे समाजाप्रती असलेले योगदान हे भाषण ऐकाल तेव्हा खालील मुद्दे लक्षात ठेवावे. (तुम्ही तुमचे स्वतःचे मुद्दे देखील लिहा)**

- समुपदेशकाने कोणासोबत काम केले होते, तो फक्त एक विद्यार्थी होता किंवा आणि विद्यार्थ्यांचा समूह होता किंवा / आणि संपूर्ण विद्यार्थी समुदाय होता आणि / किंवा सर्वकष संपूर्ण समाजासोबत काम केले ?
- एखादया विद्यार्थ्याची आणि / किंवा विद्यार्थ्यांच्या समूहाची आणि/ किंवा संपूर्ण विद्यार्थी समूदायाची आणि | किंवा सर्वकष संपूर्ण समाज म्हणून मानसिक आरोग्य कशाप्रकारे सुधारले गेले होते ?
- समुपदेशकाने समुपदेश्यकास कशाप्रकारे प्रोत्साहित व प्रेरित केले होते?

**एक समुपदेशक म्हणून सामोरी गेलेली आवाहने**

समुपदेशकाने त्याच्या किंवा तीच्या जबाबदाऱ्या पार पाडताना कोणत्या आवाहनांना सामोरे जावे लागले होते अशी सर्व आवाहने लिहीणे अपेक्षित आहे. सर्व आवाहनांची यादी करा आणि सविस्तर लिहिण्याचा प्रयत्न करा. शक्य झाल्यास उदाहरणे दया.

**समुपदेशनातील भावी संधी**

एक समुपदेशक म्हणून जर करिअरची निवड केली तर त्या संदर्भातील व्याप्ती आणि भावी संधी बदद्वल लिहीणे अपेक्षित आहे. यामध्ये तुम्ही हजर राहून समुपदेशकाने केलेल्या भाषणांचे मुद्दे येथे सविस्तर मांडू शकता. किंवा समुपदेशक हे एक करिअर निवडून तुम्ही तुमच्या स्वतःच्या मुद्द्यांचा सखोल अभ्यास करून त्याचा समावेश करू शकता.

**विहीत नमुन्या नुसार संपूर्ण अहवाल सादर करा.**

(खाली दिलेल्या मुद्यांखेरीज तुम्ही तुमच्या स्वतःच्या मुद्यांचा समावेश अहवालात करू शकता.)

- **अहवाल तयार करताना खाली दिलेला विहित नमूना संदर्भ म्हणून जरुर वापरा.**
- **प्रस्तावना**
  - प्रथम परिच्छेद- समुपदेशक कोण असतो? यावर काही ओळी लिहा.
  - द्वितीय परिच्छेद- सुमुपदेशकाचे महत्व लिहा.
  - तृतीय परिच्छेद- समुपदेशक कोणासाठी काम करतो याविषयी काही ओळी लिहा.
  - चतुर्थ परिच्छेद - समुपदेशकाच्या भूमिकेबदल लिहा.
- **समुपदेशक होण्यासाठी शैक्षणिक अर्हता**
  - प्रथम परिच्छेद- समुपदेशकासाठी आवश्यक शैक्षणिक अर्हता लिहा
  - द्वितीय परिच्छेद- समुपदेशकाचे कार्य प्रभावीपणे पार पाडण्यासाठी आवश्यक कौशल्ये लिहा.
  - तृतीय परिच्छेद- समुपदेशक होण्यासाठी अधिकृत अधिकाऱ्याकडून काही प्रमाणीकरणाची आवश्यकता असल्यास त्या विषयी लिहा.
- **समुपदेशका पुढील आव्हाने –**
  - प्रथम परिच्छेद - समुपदेशकाच्या जबाबदाऱ्या आणि कर्तव्ये याबद्दल लिहा.
  - द्वितीय परिच्छेद - समुपदेशकाने सांगितलेल्या एखादया संस्मरणीय अनुभवाबद्द्ल लिहा.
  - तृतीय परिच्छेद- कामाची वेळ आणि कामाला लागणारा कालावधी यासंदर्भात समुपदेशकाच्या कामाच्या वेळापत्रकात लिहा.
  - चतुर्थ परिच्छेद एक समुपदेशक म्हणून, समुपदेशकाने त्याचे कर्तव्यं बजावताना संपूर्ण निष्ठेसह त्याला मिळणारे वेतन आणि आदर यासंदर्भात लिहा.
- **समुपदेशनानील भविष्यकालीन संधी**

- ○ प्रथम परिच्छेद - समुपदेशक म्हणून कोणती व्याप्ती असेल याबद्दल लिहा.
- ○ द्वितीय परिच्छेद - समुपदेशक म्हणून महत्व लिहा.
- ○ तृतीय परिच्छेद – समुपदेशकास भविष्यात संभाव्य लाभांविषयी लिहा
- ○ चतुर्थ परिच्छेद - भविष्यामध्ये 'समुपदेशक'- एक व्यवसाय करिअर म्हणून त्याच्याकडे कसे पाहिले जाईल या विषयी लिहा.

- **समारोप –**

समुपदेशकाचे जे भाषण तुम्ही संपूर्ण ऐकले आहेत त्याचा समारोप तुमच्या शब्दात करणे अपेक्षित आहे. त्याचप्रमाणे समुपदेशकाने युवकांना, विशेषतः सद्यकालीन विद्यार्थ्यांना दिलेला संदेश लिहीणे अपेक्षित आहे.

- **नमुना उत्तर-**

शैक्षणिक समुपदेशकाचे समाजातील योगदानाबद्दलचे भाषण सामोरी असलेली आव्हाने आणि समुपदेशनतील भावी संभावना (संधी) ह्या संदर्भातील संपूर्ण अहवाल

- **प्रस्तावना**

एक शैक्षणिक समुपदेशक ही एक अशी व्यक्ति असते जी विद्यार्थ्यांच्या समस्या सोडवण्यासाठी मार्गदर्शनाच्या स्वरुपात सहकार्य करते सूचना देते आणि उपाययोजना सुचवते. शालेय समुपदेशक म्हणूनही त्यांना ओळखले जाते. शैक्षणिक समुपदेशक ही एक अशी व्यक्ति असते जी विद्यार्थ्यांच्या व्यक्तिगत किंवा सामाजिक, खाजगी किंवा वैयक्तिक, भावनिक किंवा मानसशास्त्रीय अशा विविध विद्यार्थ्याच्या समस्यांवर समुपदेश्यावर देखरेख करून मार्गदर्शन करते. ह्या शैक्षणिक समुपदेशकाने शैक्षणिक प्रशिक्षण व विशिष्ट कौशल्ये (विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात लागणारी) प्राप्त केलेली असतात. शैक्षणिक समुपदेशकाकडून ज्या विद्यार्थ्याला मार्गदर्शन प्राप्त होते त्यास समुपदेश्य असे म्हणतात.

समुपदेशकाचे नाव :- अ. ब. क.

संस्थेचे नाव - क्षयज्ञ शैक्षणिक संस्था, मुंबई.

शैक्षणिक समुपदेशक विद्यार्थ्यांच्या जीवनाची गुणवत्ता सुधारण्यासाठी त्यांच्या सेवा प्रदान करतात. ज्यामुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास होण्याचे उद्दिष्ट साध्य होते. एक शैक्षणिक समुपदेशक हे केवळ विद्यार्थ्यांकरीताच महत्वाचे नसून सर्व घटकांना महत्वाचे आहेत. विद्यार्थ्यांच्या शालेय, व्यक्तिगत, सामाजिक आणि व्यवसायासंबंधित आवश्यकतांचा विकास करण्यात व्यावसायिकरित्या प्रशिक्षित शैक्षणिक - समुपदेशक सहाय्यक ठरतो. शैक्षणिक समुपदेशन परिणामकारक शालेय समुपदेशन कार्यक्रमातून विद्यार्थ्यांचे संपादन वाढवू शकते. शैक्षणिक समुपदेशक हा शिक्षणाच्या विविध स्तरांवर काम करतो उदा. पूर्व प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक आणि महाविद्यालयीन स्तर तसेच व्यावसायिक विकास कोर्सेस. शिक्षणाचा स्तर, विद्यार्थ्यांची अभिरुची आणि अवधान कक्षा यावर समुपदेशकाच्या कामातील महत्वपूर्ण फरक आधारीत असतो.

संपूर्ण शैक्षणिक संदर्भात आणि विद्यार्थ्यांच्या जीवनात शैक्षणिक समुपदेशक महत्वाची भूमिका पार पाडतो. शालेय समूदायातील सर्व सभासदांच्या मानवी अधिकाराचे रक्षण करण्याचे कार्य ते करतात. विद्यार्थ्यांनी कमाल यश संपादन करण्यासाठी ते सहाय करतात. विद्यार्थ्यांना अनुकुल, पोषक अध्ययन वातावरण पुरवण्याच्या दृष्टीने ते कार्य करतात. विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्व गुण आणि समूह गतिशीलता रुजवण्याचा ते प्रयत्न करतात. विद्यार्थ्यांमध्ये अस्तित्ववाद, समानता आणि वैश्विक बंधुभावाची भावना विकसित करण्याचा ते प्रयत्न करतात.

शैक्षणिक समुपदेशकाने सर्व विद्यार्थ्यांना शालेय संपादनासाठी व्यक्तिगत व सामाजिक जीवनात आणि करिअर विकासात निर्माण होणाऱ्या अभिवृत्तींसंदर्भात सहाय्य करणे अपेक्षित आहे. शैक्षणिक समुपदेशकांस जरी विविध भूमिका निभावायच्या असल्या आणि जबाबदाऱ्या पार पाडायच्या असल्या तरीही त्यांचे प्रमुख उदिष्ट म्हणजे शालेय विद्यार्थ्यांना सहाय्य करून आणि सकारात्मक  शालेय, सामाजिक आणि व्यक्तिगत विकासात्मक गरजा लक्षात घेऊन शालेय विद्यार्थ्यांना प्रेरीत करणे हे होय.

**समुपदेशक होणासाठी शैक्षणिक अर्हता :**

शैक्षणिक समुपदेशकाकडे मानसशास्त्र या विषयातील पदव्युत्तर पदवी किंवा तत्समान शैक्षणिक पात्रता असणे आवश्यक आहे. आवश्यकतेनुसार शालेय समुपदेशनासंदर्भात शासन प्रमाणित कोर्स आवश्यक आहे. पूर्ण वेळ शैक्षणिक समुपदेशन हा व्यवसाय करण्याकरीता छात्रसेवाकाल अत्यंत महत्वाचा आहे. प्रत्येक राज्य शासनाने विहीत केल्यानुसार समुपदेशन कायद्यांचे पालन तीने / त्याने करणे बंधनकारक आहे.

आवश्यक शैक्षणिक अहर्तेशिवाय शैक्षणिक समूपदेशकाकडे इतर विविध गुण आणि कौशल्ये असायलाच हवीत. त्यांच्याकडे उत्तम श्रवण कौशल्ये, चांगली संप्रेषण कौशल्ये, उत्तम निरिक्षण कौशल्ये, चांगली तार्किक क्षमता, चिकित्सक विचार क्षमता आणि सर्वात महत्वाचे करुणा आणि व्यवसायाप्रती समर्पण वृत्ती.  शैक्षणिक समुपदेशक हा आत्मविश्वासू असायलाच हवा. त्यांच्याकडे पटवून देण्याची क्षमता असणे आवश्यक आहे कारण त्यांना इतर शिक्षक, पालक आणि व्यवस्थापन यांच्याशी सहयोगाने शाळेत आणि घरी अनुकुल अध्यापन आणि अध्ययन वातावरण निर्मितीसाठी सदैव तयार रहावे लागते.

शैक्षणिक समुपदेशक होण्यासाठी, त्याच्याकडे ह्या व्यवसायात शाळेत किंवा इतर शैक्षणिक संस्थेत  काम करण्यासाठी राज्याने पारीत केलेले प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. काही देशांमध्ये शैक्षणिक समुपदेशक म्हणून काम करण्यासाठी जे प्रमाणपत्र दिले जाते त्यास अधिकारपत्रे किंवा लायसन्स  असेही म्हटले जाते.

**समुपदेशक म्हणून समोर असलेली आव्हाने:-**

बहुविध कामे करण्याची क्षमता असणारा शैक्षणिक समुपदेशक, कधीकधी मार्गदर्शन सल्लागार म्हणून देखील संबोधला जातो. अत्यंत महत्वाच्या मार्गांनी विद्यार्थ्यांवर परिणाम करणे हे समुपदेशकाचे कर्तव्य आहे.

विद्यार्थ्यांना त्यांच्या कठिण व अवघड काळातून जाण्यास मदत करणे आवश्यक आहे जे अन्यथा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कामगिरीवर परिणाम करू शकते.

समुपदेशक विद्यार्थ्यांना आव्हानात्मक विषय जे वर्गामध्ये जाण्यास तसेच वैयक्तिक व समवयस्क दबाव दूर करण्यास सहाय्य करतो. शैक्षणिक समुपदेशकासाठी प्रत्येक दिवस आव्हानात्मक आणि शिकण्याचा दिवस असतो.

**शैक्षणिक समुपदेशक पुढील प्रमुख आव्हानांना सामोरे जातात.**

- शालेय विद्यार्थ्यांमध्ये असलेला उच्च स्तरावरील ताण,
- शालेय विद्यार्थ्यांमधील गुंडगिरी वर्तन ओळखणे
- तंत्रस्नेही जगातील विद्यार्थ्यांचे ढासळते मानसिक आरोग्य,
- शालेय विद्यार्थ्यांमधील आत्महत्या करण्याच्या प्रवृत्तींना ओळखणे
- शालेय विद्यार्थ्यांचे मनोबल वाढवणे.
- शालेय विद्यार्थ्यांमधील सामाजिक आर्थिक दर्जाबाबतचे संघर्ष हाताळणे
- एक चांगले राष्ट्र म्हणून विद्यार्थ्यांच्या नाजूक वयात लिंग समानतेची भावना निर्माण करणे.
- एखादी शाळा किंवा विद्यार्थ्यासंबंधी विशिष्ट समुपदेशन कार्यक्रम धोरणाचे नियोजन करणे
- समुपदेशना अंतर्गत समुपदेशकाने त्याच्याकडे असलेल्या अतिरिक्त जबाबदाऱ्यांमध्ये कामांचा प्राधान्यक्रम ठरवणे.
- कामाच्या तणावपूर्ण वातावरणात समुपदेशकाने आपली मनस्थिती स्थिर व शांतपूर्ण ठेवणे.

येथे अजूनही काही आव्हाने आहेत जेथे शैक्षणिक समुपदेशक विद्यार्थ्यांना सहाय्यक ठरू शकेल. विद्यार्थ्यांना त्यांचे ध्येय प्राप्त करण्यासाठी आणि यशापर्यंत पोहोचण्यासाठी शैक्षणिक समुपदेशक योग्य पथदर्शक आणि योग्य दिशादर्शक म्हणून सतत प्रोत्साहित करतात.

त्यांचे वेतन हे पूर्णत: कामाचा ताण आणि संस्थेवर अवलंबून असते. एखादया संस्थेने ती (निवड) अंशकालीन किंवा नियमित पूर्ण वेळेची नियुक्ती असते. उन्हाळी सुट्टी दरम्यान शकयतो शैक्षणिक समुपदेशकास सुट्टी असते कारण त्यावेळी शाळेत कोणतेच सत्र चालू नसते. शैक्षणिक समुपदेशकास परिपूर्व करियरसह ही बऱ्याच सवलती दिल्या जातात. या व्यतिरिक्त व्यवसाय वृद्धी संदर्भात इतरही बरेच फायदे दिले जातात.

**समुपदेशनातील भविष्यकालीन संधी**.

संपूर्ण शिक्षण पद्धतीमध्ये शैक्षणिक समुपदेशन महत्वपूर्ण भूमिका निभावते उदा. (जसे) मूल्यमापनासाठी ते एक दिशा दर्शवण्याचे काम करते, अध्ययन अध्यापन वातावरण सुधारण्यास, पाठ्यक्रम व अभ्यासक्रम सुधारण्यास सहाय्य करते. विकासाकरिता नियम आणि कायदा यांची बांधणी करते, विद्यार्थ्यांच्या यशस्वी जीवनासाठी योगदान करते. ज्या प्रमाणात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या वाढत आहे त्याच प्रमाणात उच्च शिक्षित शैक्षणिक समुपदेशकांची मागणी वाढतच आहे.

एक संपूर्ण समाज म्हणून आणि संस्थेचा प्रमुख एक सदस्य म्हणून शैक्षणिक समुपदेशक दिशादर्शकाचे काम करतो. आपल्या देशाचे भावी नागरिक म्हणून आणि विद्यार्थ्यांना त्यांच्या स्वतःच्या जीवनात या तरुण मनांना आकार देण्याची महत्वाची भूमिका शैक्षणिक समुपदेशकास निभवावी लागते. शैक्षणिक समुपदेशकाला ही खूप मोठी जबाबदारी त्याच्या खांदयावर पेलायची आहे.

शैक्षणिक समुपदेशन हे करिअर सद्यस्थितीत खूप मोठ्या मागणीत आहे कारण शैक्षणिक समुपदेशकाची आवश्यकता पूर्व - प्राथमिक शाळेपासून ते महाविद्यालयापर्यंत आणि व्यावसायिक कोर्सेस (अभ्यासक्रमांमध्ये) देखील खूप आहे. शैक्षणिक समुपदेशकांची मागणी ही दिवसेंदिवस वाढतच आहे त्याचे मुख्य कारण म्हणजे विद्यार्थ्यांची वाढती संख्या. प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक आणि महाविद्यालयीन स्तरावर विद्यार्थ्यांची प्रवेश संख्या वाढतच आहे. ही विद्यार्थी प्रवेश संख्या खाजगी संस्था, सरकारी तसेच राज्य संस्थांमध्ये वाढतच आहेत. संद्य पिढीला वैश्विक स्तरावरील सह-अस्तित्व, शाश्वत विकास या संकल्पना शिकणे गरजेचे आहे. तर राष्ट्रीय स्तरावर वैविध्य आणि बहुसांस्कृतिकता यांचा समतोल राखणे देखील आवश्यक आहे.

**समारोप –**

एकसंध समाजाच्या उन्नतीसाठी विद्यार्थ्यांच्या अभिवृत्तीस आकार देण्याची जबाबदारी ही प्रमाणित व्यावसायिक म्हणून शैक्षणिक समुपदेशकाकडे असते. त्या समुपदेशकांना विद्यार्थ्यांच्या गरजा कशा ओळखायच्या याचे प्रशिक्षण दिले जाते तसेच मध्यस्थी कार्यक्रमांच्या उपयोगाद्वारे विद्यार्थ्यांमध्ये इच्छित बदल घडवून आणू शकतात. विद्यार्थ्यांना त्यांच्या कमाल क्षमतांपर्यंत पोहोचवण्यास शैक्षणिक समुपदेशकाने सहाय्य करणे अपेक्षित आहे.

शैक्षणिक समुपदेशकास विविध भूमिका निभवायच्या असल्या आणि कर्तव्यांचे जबाबदारीने पालन करावयाचे असले तरी त्यांचे प्रमुख उदिष्ट म्हणजे शालेय विद्यार्थ्यांना सहाय्य करून प्रेरित करणे आणि त्यांच्या शालेय, सामाजिक आणि वैयक्तिक विकासात्मक गरजांना सकारात्मकतेने उत्तेजन देणे हे होय.

❄❄❄❄❄❄❄